**Meeting No.** 136 **Meeting Date** 27-Jun-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २०-३-१९९५ रोजी झालेल्या विशेष बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 5171

विषय : प्राधिकरणाच्या सर्व्हे क्र. ४१ (भाग) मधील २०,०००/- चौ. मीटरचा भूखंडाचा भाडेपट्टा करार, ओशिवरा तारापोर गार्डन सहकारी गृहनिर्माण सोसायटीबरोबर करणेबाबत.

ठराव : प्राधिकरणाने आर्मी वेल्फेअर गृहनिर्माण संस्थेस भाडेपट्टा कराराने वाटप केलेल्या सर्व्हे क्रमांक ४१ (भाग) मधील २०,००० चौ. मीटरच्या भूखंडाचा प्रत्यक्ष भाडेपट्टा करार हा ओशिवरा तारापोर गार्डन सहकारी गृहनिर्माण सोसायटीबरोबर करण्याकरिता सदर आर्मी वेल्फेअर गृहनिर्माण संस्था ही त्या भाडेपट्टा करारात कन्सेसिंग पार्टी असेल. भाडेपट्टा करार हा नेहमीच्या अटी व शर्तीनुसार व प्राधिकरणाच्या ठराव क्र. ५२०, दिनांक १३/५/१९८२ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार करण्यात येईल.

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : वांद्रे येथील प्राधिकरणाच्या सर्व्हे क्र. ७ व ८ या व्यापारी प्रयोजनासाठी राखीव भूखंडाबाबत.

ठराव :

**Item No.** 4 **Resolution No.** 5172

विषय : लातूर इमारत निर्मिती केंद्रास निर्मिती केंद्र उभारण्यासाठी प्रशिक्षणाची जमीन वितरित करण्याबाबत.

ठराव : लातूर इमारत निर्मिती केंद्राला प्राधिकरणाच्या लातूर येथील स. क्र. ९७/९८ या जमिनीवर कार्यान्वित असलेल्या गृहनिर्माण योजनेच्या भूअभिन्यासातील 'ना-विकास' क्षेत्रात असलेली ४००० चौ. मीटर जमीन इमारत निर्मिती केंद्राच्या कामासाठी रु. १,२९,०००/- अशा सवलतीच्या किंमतीस बाब टिप्पणीत नमूद केलेल्या पद्धतीने देण्यास प्राधिकरणाची ही सभा एकमताने मंजूरी देत आहे. त्याचप्रमाणे इतर निर्मिती केंद्राकडून प्राधिकरणाची जमीन सवलतीच्या दराने मागितल्यास ती देण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No. 5 Resolution No. 5173**

विषय : भामटी परसोडी, नागपूर येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत ८२ गाळ्यांच्या बांधकामासाठी कंत्राटदार मे. भगवानदास गंगवानी यांनी वापरलेल्या अतिरिक्त पोलादाबाबत (रिगार्डिंग एक्सेस स्टील)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, भामटी परसोडी, नागपूर येथील ठेकेदार मे. भगवानदास गंगवानी यांनी वापरलेल्या अतिरिक्त पोलादाबाबत त्यांनी केलेल्या विनंती अर्जानुसार प्राधिकरणाच्या बैठकीत सर्वंकश विचार करून घेतलेल्या निर्णयानुसार वापरलेल्या अतिरिक्त पोलादाची किंमत कंत्राटातील तरतुदींनुसार दंडात्मक दराने न करता या कामासाठी अगदी शेवटच्या वेळी मंडळाने पुरवठा केलेल्या पोलादाच्या त्या वेळच्या चालू बाजारभावाच्या दराने वसूल करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.
या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता मुख्याधिकारी, नागपूर मंडळ यांना याबाबतची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
मात्र या प्रकरणी एक निर्णय आणि दुसऱ्या प्रकरणी वेगळा निर्णय अशी भिन्नता राहणार नाही, याची खबरदारी यापुढे कटाक्षाने घेतली जावी.

**Item No. 6 Resolution No. 5174**

विषय : हुडको अर्थसहाय्यित योजनांसाठी दिनांक ९.११.१९९४ पासून अंमलात आणलेली सुधारित प्रमाणपद्धती.

ठराव : हुडको अर्थसहाय्यित योजनांसाठी ९.११.१९९४ पासून अंमलात आलेली सुधारित प्रमाणपद्धती संबंधी प्राधिकरणाने नोंद घेतली व प्राधिकरण राबवित असलेल्या निरनिराळ्या उत्पन्न गटातील योजनांसाठी कौटुंबिक मासिक उत्पन्नाचे दर, गाळ्यांची/भूखंडाची कमाल किंमत/कर्जाची कमाल रक्कम, व्याजाचा दर, परतफेडीचा कालावधी यासंबंधी हुडकोची ९.११.१९९४ पासून अस्तित्वात आलेली प्रमाणपद्धती प्राधिकरणाने अवलंबन करण्यास एकमताने मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No. 7 Resolution No. 5175**

विषय : पिंपरी, पुणे येथील संत तुकाराम नगरमधील भूखंड 'जी' वरील योजना.
पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यानुसार बाधित जमीन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस विनामूल्य हस्तांतरित करून जादा इमारतीच्या बांधकामास परवानगी प्राप्त करण्याबाबत.

ठराव : 'संत तुकाराम नगर' पिंपरी, पुणे येथील वसाहतीत उपलब्ध असलेले भूखंड 'जी' ज्याचे एकूण क्षेत्रफळ ३०५४.८५ चौ. मी. एवढे आहे व जो पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील प्रस्तावाने बाधित आहे त्यातील एकूण ९५०.७५ चौ. मी. भाग (रस्त्याखाली येणारे क्षेत्रफळ २३४.७५ चौ. मी. धरून) जो विकास प्रस्तावाखाली येतो तो पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस म्हाडाला महापालिकेकडून सदर भूखंडाचा चटई निर्देशांक मिळेल आणि प्राधिकरणाच्या प्रस्तावित १० दुकाने अधिक २० रहिवासी सदनिका योजनेला महानगरपालिकेकडून मान्यता मिळेल हे गृहित धरून विनामूल्य देण्यास मान्यता देण्यात येत आहे.
मुख्याधिकारी, पुणे मंडळ यांना उक्त अटीला अधीन राहून सदर भूखंड पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला विनामूल्य हस्तांतरित करण्याबाबतचे अधिकार देण्यात येत आहेत.

**Item No. 8 Resolution No. 5176**

विषय : येरवडा-पुणे येथील २३७० गाळ्यांच्या योजनेअंतर्गत विविध गृहनिर्माण योजनेवरील गाळ्यांच्या देखभालीवर झालेल्या खर्चास मंजूरी मिळणेबाबत.

ठराव : स. नं. १९१-अ, नागपूर चाळ येरवडा येथील २३७० गाळ्यांच्या योजनेतील इमारतीवर पहारा व देखभाल यावर झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.
तसेच यापुढे असे विषय हे मा. उपाध्यक्ष/प्रा. यांच्याच स्तरावर निकालात काढण्यात यावेत, असेही एकमताने ठरविण्यात आले.

**Item No. 9 Resolution No. 5177**

विषय : पुणे गृहनिर्माण मंडळाच्या अधिकारितेतील सोलापूर येथील बापूजी नगरामधील प्राथमिक शाळेसाठी आरक्षित भूखंडाचे वितरणाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे 'ज्ञानसागर शिक्षण मंडळ', सोलापूर या संस्थेस बापूजीनगर मधील प्राथमिक शाळेसाठी आरक्षित भूखंडाचे वितरण करण्यास प्रचलित शर्ती व अटींना अधीन राहून मान्यता देण्यात येते.

| Item No. | 10 | Resolution No. | 5178 |
|---|---|---|---|

विषय : श्री. पी. डी. वाणी, माजी मुख्यामियंता, प्राधिकरण यांची सेवा प्रत्यावर्तित झाल्यानंतर त्यांनी वापरलेल्या म्हाडाच्या सेवानिवासस्थानापोटी आकारावयाच्या भाड्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. पी. डी. वाणी, माजी मुख्य अभियंता/प्राधिकरण यांची सेवा प्रत्यावर्तित झाल्यानंतर त्यांनी वापरलेल्या म्हाडाच्या सेवानिवासस्थानापोटी त्यांना सर्वसाधारण भाडे (नॉर्मल रेंट) आकारण्यात यावे.
उपरोल्लेखित प्रकरणाप्रमाणे सेवानिवासस्थाने भाडे ठरविण्याचे निकष निश्चित करता यावेत यासाठी तत्संबंधिचे नियम कशा पद्धतीने सुधारित करावेत, त्याचे नियम काय असावेत, सेवानिवासस्थानाच्या वितरण पत्रात घालावयाच्या अटी व शर्ती इत्यादीबाबत परिपूर्ण तपशील नमूद करून सेवानिवासस्थाने वितरणाचे नियम सुधारित करण्याबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणापुढे सादर करण्यात यावा.

| Item No. | 11 | Resolution No. | 5179 |
|---|---|---|---|

विषय : मजासवाडी येथील गृहनिर्माण महाप्रकल्प नाल्याच्या बांधकामाविषयीचा मे. युनिटी कन्स्ट्रक्शन कंपनीचा दावा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मजासवाडी गृहनिर्माण महाप्रकल्पात मोठ्या आकाराच्या नाल्याचे बांधकाम विकासकास करावे लागेल. या नाल्याच्या बांधकामाचा उपयोग प्रामुख्याने भू-अभिन्यासाबाहेरील पाणी वाहून नेण्यासाठी होणार आहे त्यासाठी विकासकास रु. ३०,९३,२४७/- पेक्षा जास्त रक्कम अदा न करण्याच्या अटीवर बाब टिप्पणीतील प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

| Item No. | 12 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : मजासवाडी येथील गृहनिर्माण महाप्रकल्प मे. युनिटी कन्स्ट्रक्शन कंपनीचा, मजासवाडी टप्पा-२ वरील भाववाढीसंबंधीचा दावा.

ठराव :

| **Item No.** | **13** | **Resolution No.** | **5180** |
|---|---|---|---|

विषय : सर्व्हे क्रमांक - ५०१ येथे संक्रमण शिबिरात राहणाऱ्या रहिवाशांचे सोयीसाठी पिठाच्या गिरणीच्या सुविधा उपलब्ध करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या सर्व्हे क्रमांक ५०१ धारावी येथे चक्कीसाठी सध्या राखून ठेवलेली १५० चौ. फूटाची जागा श्री. तिवारी यांना त्यांच्या धारावीतील मूळ अनिवासी (चक्की) जागेच्याऐवजी देण्यात यावी. श्री. तिवारी यांनी या जागेचा वापर फक्त चक्कीसाठीच करावा ही अट देकार पत्रात कटाक्षाने घालण्यात यावी. उर्वरित क्षेत्रफळासाठी (श्री. तिवारी यांचे मूळ क्षेत्रफळ ३५७ - १५० बरोबर २०७ चौ. फूट) त्यांना उपलब्धतेनुसार निवासी गाळा प्रकल्पाने द्यावा.

सर्व्हे क. ५०१ धारावी येथील रहिवासी कुटुंबियांची संख्या (सुमारे १७०० कुटुंबे) लक्षात घेऊन चक्कीसाठी दुसरी १५० चौ. फूट जागा उपलब्ध झाल्यावर श्री. वाघचौरे यांना त्यांचे मूळ अनिवासी जागेबद्दल (२४ चौ. फूट) वाटप करणेत यावी. त्याप्रमाणे त्यांच्याकडून नियमाप्रमाणे फरकाची रक्कम वसूल करण्यात यावी.

| **Item No.** | **14** | **Resolution No.** | **5181** |
|---|---|---|---|

विषय : धारावी सर्व्हे क. ५०१ येथील मोकळ्या भूखंडावर (रिकेअशन ग्राउंडवर) अनधिकृत झोपड्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी ठेवण्यात आलेल्या सुरक्षा व्यवस्थेसाठीचा कालावधी वाढवून मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्पाच्या धारावी सर्व्हे क. ५०१ येथील मोकळ्या भूखंडावर (रिकेअशन भूखंडावर) अतिक्रमण टाळण्यासाठी दि. ६.१२.९४ ते ५.१२.९५ (एक वर्ष) च्या कालावधीसाठी लागणारे रु. ५५,६२०/- इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

या ठरावाची कार्यवाही इतिवृत्ताच्या मान्यतेची वाट न पाहता करण्यात यावी.

| **Item No.** | **15** | **Resolution No.** | **5182** |
|---|---|---|---|

विषय : सर्व्हे क. ९३ (भाग) देवनार येथील भूखंडासाठी स्थावर सुरक्षा वाढविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मे. जैन कन्स्ट्रक्शन कंपनी यांना सर्व्हे क. ९३ (भाग) देवनार येथील स्थावर सुरक्षा व्यवस्थेचे काम दि. ८.१.१९९५ ते ७.१.१९९६ या कालावधीसाठी सध्याच्याच रुपये ७,८६०/- प्रति महिना या दराने व कराराच्या इतर अटी व शर्तीवर वाढवून देण्यास मान्यता देण्यात येत आहे. या ठरावाची कार्यवाही इतिवृत्ताच्या मान्यतेची वाट न पाहता त्वरित करण्यात यावी.

**Item No.** 16 **Resolution No.** 5183

विषय : मानखुर्द सर्व्हे क्र. १३८ येथील भूखंडासाठी स्थावर सुरक्षा एका वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता वाढविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मे. जैत कन्स्ट्रक्शन कंपनी यांना सर्व्हे क्र. १३८ मानखुर्द येथील स्थावर सुरक्षा व्यवस्थेचे काम दिनांक १५.१०.९४ ते १४.१.९५ या कालावधीसाठी सध्याच्याच रु. ९२७०/- प्रति माह या दराने व कराराच्या इतर अटी व शर्तीवर वाढवून देण्यास मान्यता देण्यात येत आहे. या ठरावाची कार्यवाही इतिवृत्ताच्या मान्यतेची वाट न पाहता त्वरित करण्यात यावी.
प्राधिकरणाने पुढे असाही निर्णय घेतला की, यापुढे स्थावर सुरक्षा व्यवस्थेबाबतच्या खर्चाची प्रकरणे मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी त्यांचे अधिकारातच निकालात काढण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

---

**Item No.** 17 **Resolution No.** 5184

विषय : ऑफ बिल्डींग, डी. पी. वाडी, घोडपदेव, केशवराव बोरकर मार्ग, ई-विभाग येथील होणाऱ्या पुनर्रचित इमारतीतील गाळ्यांच्या किंमती व त्यांच्या वसुलीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, डी. पी. वाडी, घोडपदेव येथील पुनर्रचित होत असलेल्या इमारतीतील जुन्या निवासी गाळेधारकांकडून पूर्वीच्या योजनेप्रमाणे रु. २९,१००/- इतकी गाळ्यांची किंमत (१८० चौ. फू. गाळ्याचा) प्रकल्पाचे अनुदान व क्रॉस सबसिडी वजा जाता एक रकमी पद्धतीने गाळ्यांचा ताबा घेण्यापूर्वी भरण्यास मान्यता देण्यात येत आहे. अशी सवलत या योजनेतील संस्थानी मागितल्यास ती देण्यात यावी व त्याचप्रमाणे अतिरिक्त क्षेत्रफळ जुन्या भाडेकरूंना दिनांक ९.६.१९९३ रोजी प्रकल्पाने संस्थेस कळविल्याप्रमाणे रुपये १,२००/- प्रति चौरस फुटाने आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 18 **Resolution No.** 5185

विषय : मोईवाडा गाव येथील जी. डी. आंबेकर मार्ग, परळ फ/द विभाग येथील होणाऱ्या पुनर्रचित इमारतीतील गाळ्यांच्या किंमती व त्याची वसुली याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मोईवाडा गाव येथील महानगरपालिकेच्या मिळकतीतील भाडेकरूंना १८० चौरस फूट क्षेत्रफळाचे निवासी गाळे ठराव क्र. ५०९०, दि. १४.९.९४ अन्वये मंजूर केल्याप्रमाणे रुपये ४२,०००/- इतक्या किंमतीऐवजी रुपये १५,०००/- इतकी किंमत आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि भाडेकरूंकडून ही रक्कम एक हप्त्यात गाळ्याचा ताबा देण्यापूर्वी वसूल करण्यात यावी.
या बांधण्यात आलेल्या पुनर्रचित इमारतीतील मुंबई महानगरपालिकेच्या मूळच्या गाळेधारकांना गाळ्यांचे वितरण आणि गाळ्यांच्या किंमतीची वसुली करून ती रक्कम म्हाडाकडे सुपूर्द करण्याची जबाबदारी मुंबई महानगरपालिकेवर सोपविण्यात यावी असेही एकमताने ठरले.

---

**Item No.** 19 **Resolution No.** 5186

विषय : नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत 'सी' 'जयराम चाळ' इमारत क्रमांक : १ व २ आचार्य दोंदे मार्ग, फ/दक्षिण विभाग या इमारतीच्या रक्षणासाठी पहारेकऱ्यांच्या खर्चाला मंजूरी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत 'सी' 'जयराम चाळ' इमारत क्रमांक : १ व २ आचार्य दोंदे मार्ग, फ/दक्षिण विभाग या इमारतीच्या रक्षणासाठी अतिरिक्त १२ १/२ महिने म्हणजे १४.१२.९४ ते ३१.१२.९५ पर्यंतच्या कालावधीसाठी होणाऱ्या खर्चाला मंजूरी देण्यात येत आहे. ठरावाचे स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यात यावी.

**Item No.** 20 **Resolution No.** 5187

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्प (सध्या राजीव गांधी निवारा प्रकल्प) अंतर्गत सर्व्हे क्र. ३४३ (भाग) धारावी येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधण्यात येत असलेल्या १२० गाळ्यांच्या विक्रीसाठी निविदेत ठेवण्यात येणाऱ्या 'अपसेट प्राईस' (अपसेट प्राईस) बाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत सर्व्हे क्र. ३४३ (भाग), धारावी येथे बांधण्यात येत असलेल्या १२० गाळ्यांच्या विक्रीसाठी निविदा मागविताना रु. १,४००/- प्रति चौरस फूट जोत्याचे क्षेत्रफळ हा दर 'अपसेट प्राईस' (अपसेट प्राईस) म्हणून ठेवण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. केंद्र व राज्य शासनाच्या संस्था, महामंडळे, वित्तीय संस्था आणि म्हाडा स्वतः इत्यादी सर्वांना वाटप खुले असावे.

या ठरावाची कार्यवाही इतिवृत्ताच्या मान्यतेची वाट न पाहता करण्यात यावी.

**Item No.** 21 **Resolution No.**

विषय : भूकर क्रमांक : ७८, ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल येथील ३३४, ३३६-अ, 'आमची सावली' को-ऑप. हौ. सोसायटी या भूखंडावरील नियोजित पुनर्बांधणी योजना.

ठराव :

**Item No.** 22 **Resolution No.**

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या गाळ्यांच्या विक्री दराबाबत.

ठराव :

| Item No. | 23 | Resolution No. | 5188 |
|---|---|---|---|

विषय : २७५, ए. बी. सी. डी. रंगारी चाळ, भूखंड क. ९३, ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल या भूखंडावरील पुनर्बांधणी योजनेबाबतीत विलंब केल्याबद्दल ठेकेदाराची वाढीव दराची मागणी मान्य होणेबाबत.

ठराव : संचालक, राजीव गांधी निवारा प्रकल्प यांनी केलेल्या शिफारशी विचारात घेऊन एकमताने निर्णय घेतला की, २७५, ए. बी. सी. डी. रंगारी चाळ, भूखंड कमांक : ९३, ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल येथील जोत्यावरील बांधकामासाठी नियुक्त केलेल्या मे. स्वस्तिक कन्स्ट्रक्शन या ठेकेदारास इमारत कमांक एकचे बाबतीत १२ महिन्यांनंतर होणाऱ्या कामासाठी वाढीव किंमतीतील दराचा फरक (प्राईस एस्कलेशन) निविदा प्राप्त झाल्याच्या दिवसाच्या मूळ किंमती निर्देशकांप्रमाणे निविदेच्या रकमेच्या १० टक्के अथवा १० टक्केच्या ७५ प्रतिशत ही मर्यादा न ठेवता मंजूर करण्यात येत आहे.

| Item No. | 24 | Resolution No. | 5189 |
|---|---|---|---|

विषय : मानखुर्द सर्व्हे क. १३८ येथील इमारत क. २८, ३१, ३३ची सुरक्षा एका वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता वाढविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे क. १३८, मानखुर्द येथील रिक्त झालेल्या इमारतींचे सुरक्षा व्यवस्थेचे काम दिनांक : १.८.९४ ते ३१.१२.१९९४ या कालावधीसाठी रु. ११,२५०/- प्रति माह या दराने व दिनांक : १.१.१९९५ ते ३१.७.१९९५ या कालावधीसाठी रुपये ६,७५०/- प्रति माह या दराने कराराच्या इतर अटी व शर्तीवर वाढवून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या ठरावाची कार्यवाही इतिवृत्ताच्या मान्यतेची वाट न पाहता त्वरित करण्यात यावी.

| Item No. | 25 | Resolution No. | - |
|---|---|---|---|

विषय : विभागीय चौकशी पूर्ण करून शिक्षा म्हणून सेवेतून काढून टाकण्यात आल्यामुळे माजी उपअभियंता, श्री. जैन यांनी त्याविरुद्ध प्राधिकरणास अपिल सादर केले आहे, त्याचे अवलोकन करून त्याबाबत निर्णय घेणे.

ठराव :

| Item No. | 26 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : मे. मधु बिल्डर्स यांना त्यांच्या मजासवाडी, जोगेश्वरी (पूर्व) येथील सर्व्हे नं. ४२, हिस्सा नं. ३, या जागेच्या बदल्यात तुर्भे मंडाले येथील पर्यायी जागा देणेबाबत.

ठराव :

**Item No.** 27 **Resolution No.** 5190

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन १९९३-९४ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्वीकृत करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९९३-९४ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा स्वीकृत करण्यात येत आहे.

**Item No.** 28 **Resolution No.** 5191

विषय : पुरवणी अर्थसंकल्पीय तरतुदींस उपाध्यक्ष/प्रा. यांची मान्यता घेतलेली प्रकरणे प्राधिकरणाच्या अवलोकनार्थ ठेवणेबाबत.

ठराव : याबाबत उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी केलेल्या कार्यवाहीची प्राधिकरणाने नोंद घेतली.

**Item No.** 29 **Resolution No.** 5192

विषय : नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने रविनगर, नागपूर येथे बांधलेल्या व्यापारी संकुलनातील हॉल क्र. ५ व ६ ची विक्री 'युनिक ॲग्रो प्रोसेसर्स इंडिया लि., नागपूर' यांना करण्यास मान्यता देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, रविनगर, नागपूर येथील व्यापारी संकुलनातील दुसऱ्या मजल्यावर असलेले हॉल टाईप गाळे क्र. ५ व ६ यांना मागणी नसल्यामुळे त्या गाळ्यांचे वाटप नागपूर मंडळाने दि. ३१.१०.९४ पर्यंतच्या निश्चित केलेल्या अनुक्रमे रु. ३,१९,३९८/- व रु. २,८८,५९७/- या किंमतीस 'मे. युनिक ॲग्रो प्रोसेसर्स इंडिया लि.'' या संस्थेस विक्री करण्यात यावे. मात्र सध्या हे गाळे या संस्थेस प्रतिमाह रु. ७,८२९/- या दराने भाड्याने दिलेले आहेत म्हणून संस्थेकडून या गाळ्यांचे प्रत्यक्ष वितरण होईपर्यंतच्या कालावधीचे भाडे वसूल करण्यात यावे. तसेच प्राधिकरणाच्या या ठरावाचे स्थायीकरण होण्याची वाट न पाहता या गाळ्यांची विक्री सदरहू संस्थेस करण्यास हरकत नाही. तसेच शिल्लक राहिलेल्या गाळ्यांचे (हॉलचे) वाटप करण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत.

**Item No.** 30 **Resolution No.** 5193

विषय : प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती दरवर्षी रु. १,२००/- याप्रमाणे करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटनेच्या मागणीनुसार महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ वैद्यकीय लाभ योजना नियमावली १९६८ खंड (४) अनुसार प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी यांना मिळणारी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ततेची वार्षिक रु. ९००/- ची मर्यादा वाढवून सन १९९५-९६ या वित्तीय वर्षापासून वार्षिक रु. १,२००/- पर्यंत वाढवून देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच वरील नियमावलीच्या कलम ६ अन्वये सध्या मिळणारे लाभ यापुढेही तसेच चालू ठेवण्यात यावेत.
चालू आर्थिक वर्षासाठी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची वाढ विचारात घेऊन तशी तरतूद प्राधिकरणाच्या सन १९९५-९६ च्या अर्थसंकल्पात करण्यात यावी.

**Item No. 31 Resolution No. 5194**

विषय : भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९५२ चे कलम ६ ला झालेल्या सुधारणेनुसार म्हाडा अंशदान ८.३३ टक्केचे ऐवजी १० टक्के दि. १.६.१९८९ पासून म्हाडा कर्मचाऱ्यांना लागू करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाची भविष्य निर्वाह निधी वर्गणी भविष्य निर्वाह निधी नियम (२) (सहा) मध्ये प्रस्तुत केलेल्या व्याख्येनुसार मूळ पगार अधिक महागाई पगार (डिअरनेस पे) म्हणून शासनाने वेळोवेळी घोषित केल्याप्रमाणे अशा एकूण वेतनाच्या ८.३३ ऐवजी १० टक्के दराने दिनांक १.६.१९८९ पासून लागू करण्यास व त्याकरिता संबंधित विनियमात सुधारणा करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

तसेच यापुढे शासकीय कर्मचाऱ्यांसाठी निघणारे सर्व शासन निर्णय म्हाडा कर्मचाऱ्यांना जसेच्या तसे लागू करण्याची कार्यवाही मा. उपाध्यक्ष/प्रा. यांच्या स्तरावरच पूर्ण करण्यात यावी, त्यासाठी प्राधिकरणापुढे असे प्रस्ताव आणू नयेत, या मा. सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांनी केलेल्या सूचनेस प्राधिकरणाने एकमताने मंजूरी दिली.

**Item No. 32 Resolution No. 5195**

विषय : शैलेंद्र नगर, दहिसर येथील २४ गाळे उच्च उत्पन्न गट अधिक १० दुकाने (३३ गाळे अधिक १२ दुकाने) या योजनेचे बांधकाम निविदा स्वीकृतीसाठी विचार करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे मे. सोळंकी ब्रदर्स यांची गुणवत्ता व कार्यक्षमता लक्षात घेता त्यांनी भरलेली निविदा रक्कम रु. ७७,४४,६०२/- जी अंदाजपत्रकीय किंमतीच्या २४.५० टक्के देकार स्वीकृतीस मान्यता देण्यात येत आहे.

बैठकीच्या विषयसूचीवरील विषय विचारार्थ घेण्यात आल्यावर व प्रस्तावावर उक्तनुसार निर्णय झाल्यानंतर उपस्थितांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे सभा-अध्यक्षांनी जाहीर केले.

**Meeting No.** 137 **Meeting Date** 09-Oct-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २७-७-१९९५ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्यालय गृहनिर्माण भवनातून स्थलांतरित करून ते कामाच्या व जनतेच्या सोयीसाठी ठाणे येथे हलविण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना दिनांक : १ जानेवारी १९९५ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 4 **Resolution No.** 5196

विषय : वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठितता घालविण्यासंबंधी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक : ८.६.९५ च्या एसआरव्ही-१०९५/प्र. क्र. १/९५/१२ या क्रमांकाच्या शासन निर्णयानुसार वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठितता घालविण्यासंबंधी योजना उक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वांच्या अधीन राहून प्राधिकरणातील वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांना लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 5 **Resolution No.** 5197

विषय : प्राधिकरणाच्या गाळे/मूखंडाचे दोन वेळा जाहिरात देऊनही वाटप झाले नाही तर त्यांचे वाटप गाळे वाटपाच्या अटी शिथिल करून करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या गाळे/मूखंडाचे वाटप दोन वेळा जाहिरात देऊनही न झाल्यास गाळे वाटप विनियम १४-अ नुसार प्रथम येणाऱ्यास प्रथम गाळा याप्रमाणे करता येते, पंधरा वर्षांची वास्तव्याची अट शासनाच्या मान्यतेशिवाय शिथिल करता येणार नाही, मात्र अन्य अटी शिथिल करण्याचे अधिकार प्राधिकरणास आहेत म्हणून मुंबई, ठाणे व विरारपर्यंतच्या विभागात राबविण्यात येणाऱ्या योजनेतील गाळे/मूखंड वगळून, अन्य ठिकाणचे दोन वेळा जाहिरात देऊनही मागणी नसलेल्या गाळे/मूखंडाचे प्रथम येणाऱ्यास प्रथम गाळा याप्रमाणे वाटप करताना आवश्यकतेप्रमाणे पुढील अटी शिथिल करण्यास प्राधिकरणाची मान्यता आहे.

१) अल्प उत्पन्न गट/मध्यम उत्पन्न गटाकरिता ठरवून देण्यात आलेली उत्पन्नाची अट शिथिल करण्यास हरकत नाही.
२) अर्जदाराने मागणी केल्यास त्यांना एकापेक्षा अधिक गाळा/मूखंड देण्याची मुभा देण्यात यावी.
३) अर्जदाराचे नावे गाळा/मूखंड नसावा ही अट देखील शिथिल करण्यात यावी. मात्र ज्या लाभार्थी अर्जदाराच्या नावे गाळा/मूखंड असेल त्यांनी तो गाळा/मूखंड प्राधिकरणाच्या गाळ्याचा ताबा मिळाल्यानंतर सहा महिन्यांच्या आत दुसऱ्याच्या नावे करणे आवश्यक आहे असे हमीपत्र न्यायालयीन मुद्रांक शुल्क कागदावर लिहून घेणे आवश्यक राहील.

**Item No.** 6 **Resolution No.** 5198

विषय : नागरी संरक्षण विभागाच्या प्रशिक्षण केंद्रासाठी येरवडा येथील पुणे मंडळाच्या वसाहतीतील सुविधा मूखंड क्रमांक १० चे वाटप करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, येरवडा, पुणे येथील महाराष्ट्र शासनाच्या नागरी संरक्षण विभागाच्या प्रशिक्षण केंद्रासाठी प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतविषयक धोरणाप्रमाणे जमिनीची प्रत्यक्ष किंमत, तिच्यावरील विकासाचा खर्च मिळून येणाऱ्या रकमेवर वितरणाच्या दिनांकापासून साडेबारा टक्के दराने व्याज आकारणी येणारी रक्कम अधिमूल्य घ्यावे. पुणे मंडळाने या मूखंडापैकी ५१० चौ. मीटर क्षेत्रफळाचे हस्तांतरण केले आहे. मोजणी प्रमाणे येणारे अतिरिक्त ३१६ चौ. मी. क्षेत्र मिळून ८२६ चौ. मीटर क्षेत्रफळाच्या मूखंडाच्या वाटपात तत्वतः मान्यता देण्यात येत आहे. ८२६ चौ. मी. मूखंडाचे वाटप शासनाच्या नागरी संरक्षण विभागास ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने प्राधिकरणाच्या इतर प्रचलित अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रत्यक्षात ज्या दिनांकापासून त्यांना ५१० चौ. मीटर मूखंडाचा ताबा देण्यात आला आहे त्या दिनांकापासून करण्यास मंजूरी देण्यात येते. मात्र मूखंडाच्या वाटपास शासनाकडे प्रस्ताव पाठवून आवश्यक ती शासनाची मान्यता पुणे मंडळाने घ्यावी.

**Item No.** 7 **Resolution No.** 5199

विषय : मुंबईत दि. ८ व ९ जून १९९१ रोजी झालेल्या वादळी मुसळधार पावसामुळे विक्रोळी येथील गोदामातील पत्रे उडून झालेल्या सिमेंटच्या नुकसानीस (राईट-ऑफ) निर्लेखित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, दिनांक : ८ व ९ जून ९१ रोजी विक्रोळी येथील गोदामावरील पत्रे उडून पावसाने भिजून निकामी झालेल्या ६४ मे. टन सिमेंटची किंमत रुपये १,१२,७६८/- (प्रति टन १७६२/-) निर्लेखित करण्याच्या मुंबई मंडळाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : राजीव गांधी प्रकल्पांतर्गत सन १९९४-९५ मध्ये संक्रमण शिबिर/कमी/उच्च उत्पन्न गटाचे गाळे बांधण्यासाठी संचालक/राजीव गांधी प्रकल्प यांनी दिलेल्या प्रशासकीय मान्यतेबाबत प्राधिकरणास सूचित करणेबाबत.

ठराव :

---

**Item No.** 9 **Resolution No.** 5200

विषय : अत्यंत मोडकळीस आलेल्या धोकादायक उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या पृष्ठ क्र. १ ते ७६५ वर मुंबई बेटावरील मोडकळीस आलेल्या जुन्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या २३६ कामांच्या रु. ८३९.३६ लक्ष रकमेच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.
याबाबत कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता मंडळाने पुढील कार्यवाही सुरू करावी. जोपर्यंत मंडळ सदस्य/तांत्रिक समितीची नियुक्ती शासनाकडून होत नाही तोपर्यंत वरील स्वरुपाचे कामाच्या संदर्भात मान्यता देण्याचे अधिकार मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मा. सभापती, मुख्याधिकारी आणि प्राधिकरणाचे संबंधित मुख्य अभियंता यांच्या समितीस देण्यात येत आहेत.

---

**Item No.** 10 **Resolution No.** 5201

विषय : मजासवाडी येथील गृहनिर्माण महाप्रकल्प मे. युनिटी कन्स्ट्रक्शन कंपनीचा मजासवाडी टप्पा-२ वरील भाववाढीसंबंधीचा दावा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मे. युनिटी कन्स्ट्रक्शन यांना टप्पा क्र. २ साठी निविदेत अंतर्भूत ६ टक्के प्रत्येक ६ महिन्यांकरिता या पद्धतीने दर वाढवून न देता टप्पा क्र. २ चे काम टप्पा क्र. १ चे पुढील काम समजून टप्पा क्र. १ च्या दराने द्यावे व त्यांना टप्पा क्र. १ मध्ये प्राधिकरणाने मंजूर केलेली विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ लागू करण्यात यावी.

**Item No.** 11 **Resolution No.**

विषय : लातूर व उस्मानाबादबाबत जिल्ह्यातील भूकंपग्रस्त पुनर्वसन प्रकल्पाबाबतचा अहवाल.

ठराव :

**Item No.** 12 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाचे गाळे/हस्तांतरण/नियमितकरण याबाबत आकारण्यात येणाऱ्या अधिमूल्यांच्या दरात सुधारणा करणे व भूखंडाचे हस्तांतरण व नियमितकरण करण्याबाबत विनियमात तरतूद झाल्यानंतर त्यांचे हस्तांतरण/नियमितकरण करण्यासाठी आकारावयाच्या अधिमूल्यांबाबतचे धोरण ठरविणे.

ठराव :

**Item No.** 13 **Resolution No.** 5202

विषय : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे अखत्यारीतील स. क्र. ११९-अ, येरवडा, पुणे येथील सुविधा भूखंड क्र. १२ सर्वोपचार रुग्णालयासाठी वितरणाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे अखत्यारीतील स. क्र. ११९-अ, येरवडा, पुणे येथील सुविधा भूखंड क्र. १२ सर्वोपचार रुग्णालयासाठी 'आदित्य मेडिकल फाऊंडेशन' पुणे या संस्थेस नेहमीच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून रु. ७,९९,२००/- एवढ्या किंमतीस म्हणजे प्रति चौ. मीटर रु. १,२००/- या दराने विक्री करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 14 **Resolution No.**

विषय : पुरवणी अर्थसंकल्पीय तरतुदींस उपाध्यक्ष/प्राधिकरण यांची मान्यता घेतलेली प्रकरणे प्राधिकरणाच्या अवलोकनार्थ ठेवणेबाबत.

ठराव :

**Item No.** 15 **Resolution No.**

विषय : विभागीय चौकशी पूर्ण करून शिक्षा म्हणून सेवेतून काढून टाकण्यात आल्यामुळे माजी उपअभियंता श्री. आर. सी. जैन यांनी त्याविरुद्ध महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास अपिल सादर केले आहे त्याचे अवलोकन करून त्याबाबत निर्णय घेणे.

ठराव :

**Item No.** 16 **Resolution No.**

विषय : प्राधिकरण कर्मचारी कल्याणकारी योजनेअंतर्गत अधिकारी/कर्मचारी यांच्या सहकारी संस्थेतील सभासदांच्या पात्रतेबाबत.

ठराव :

**Item No.** 17 **Resolution No.**

विषय : कोंकण मंडळाने चिकणघर कल्याण येथे बांधलेल्या अल्प उत्पन्न गट ८०० गाळ्यांपैकी रिक्त असलेले गाळे म्हाडा कर्मचारी - तृतीय व चतुर्थ श्रेणी यांना वाटप करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 18 **Resolution No.**

विषय : हेंद्रे बिल्डींग या पुनर्रचित इमारतीमधील अतिरिक्त गाळ्यांच्या वाटपासाठी दर आणि हप्ते ठरविण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 19 **Resolution No.** 5203

विषय : प्राधिकरणाच्या विविध गृहनिर्माण योजना स्थानिक निर्मिती केंद्राद्वारे राबविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, तळेगाव-दाभाडे येथील अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट योजना की, जी पुणे इमारत निर्मिती केंद्र योजनेत पुणे मंडळ राबवित आहे त्या योजनेस मुख्य अधिकारी, पुणे मंडळ यांनी पुणे इमारत निर्मिती केंद्रास अंदाजित रकमेच्या ६० टक्के 'मोबिलायझेशन अग्रिम' बिनव्याजी दिलेले आहे. या मुख्य अधिकारी, पुणे मंडळ यांच्या कार्यवाहीस प्राधिकरणाची ही सभा एकमताने मंजूरी देत आहे.

तथापि, यापुढे अशा प्रकारे जिल्हा इमारत निर्मिती केंद्रामार्फत कुठलीही योजना राबवावयाची असल्यास विभागीय मंडळाने प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय अशी कार्यवाही करू नये असेही ठरविण्यात आले.

**Item No.** 20 **Resolution No.**

विषय : राजीव गांधी प्रकल्पाच्या नागरी नूतनीकरणांतर्गत योजनांच्या विद्युत पुरवठा करण्यासाठी विद्युत उपकेंद्र बांधण्यास भूखंड बेस्ट उपक्रमास हस्तांतरित करण्याबाबत.
१) १२९ जगुशेठ चाळ, ना. म. जोशी मार्ग
२) १७७ भंडारी चाळ, टी. जी. मार्ग.

ठराव :

**Meeting No.** 138 **Meeting Date** 02-Dec-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ९-१०-१९९५ रोजी झालेल्या १३७ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 5204

विषय : कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने मुख्यालय गृहनिर्माण भवनातून स्थलांतरित करून ते कामाच्या व जनतेच्या सोयीसाठी ठाणे येथे हलविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, कोकण मंडळाचे मुख्यालय गृहनिर्माण भवन, मुंबई येथून कोकण मंडळाच्या कार्यक्षेत्रात स्थलांतरित करण्यास तत्वतः मान्यता देण्यात येते. तथापि, कोकण मंडळाचा ठोस निर्णय व निश्चित प्रस्ताव आल्यानंतर प्राधिकरण स्तरावर अंतिम निर्णय घेण्यात यावा.

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरण कर्मचारी कल्याणकारी योजनेअंतर्गत अधिकारी/कर्मचारी यांच्या सहकारी संस्थेतील सभासदांच्या पात्रतेबाबत.

ठराव :

**Item No.** 4 **Resolution No.** 5205

विषय : कोकण मंडळाने चिकणघर कल्याण येथे बांधलेल्या अल्प उत्पन्न गट ८०० गाळ्यांपैकी रिक्त असलेले गाळे म्हाडा कर्मचारी तृतीय व चतुर्थ श्रेणी यांना वाटप करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, चिकणघर, कल्याण येथील अल्प उत्पन्न गटाचे मागणी अभावी रिक्त असलेल्या उर्वरित गाळ्यांचे वितरण खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून पात्र अर्जदारांना करण्यात यावे.

अ) या गाळ्यांचे वाटप प्राधिकरणाच्या केवळ तृतीय व चतुर्थ वर्गातील कर्मचाऱ्यांना करण्यात यावे.

ब) त्याबाबत उत्पन्न मर्यादेची अट घालू नये.

क) लाभधारकांना रुपये १५,०००/- प्रारंभिक भरावयाची रक्कम घेऊन उर्वरित रक्कम ११.५ टक्के व्याजाच्या दराने १५ वर्षांचे मासिक हप्त्यानुसार भरणा करावा लागेल.

ड) मासिक हप्ते त्यांच्या पगारातून वसूल करावेत.

ई) कर्मचारी आकस्मिक मृत्यू पावल्यास किंवा कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने नोकरी सोडल्यास त्या गाळ्यांची उर्वरित किंमत त्यांना निवृत्तीनंतरच्या देय रकमेतून (उदा. भ. नि. नि., उपदान, विमा इत्यादी) वसूल करण्यात यावी. याबाबत वचनपत्र/हमीपत्र घ्यावे.

फ) वरील क्रमांक ड व ई बाबत हमीपत्राचा नमुना प्राधिकरणाचे विधी सल्लागार यांच्याकडून तयार करून तो लाभार्थी कर्मचाऱ्यांकडून भरून घ्यावा.

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : हेंद्रे बिल्डींग या पुनर्रचित इमारतीमधील अतिरिक्त गाळ्यांच्या वाटपासाठी दर आणि हप्ते ठरविण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाचा दिनांक १५/११/९५ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 7 **Resolution No.** 5206

विषय : राजीव गांधी प्रकल्पाच्या नागरी नूतनीकरणांतर्गत योजनांच्या विद्युत पुरवठा करण्यासाठी विद्युत उपकेंद्र बांधण्यास भूखंड बेस्ट उपक्रमास हस्तांतरित करण्याबाबत.
१) १२९ जगूशेठ चाळ, ना. म. जोशी मार्ग
२) १७७ भंडारी चाळ, टी. जी. मार्ग.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, राजीव गांधी निवारा प्रकल्पाच्या योजनांकरिता लागणाऱ्या विद्युत उपकेंद्र बांधण्यासाठी बेस्ट उपक्रमास देण्यात येणाऱ्या भूखंडास रु. १/- प्रति भूखंड प्रतिवर्ष या नाममात्र दराने हस्तांतरित करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, अशाप्रकारचे प्रस्ताव यापुढे वेळोवेळी प्राधिकरणाच्या मंजूरीसाठी न आणता प्रकल्प स्तरावर संचालक, राजीव गांधी प्रकल्प व मंडळ स्तरावर, मुख्याधिकारी, प्रा. मंडळे यांना निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात येत आहेत व त्यानंतर दर तीन महिन्यांनी अशा प्रकरणी त्यांचे स्तरावर घेण्यात आलेले निर्णय प्राधिकरणाच्या माहितीसाठी सादर करावेत.

**Item No.** 8 **Resolution No.** 5207

विषय : श्री. इ. झेड. खोब्रागडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकरणाने सेवानिवासस्थान म्हणून वितरित केलेला गाळा क्रमांक जी-१, २/४७ च्या भाड्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेण्यात आला की, श्री. इ. झेड. खोब्रागडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांची सेवा दि. ७-१-१९९५ पासून त्यांच्या मूळ खात्यात प्रत्यावर्तित झाली होती. परंतु प्राधिकरणाच्या कामाच्या हिताच्या दृष्टीने शासनास विनंती करून त्यांना प्राधिकरणाच्या सेवेत दि. १७-१०-१९९५ पासून पुन्हा घेण्यात आलेले आहे. म्हणून दि. ८-१-१९९५ पासून ते दि. १६-१०-१९९५ पर्यंतच्या प्राधिकरणाच्या सेवानिवासस्थानातील त्यांच्या वास्तव्याच्या कालावधीसाठी ज्याप्रमाणे श्री. पी. डी. वाणी, माजी मुख्य अभियंता/मुंबई मंडळ यांना भाडे आकारण्यात येणार आहे. त्याप्रमाणेच पूर्वीसारखेच शासकीय भाडे श्री. खोब्रागडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांचे वास्तव्याच्या कालावधीसाठी आकारण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : श्री. आर. सी. जैन, माजी उपअभियंता यांनी दाखल केलेल्या अपिलावर प्राधिकरणाचा निर्णय.

ठराव :

**Meeting No.** 139 **Meeting Date** 12-Jan-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २-१२-१९९५ रोजी झालेल्या १३८ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : श्रीमती एस. एस. देवधर, सेवानिवृत्त विधी सल्लागार/प्रा. यांची प्राधिकरणात विशेष सल्लागार म्हणून नेमणूक करण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 3 **Resolution No.** 5208

विषय : महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाला प्राधिकरणाच्या अतिरिक्त निधीमधून रु. १०० कोटी रक्कम उपलब्ध करून देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्रस्तुत बाब टिप्पणीतील एकंदर वस्तुस्थिती विचारात घेऊन व सहकार व वस्त्रोद्योग विभागाने त्यांच्या दि. ९.१.१९९६ च्या पत्राद्वारे कळविल्याप्रमाणे या गुंतवणूकीवर १७ टक्के दराने व्याज मिळेल याबाबत संबंधित महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाने त्यांच्या पत्राद्वारे स्थायी करावे. तद्नंतर प्राधिकरणाच्या अतिरिक्त निधीमधून पुढील सहा महिने किंवा तत्पूर्वी उक्त व्याज दराने सर्व रक्कम व्याजासह परत करण्याच्या व त्याबाबत महाराष्ट्र शासनाने हमी घेण्याच्या अटीवर महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाकडे रु. १०० कोटी गुंतवणूक करण्यास या ठरावाद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

**Item No. 4 Resolution No. 5209**

विषय : प्राधिकरण कर्मचारी कल्याणकारी योजनेअंतर्गत अधिकारी/कर्मचारी यांच्या सहकारी संस्थेतील समासदांच्या पात्रतेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरण कर्मचारी कल्याण योजनेअंतर्गत स्थापन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील ज्या समासदांनी संस्थेचे गाळे स्वीकारले आहेत वा पात्र ठरून स्वीकारणार आहेत त्यांच्याकडून (या आधी दिलेल्या क्षतिपूर्तीबंध पत्राव्यतिरिक्त) बाब टिप्पणीसोबत जोडलेले एक अतिरिक्त हमीपत्र घ्यावे. ज्यांना म्हाडा कर्मचारी या नात्याने कोणत्याही योजनेखाली जसे मालकी हक्काने, भाडेखरेदी पद्धतीने, सेवानिवासस्थान तसेच दोन टक्के म्हाडा आरक्षणातून गाळे घेतले आहेत त्यांनी असे गाळे म्हाडास परत करावेत, त्यानंतरच त्यांची सहकारी गृहनिर्माण संस्थेतील पात्रता निश्चित करावी.

अतिरिक्त हमीपत्रात त्यांनी असेही कबूल करावे की, प्राधिकरण कर्मचारी कल्याणकारी सहकारी गृहनिर्माण संस्थेतील गाळ्यांचा ताबा त्यांना सहकारी संस्थेकडून न घेता तो म्हाडाकडून घ्यावा. तोपर्यंत सदरहू गाळ्यावर म्हाडाचे संपूर्ण नियंत्रण राहील. तसेच कर्मचारी या नात्याने त्यांना मिळालेले व सध्या त्यांच्या ताब्यात असलेले निवासस्थान त्यांनी प्रथम म्हाडास परत केल्याशिवाय त्यांना सहकारी संस्थेकडून गाळ्याचा ताबा दिला जाणार नाही.

**Item No. 5 Resolution No.**

विषय : स. नं. १९१-अ, येरवडा येथील मंडळाच्या वसाहतीतील भूखंड 'डी' चे वितरणाबाबत समता नगर मागासवर्गीय सहकारी ग्राहक संस्था.

ठराव :

**Item No. 6 Resolution No. 5210**

विषय : हेंद्रे बिल्डींग या पुनर्रचित इमारतीमधील अतिरिक्त गाळ्यांच्या वाटपासाठी दर आणि हप्ते ठरविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) हेंद्रे बिल्डींग या पुनर्रचित इमारतीमध्ये १८० चौ. फूटपेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या जागेच्या दरात तडजोड नाही.

२) सहामाही रु. ५००० अधिक व्याज अशा प्रकारे हप्ते ठरवून ही जादा रक्कम वसूल व्हावी.

३) अनधिकृत गाळेधारकाला ही सवलत लागू होणार नाही.

४) अतिरिक्त असलेल्या गाळ्यांसाठी उपरोक्त सवलत लागू होणार नाही.

५) हा निर्णय फक्त हेंद्रे इमारतीपुरताच मर्यादित राहील.

**Item No. 7** **Resolution No. 5211**

विषय : श्री. आर. सी. जैन, माजी उपअभियंता यांनी दाखल केलेल्या अपिलावर प्राधिकरणाचा निर्णय.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. आर. सी. जैन, माजी उपअभियंता यांच्या प्रकरणी, उच्च न्यायालयाच्या निदेशाप्रमाणे त्यांची कैफियत प्राधिकरणापुढे मांडण्यास परवानगी देण्यात आली. श्री. जैन यांच्या अपिल अर्जातील विविध मुद्यांचा तसेच प्रशासनाने प्राधिकरणासमोर मांडलेले म्हणणे ऐकून त्यावर विचार करून तसेच संबंधित कार्यालयीन कागदोपत्री पुरावे यांचे अवलोकन करून उपरोक्त चर्चेअंती श्री. जैन यांचेवर ठेवलेले दोषाआरोप हे नि:संशयपणे सिद्ध झाले असल्याचे व त्यांना दिलेली शिक्षा ही योग्य आहे या निष्कर्षास प्राधिकरण आले आहे. यास्तव श्री. जैन यांना दिलेली शिक्षा कायम करून त्यांचे अपिल फेटाळण्यात येत आहे. प्राधिकरणाचा निर्णय श्री. जैन, माजी उपअभियंता आणि आवश्यकता असल्यास उच्च न्यायालयास विधी सल्लागार/प्रा. यांना कळवावेत.

**Item No. 8** **Resolution No.**

विषय : 'गृहनिर्माण महाप्रकल्प' दिनांक ३१.१२.९५ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No. 9** **Resolution No.**

विषय : भूकंप पुनर्वसन कामावर सास्तूर पेठसांगवी, माकणी येथे कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना विसा उतरविण्यासाठी मान्यता देण्याबाबत.

ठराव :

**Item No. 10** **Resolution No.**

विषय : लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील भूकंपग्रस्त पुनर्वसन प्रकल्पाबाबतचा अहवाल.

ठराव :

**Item No.** 11 **Resolution No.** 5212

विषय : पुणे मंडळाच्या प्रशासकीय इमारतीतील काही जागा वित्तीय संस्थांना वितरित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पुणे येथील गृहनिर्माण भवन या नवीन प्रशासकीय इमारतीशेजारी विश्रामगृहाच्या (रेस्ट हाऊस) जागी जुने विश्रामगृह सोडून नवीन ५ मजली इमारत बांधून त्यात प्रशिक्षणार्थी व शिक्षकांसाठी रहाण्याची सोय व उपहारगृहाची सोय करण्याबाबत मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या प्रस्तावास प्राधिकरण मान्यता देत आहे. त्याचवेळी अशी मान्यता देत असताना प्राधिकरण अशीही मान्यता देत आहे की, नवीन इमारत बांधण्यासाठी बांधकामाचा खर्च प्रशासकीय भवनातील तळमजल्यावरील ६३८.९८ चौ. मी. चा गाळा विकण्याऐवजी बँकांना किंवा तत्सम वित्तीय संस्थांना भाडेपट्ट्याने देण्यात यावा आणि नवीन इमारत बांधण्यासाठी खर्च प्राधिकरणाने आपल्या निधीतून करावा.

---

**Item No.** 12 **Resolution No.** 5213

विषय : स. क्र. १३८ (भाग-२) येथे १८७२ अल्प उत्पन्न गटासाठी (अंतर्बाह्य पायाभूत सुविधासहित) गाळे बांधणे 'अ' इमारतीच्या बांधकाम करण्याच्या निविदेत मंजूरी देणेबाबत.

ठराव : विषय क्रमांक १३९/१२ वर चर्चा करून,
एकमताने निर्णय घेतला की, राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत स. क्र. १३८, मानखुर्द येथील 'अ' इमारतीच्या बांधकामाची मे. माय कन्स्ट्रक्शन कंपनीची सर्वात कमी बोलीची रु. ४,३१,९८,७२१.०२ (अंदाजित रकमेच्या रु. ४,०९,४६,६५५/- च्या ५.५० प्रतिशत जास्त) किंमतीची निविदा मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यात यावी.

---

**Item No.** 13 **Resolution No.** 5214

विषय : इमारत क्र. २, तेजुकाया मेन्शन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, लालबाग, फ/ग दक्षिण विभाग येथील पुनर्रचना योजनेची निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव : विषय क्रमांक १३९/१२ वर चर्चा करून,
एकमताने निर्णय घेतला की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांतर्गत इमारत क्र. २, तेजुकाया मेन्शन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, लालबाग, फ/ग दक्षिण विभाग येथील पुनर्रचना योजनेची मे. स्वस्तिक कन्स्ट्रक्शन कंपनी यांची २२.८० टक्के अधिक दराची रु. १,२४,८८,३०९/- या किंमतीची निविदा ५ टक्क्यांनी कमी करून ते आता १७.८ टक्के निविदा किंमतीपेक्षा जास्त दराने काम करण्यास तयार असल्याने व त्यांनी दिलेले वाटाघाटीचे दर हे योग्य वाटत असल्यामुळे ही निविदा मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 14 **Resolution No.** 5215

विषय : प्राधिकरणामध्ये रिटेनर पद्धतीने डॉक्टरची नेमणूक करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, डॉ. वागळे यांची म्हाडातील रिटेनर म्हणून करण्यात आलेली नेमणूक समाप्त करण्यात यावी व नवीन रिटेनरच्या नेमणूकीकरिता वैद्यकीय क्षेत्रातील शैक्षणिक पात्रता एम.बी.बी.एस. असावी. दर महिन्याला रु. १०००/- मानधन व रिटेनर हे वांद्रे परिसरात वास्तव्य असणाऱ्यांना प्राधान्य द्यावे अशा पात्र अर्जदारांकडून वर्तमानपत्रात रीतसर जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत. तद्नंतर उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्तरावर याबाबत उचित निर्णय व्हावा. यापुढे याबाबत उपाध्यक्ष/प्रा. यांना सर्वाधिकार राहतील.
वरीलप्रमाणे बैठकीच्या मूळ विषयसूचीवरील व आयत्या वेळच्या विषयसूचीवरील विषय विचारार्थ घेण्यात आल्यावर आणि विचाराधीन सर्व प्रस्तावांवर उपरोक्त निर्णय झाल्यानंतर उपस्थितांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे सभा अध्यक्षांनी जाहीर केले.

**Meeting No.** **Special** **Meeting Date** **27-Feb-19**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १२-१-१९९६ रोजी झालेल्या १३९ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** **2** **Resolution No.** **5216**

विषय : प्राधिकरणाचे सन १९९६-९७ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व सन १९९५-९६ चे सुधारित अंदाजपत्रक मंजूर करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या सन १९९६-९७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर व सन १९९५-९६ च्या सुधारित अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होऊन दोन्ही अंदाजपत्रकास प्राधिकरणाने मंजूरी दिली.

**Item No.** **3** **Resolution No.**

विषय : प्राधिकरण व प्रादेशिक मंडळे यांची कर्मचारी वर्ग अनुसूची/वित्तीय वर्ष १९९६-९७ मंजूर करणे.

ठराव :

**Item No.** **4** **Resolution No.** **5217**

विषय : मे. मधु बिल्डर्स यांना पर्यायी जमीन देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मे. मधु बिल्डर्स यांच्या मालकीची मजासवाडी येथील ८२३६.७५ चौ. मी. जमीन मुंबई मंडळाने वापरली असल्यामुळे त्याच्या मोबदल्यात मे. मधु बिल्डर्स यांना ओशिवरा येथे जमीन प्रदान करीत असताना हा आकडा पूर्णांकित करून ८२५० चौ. मी. प्रदान करण्यात यावी. या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही मुंबई मंडळाने करावी.

बैठकीचा समारोप करताना मा. अध्यक्ष/प्रा. यांच्या अनुमताने मा. उपाध्यक्ष/प्रा. हे आपले मनोमत व्यक्त करताना म्हणाले की, या बैठकीत जी चर्चा झाली आहे,. त्याप्रकारची चर्चा पूर्वी कधीच ऐकावयास मिळाली नव्हती. या चर्चेच्या माध्यमातून मा. सदस्य/प्रा. व सर्व सभापतींकडून आपणास पुष्कळच मार्गदर्शन मिळाले असे म्हणून त्यांनी विभागीय मंडळाचे सभापती मंडळाच्या कामकाजात पुष्कळ रस घेत असल्यामुळे कार्यपद्धतीत निश्चितच सुधारणा दिसून येईल असा विश्वास व्यक्त केला.

बैठकीच्या उत्तरार्धात श्री. कारखानी, सदस्य/प्राधिकरण यांनी म्हाडाच्या कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन योजना लागू करण्यासंबंधीची बाब टिप्पणी प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत घेण्यात यावी, असे आग्रहपूर्वक मा. अध्यक्ष/प्रा. यांना विनंती केली. या विनंतीनुसार मा. अध्यक्ष/प्रा. यांनी म्हाडाच्या कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन योजना लागू करण्यासंबंधीची बाब टिप्पणी पुढील बैठकीत प्राधिकरणासमोर सादर करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

वरीलप्रमाणे बैठकीच्या मूळ विषयसूचीवरील व आयत्या वेळच्या विषयसूचीवरील विषय विचारार्थ घेण्यात आल्यावर आणि विचाराधीन सर्व प्रस्तावांवर उपरोक्त निर्णय झाल्यानंतर उपस्थितांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे सभाअध्यक्षांनी जाहिर केले.

**Meeting No.** **140** **Meeting Date** **07-Jun-19**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या दि. २७/२/१९९६ रोजी झालेल्या विशेष बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** **12** **Resolution No.** **5218**

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी म्हाडातर्फे संक्रमण शिबिरे बांधण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई शहरामध्ये महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी म्हाडातर्फे संक्रमण शिबिरे बांधण्याबाबत बाब टिप्पणी क्र. १४०/१२, दिनांक ७/६/१९९६ मध्ये उल्लेख केलेल्या विविध प्रस्तावांना संजूरी देण्यात येत आहे. प्रकल्पाची तातडीची गरज लक्षात घेता या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.
वरीलप्रमाणे ठराव केल्यानंतर व चर्चा झाल्यानंतर मा. अध्यक्ष/प्रा. यांनी सभागृहाच्या असे निदर्शनास आणून दिले की, मा. मंत्रीमहोदय (गृहनिर्माण) यांनी दि. ७/६/१९९६ रोजी दुपारी ३.०० वाजता म्हाडाच्या नियंत्रणाखाली विविध मंडळांमार्फत कार्यान्वित होणाऱ्या विविध कामासंबंधी चर्चा करण्यासाठी लोकप्रतिनिधींची म्हाडामध्येच बैठक आयोजित केलेली असल्यामुळे त्या बैठकीस उपस्थित राहणे गरजेचे असल्याने सदरहू बैठक येथे स्थगित करण्यात आली व हीच बैठक क्रमशः दिनांक १७/६/१९९६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

**Meeting No.** 140 **Meeting Date** 17-Jun-19

**Item No.** 2 **Resolution No.** 5219

विषय : प्राधिकरण व प्रादेशिक मंडळे यांची कर्मचारी वर्ग अनुसूची वित्तीय वर्ष ९५-९६ मंजूर करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत नमूद करण्यात आलेल्या १९९६-९७ या वित्तीय वर्षासाठी कर्मचारीवर्ग अनुसूचीस मान्यता देण्यात येत आहे. तसेच या कर्मचारीवर्ग अनुसूचीत आवश्यकतेनुसार किरकोळ बदल, पदांचे पुनर्नामभिकरण (रिडेसिग्नेशन), पदांची अदलाबदल, आवश्यक तेथे राखीव गटात पदे समाविष्ट करणे, पदांचे फेरवाटप (रिडिस्ट्रिब्युशन), पदे परावर्तित करणे (डायव्हर्शन), राखीव पदातील पदे कार्यान्वित करणे (अॅक्टिव्हेट) तसेच आवश्यकतेनुसार पदांची निर्मिती करणे इत्यादींबाबतचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 3 **Resolution No.** 5220

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण आणि ह्युमन सेटलमेंट मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटमधील परस्पर सहकाराच्या कराराचा कालावधी मार्च, १९९७ पर्यंत वाढविणेबाबत.

ठराव : बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे प्राधिकरणाची ही सभा प्राधिकरण व एच.एस.एम.आय. या संस्थेमधील प्राधिकरणाच्या ठराव क्र. ४०६३, दिनांक ८/४/१९९३ अन्वये झालेल्या करारास दिनांक ३१/३/१९९७ पर्यंत वाढविण्यास एकमताने मंजूरी देत आहे. ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायी होण्याची वाट न पाहता करण्यात यावी.

**Item No.** 4 **Resolution No.** 5221

विषय : 'गृहनिर्माण व नागरी दर्शक फलक कार्यक्रम' या कार्यक्रमासाठी विकास अभ्यास संस्था, नवी दिल्ली यांना रु. २ लाखाची हुंडी देणेबाबत.

ठराव : बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाकडून आवश्यक तो खुलासा झाल्यानंतर सदर रु. २ लाखाची दर्शनी हुंडी विकास अभ्यास संस्था, नवी दिल्ली यांचे नावे शासनाच्या आदेशाप्रमाणे काढण्यास एकमताने मंजूरी देण्यात आली.

**Item No.** 5 **Resolution No.** 5222

विषय : सुभाष नगर, चेंबूर येथे स्वयंसिद्ध इंडस्ट्रियल को-ऑप-सोसायटी लि. या अपंगांच्या संस्थेस वितरित केलेल्या गाळा क्र. ३ व ४ ची किंमत कमी करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, अनिवासी प्रयोजनाचे प्राधिकरणाचे अधिकृत गाळेधारकास मूळ किंमतीचे ३ पट किंमत आकारली जाते. हीच किंमत या स्वयंसिद्ध संस्थेला सुद्धा आकारावयास मान्यता देण्यात येते. दादर वाचनालयाकडील परस्पररित्या २ गाळे या संस्थेने गरज म्हणून वापरासाठी घेतले. या व्यवहारात म्हाडाची पूर्व परवानगी न घेतल्यामुळे संस्थेला अनधिकृत गाळेधारक समजून दिनांक ७/९/१९८७ च्या १४४६ या ठरावान्वये ५ पट किंमत आकारण्यात आली होती. ती आता ३ पट आकारावी, जेणेकरून संस्थेला त्यांचा आर्थिक व्यवहार सुरळीत चालविण्यास मदत होईल. दिनांक ४/६/९१, १९१८ या ठरावान्वये २ गाळे विक्री करण्याचा मूळ हेतू विचारात घेऊन दंडात्मक किंमतीत सूट देण्याच्या प्रस्तावासस खालील अटींवर मंजूरी देयणत येत आहे.

१) सदरहू संस्थेला भविष्यकाळामध्ये हे गाळे परस्पररित्या दुसऱ्या संस्थेला विक्री करता येणार नाहीत, आणि यदाकदाचित विकल्यास त्याची मालकी आपोआप म्हाडाकडे येईल.

२) दर तीन वर्षांनी ही बाब नूतनीकरणासाठी मुंबई मंडळापुढे ठेवावी लागेल.

**Item No.** 6 **Resolution No.** 5223

विषय : पुणे मंडळाचे प्रश्शासकीय इमारतीमधील काही जागा वित्तीय संस्थांना वितरित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे येथील प्रशासकीय इमारतीशेजारील जुने विश्रामधाम पाडून त्या जागी पी.डी.सी. अंतर्गत प्रशिक्षणार्थींच्या निवासासाठी हॉस्टेल व इतर वापरासाठी इमारत बांधण्याच्या बांधकामाचा खर्च भागविता यावा. म्हणून जुन्या प्रशासकीय इमारतीतील ६३८.९८ चौ. मी. जागा वित्तीय संस्थांना विक्री करण्यात येऊ नये तसेच भाड्यानेही देण्यात येऊ नयेत.

पी.डी.सी.अंतर्गत प्रशिक्षणार्थींच्या निवासासाठी हॉस्टेल व इतर वापरासाठी इमारत बांधण्याचा बांधकामाचा खर्च म्हाडाच्या निधीतून भागविण्यात यावा.

**Item No.** 7 **Resolution No.** 5224

विषय : महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड एम्प्लॉईज को-ऑप-क्रेडिट सोसायटी लि. यांना ठेव देण्याबाबत.

ठराव : प्राधिकरणाने विचार करून निर्णय घेतला की,

महाराष्ट्र हौसिंग एम्प्लॉईज को-ऑप-क्रेडिट सोसायटी लि. यांना रुपये २०.०० लाख ठेव १२ टक्के प्रतिशत वार्षिक दराने व्याज आकारून दरमहा रु. २.०० लाख याप्रमाणे १० समान मासिक हप्त्यांत व्याजासहित परतफेड करण्याच्या अटींवर देण्याच्या प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : 'गृहनिर्माण महाप्रकल्प' दि. ३०/४/१९९६ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.** 5225

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन योजना लागू करून घेऊन फंड वर्धनक्षम करण्यासाठी प्राधिकरणाच्या अतिरिक्त निधीमधून रु. १३.३१ कोटी रक्कम वर्ग करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना दिनांक १/४/१९८७ पासून निवृत्ती वेतन योजना महाराष्ट्र शासनाच्या निवृत्ती वेतन योजनेच्या नियम १९८२ व त्यात पुढे अपेक्षित असलेल्या सुधारणांच्या अधीन राहून शासनाची मंजूरी मिळाल्याच्या दिनांकापासून किंवा १/४/१९९५ पासून अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येते.
तसेच १/४/१९८७ ते ३१/३/१९९५ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना पेन्शन योजनेचा विकल्प खुला ठेवण्यात येत आहे.
सेवानिवृत्ती वेतनाचा फायदा मिळावा म्हणून विकल्प घेण्यासही मान्यता देण्यात येत आहे, मात्र त्यांना थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही.
या योजनेकरिता स्वतंत्र पेन्शन फंड तयार करून हा फंड वर्धनक्षम करण्याकरिता रु. १३.३१ कोटी रक्कम प्राधिकरणाच्या अतिरिक्त निधीमधून वर्ग करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. मात्र लेखे स्वतंत्र ठेवण्यात यावेत व हा फंड निवृत्ती वेतनदायीत्वासाठीच वापरण्यात यावा.
कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता या ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी.
अंतिम मंजूरीसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 10 **Resolution No.** 5226

विषय : व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र, पुणे येथे संचालकांच्या कंत्राटी नेमणूकीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना पुढील तीन वर्षात योग्य मार्गदर्शन करणारे व गुणवत्ता विकसित करू शकणारे अधिकारी प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातून तीन वर्षांच्या कंत्राटी कालावधीसाठी संचालकांची नेमणूक रु. ३ लक्ष अधिक आवश्यक सोयींनी युक्त असे मोफत घर या सुविधांसह करण्यास मान्यता देण्यात येते. याबाबतची पुढील सर्व कार्यवाही उपाध्यक्ष/प्रा. यांच्या स्तरावर करण्यास मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 11 **Resolution No.** 5227

विषय : ओव्हरसीज डेव्हलपमेंट ॲडमिनिस्ट्रेशन यु. के. अंतर्गत प्राधिकरणातील १ प्रशिक्षणार्थींना डेव्हलपमेंट प्लॅनिंग युनिट लंडन येथे ४० दिवसांच्या प्रशिक्षणासाठी पाठविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, म्हाडा/पी.डी.सी. तर्फे निवड होणाऱ्या प्राधिकरणातील १२ प्रशिक्षणार्थींना डेव्हलपमेंट प्लॅनिंग युनिट, लंडन येथे ४० दिवसांच्या प्रशिक्षणासाठी प्राधिकरणाच्या वाहतूक खर्चाने पाठविण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

**Item No.** 13 **Resolution No.** 5228

विषय : उपकरप्राप्त इमातींना लावण्यात आलेल्या वर्गवारीत बदल करण्याबाबत.

ठराव : मुंबई बेटावरील जुन्या उपकरप्राप्त इमारतींच्या वर्गवारील खालीलप्रमाणे बदल करण्याच्या प्रस्तावास व सदर प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

| प्रस्तावित वर्गवारी | आधारभूत बांधकामाचा प्रस्तावित वर्गवारीसाठी प्रस्तावित कालावधी |
|---|---|
| अ | दिनांक ३१ डिसेंबर, १९५० पूर्वी बांधण्यात आलेल्या इमारती |
| ब | दि. १ जानेवारी, १९५१ ते दि. ३१ डिसेंबर, १९६० या कालावधीत बांधलेल्या इमारती |
| क | दि. १ जानेवारी, १९६१ ते मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना कायदा १९६९ ज्या दिवशी कार्यान्वित झाला त्या दिवसापर्यंत बांधण्यात आलेल्या इमारती. |

**Item No.** 14 **Resolution No.** 5229

विषय : पुनर्रचित इमारतींमध्ये २२५ चौ. फू. चटईक्षेत्रफळाचे गाळे उपलब्ध करून देण्याविषयी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे पुनर्रचित करण्यात येणाऱ्या इमारतींमध्ये किमान २२५ चौ. फू. चटईक्षेत्राचे गाळे उपलब्ध करून देण्यासाठी अधिक चटईक्षेत्र निर्देशांक, मासिक भाड्यात वाढ, मालकी तत्वावर बांधकामास प्राधान्य आणि शासकीय व महानगरपालिकेच्या अनुदानात वाढ या अटींवर शासनाची मान्यता मिळण्यासाठी शासनास प्रस्ताव पाठविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 15 **Resolution No.** 5230

विषय : मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीकरिता दुरुस्ती खर्चाची मर्यादा रु. ७५०/- प्रति चौ. मी. वरून रु. १०००/- प्रति चौ. मी. पर्यंत वाढविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणास महानगरपालिकेकडून मिळणाऱ्या अंशदानात तसेच शासनाकडून सध्या मिळणाऱ्या अनुदानात वाढ करण्यात येईल या अटीवर मुंबई शहरातील जुन्या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीची मर्यादा रु. ७५०/- प्रति चौ. मी. वरून रु. १,०००/- प्रति चौ. मी. पर्यंत वाढविण्यात शासनाची मान्यता मिळवण्यासाठी शासनास प्रस्ताव पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

**Item No.** 16 **Resolution No.** 5231

विषय : ओशिवरा येथील गृहनिर्माण महाप्रकल्पांतर्गत टप्पा-२ मधील सात गटांमध्ये कार्यरत इमारतींसाठी भूखंडाच्या सीमेवर तुंपण भिंतीची पुनर्बांधणी करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, याबाबत मुंबई मंडळ सक्षम असल्याने त्यांचे स्तरावर कार्यवाही व्हावी आणि त्यानंतर पूर्वीच्या संरक्षक भिंतीसाठी जो रु. ३० लाख अनाठायी खर्च झालेला आहे तो निर्लेखित करावयाचा झाला तर याबाबत प्राधिकरणाची मंजूरी आवश्यक राहील. यासाठी मुंबई मंडळाने स्वतंत्र प्रस्ताव पाठवावा.

**Item No.** 17 **Resolution No.** 5232

विषय : मुंबई बेटावरील पुनर्रचित इमारतींमधील गाळ्यांचे हस्तांतरण नियमित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई बेटावरील पुनर्रचित इमारतींमधील गाळ्यांचे हस्तांतरण/नियमितीकरण करण्याबाबत व वाढीव दंडात्मक रकमेस मंजूरी मिळण्याबाबत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने सादर केलेला प्रस्ताव विचारात घेता तसेच पुनर्रचित इमारतीतील गाळे अस्तित्वात नसलेल्या बोगस व्यक्तींना यापूर्वी वाटप झाल्याच्या काही घटना अनधिकृत व्यक्तींनी पुनर्रचित इमारतीतील गाळे गैरमार्गाने मिळविण्याच्या नियमबाह्य घटना विचारात घेता खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येते.

१) हस्तांतरणाचा प्रस्ताव असलेल्या गाळ्यांचे वाटप मूलतः पात्र व मूळ भाडेकरूंना झाले आहे व मूळ वाटपात कोणत्याही प्रकारची अनियमितता नाही, याची खात्री करावी.

२) ज्या अनधिकृत व्यक्तीस गाळा नियमित करावयाचा त्या व्यक्तीने गैरमार्गाने व बेकायदेशिररित्या गाळा प्राप्त केलेला नाही, याची खात्री मूळ गाळेधारकांकडून प्रत्यक्ष करणे.

३) ज्या गाळ्यांचे वाटप २० टक्के शासन स्वेच्छाधिकारातून अनियमितपणे झाले आहे असे गाळे या नियमाकुल योजनेतून वगळणे.

४) नियमबाह्य व बोगसरित्या वाटप झालेल्या गाळ्यांची अदलाबदल यादी मुख्याधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी प्रमाणित करणे.

५) मुख्याधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांची हस्तांतरणाच्या/नियमितीकरणाच्या प्रत्येक प्रकरणी मान्यता घेणे. याबाबत स्थायीकरणाची वाट न पाहता उक्त अटींनुसार कार्यवाही करण्यात यावी.

---

**Item No.** 18 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या दि. १२/१/१९९६ रोजी झालेल्या १३९ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल.

ठराव :

---

**Item No.** 19 **Resolution No.**

विषय : पवई येथील गृहनिर्माण महाप्रकल्प कंत्राटातून वगळलेल्या स्टिल्ट अधिक ७ मजली ९ इमारतींऐवजी स्टिल्ट अधिक १४ मजली उत्तुंग इमारत बांधण्यास परवानगी देण्याची विकासकांनी केलेली विनंती.

ठराव :

---

**Meeting No.** 141 **Meeting Date** 20-Jul-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ७-६-१९९६ व १७-६-१९९६ रोजी झालेल्या १४० व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या दि. १२.१.९६ रोजी झालेल्या १३९ व्या बैठकीत व दिनांक २७.२.१९९६ रोजी झालेल्या विशेष बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल तसेच १४० व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाची कार्यवाही.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 5233

विषय : राज्य शासनाच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडून करण्यात येत असलेल्या गुंतवणूकीसंबंधित मार्गदर्शक तत्वे

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक पीएसयू-११९५/सीआर-३ पीएसयू, दिनांक ६.१०.१९९५ द्वारे गुंतवणूकीबाबतच्या मार्गदर्शक तत्वांची प्राधिकरणाने नोंद घेतली. यापुढील प्राधिकरणाच्या अतिरिक्त (आयडल) निधीची गुंतवणूक या तत्वानुसार सध्या प्रचलित असलेल्याच अधिकार प्रदानतेत करण्यासही मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 4 **Resolution No.** 5234

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत प्रादेशिक मंडळाची कामे देण्यासाठी सुशिक्षित बेकार व बेरोजगार अभियंत्यांना सवलती व नोंदणीचे नियम.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णयानुसार प्राधिकरणाकडे सुशिक्षित बेकार व बेरोजगार अभियंत्यांना नोंदणी करण्यास मान्यता देण्यात येते. नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांनी मागणी केल्यास शासन निर्णय २.२.९६ मधील अटी व शर्तीच्या अधीन राहून १० टक्के पर्यंत अग्रिम देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : 'गृहनिर्माण महाप्रकल्प' दिनांक ३०.६.१९९६ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी म्हाडातर्फे संक्रमण शिबिरे बांधण्याबाबत. कार्यवाहीचा आढावा.

ठराव :

**Item No.** 7 **Resolution No.** 5235

विषय : 'अखिल भारतीय गृहनिर्माण विकास संघटने'ला त्यांच्या इमारत निधीसाठी रु. १.०० लक्ष अनुदान देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, 'अखिल भारतीय गृहनिर्माण विकास संघटने'ला त्यांच्या इमारत निधीसाठी रु. १.०० लक्ष अनुदान देण्यात येत आहे.

**Item No.** 8 **Resolution No.** 5236

विषय : शिस्तभंगाची कारवाई म्हणून विभागीय चौकशी पूर्ण करून दिलेल्या शिक्षा रद्द करण्यासाठी श्री. के. एस. फातरपेकर, का. अ. (विद्युत)/प्रा. यांनी प्राधिकरणास सादर केलेल्या अपिलाचे अवलोकन करून निर्णय घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. के. एस. फातरपेकर, कार्यकारी अभियंता (विद्युत) यांना त्यांना देण्यात आलेल्या शिक्षेविरुद्ध म्हाडा पुढे केलेल्या अपिलाचा विचार करण्यात आला व त्यांना देण्यात आलेल्या शिक्षेत कोणत्याही प्रकारचा फेरविचार न करता त्यांचे अपिल ना-मंजूर करण्यात आले.

**Item No.** 9 **Resolution No.** 5237

विषय : मुंबईतील मंडळाचे निविदा स्वीकृतीचे अधिकार वाढविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबईतील मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ व मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ तसेच मुंबई गलिच्छ वस्ती सुधार मंडळाचे निविदा स्वीकृतीचे अधिकाररु. ५००/- लाख पर्यंत वाढविण्यात येत आहेत. तसेच मुंबईतील मंडळाच्या अधिकाऱ्यांना निविदा मंजूरीचे जे अधिकार उपलब्ध आहेत तेच अधिकार प्रादेशिक मंडळातील समकक्ष अधिकाऱ्यांना राहतील. जेणेकरून सध्या मुंबईतील मंडळाच्या प्रादेशिक मंडळातील अधिकाऱ्यांच्या अधिकारातील विसंगती दूर होईल. या अधिकाऱ्यांच्या अधिकारातील निविदांच्या रकमेपेक्षा जास्त रकमेपेक्षा निविदा आवश्यकतेनुसार मंडळाकडे वा प्राधिकरणाकडे निर्णयाकरिता पाठवाव्यात. मंडळाचे व अधिकाऱ्यांचे निविदा स्वीकृतीचे अधिकार बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' प्रमाणे राहतील. या ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

**Item No.** 10 **Resolution No.** 5238

विषय : औरंगाबाद परिसरातील वाळुंज येथे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून म्हाडा कार्यरत असताना अर्जदाराकडून घेतलेली विकास वर्गणी परत करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, वाळुंज येथे वि. नि. प्रा. म्हणून म्हाडा कार्यरत असताना १५ जमीन मालकांकडून घेतलेली एकूण रक्कम रु. १२,४९,२१२/- (रु. बारा लक्ष एकोणपन्नास हजार दोनशे बारा) परत करण्यात यावी व म्हाडाने केलेला खर्च सिडकोकडून परत मिळण्याकरिता शासनाकडे पत्रव्यवहार करावा. याबाबतची कार्यवाही मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी कार्यवृत्त स्थायी होण्याची वाट न पाहता त्वरित करावी.

---

**Item No.** 11 **Resolution No.**

विषय : सरदार नगर, सायन-कोळीवाडा येथील सी.टी.एस.क्र. १२ च्या भूखंडावरील समाज मंदिर हॉलच्या पुनर्विकास व निवासी गाळ्यांच्या योजना.

ठराव :

---

**Item No.** 12 **Resolution No.**

विषय : निर्मलनगर, वांद्रे-पूर्व येथे से. गौशिया कंपाऊंड या सहकारी संस्थेस देण्यात आलेल्या जमिनीचे क्षेत्र कमी करण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 13 **Resolution No.** 5239

विषय : पुनर्रचित इमारत ९-अ/ब, वाणी चाळ, परेल, मुंबई येथील अतिरिक्त गाळे मुंबई महानगरपालिकेस हस्तांतर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पुनर्रचित इमारत ९-अ/ब, वाणी चाळ, परेल, मुंबई येथील अतिरिक्त गाळ्यांपैकी ३८ गाळे मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित करण्यात यावेत परंतु दि. १५.७.९६ रोजी महापौरांसोबत झालेल्या बैठकीमध्ये उपाध्यक्ष/प्रा. यांनी जो प्रस्ताव दिला होता त्याप्रमाणे कायदेशीर बाबींचा याप्रकरणी पूर्ण निर्णय लागेपर्यंत महापालिकेने सदरचे ३८ गाळ्यांचे वाटप कोणासही करू नये, तसेच या गाळ्यांचा वापरही करू नये अशी स्पष्ट अट घालून महापालिकेस कळविण्यात यावे.

**Item No.** 14 **Resolution No.** 5240

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पाच्या संक्रमण शिबिरातील चाळ क्र. ३१ मधील ३४ गाळे महात्मा फुले शिक्षण संस्थेला तात्पुरत्या स्वरुपात देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, 'महात्मा फुले शिक्षण संस्थे'ला राजीव गांधी प्रकल्पाच्या धारावी संक्रमण शिबिरातील चाळ क्र. ३१ मधील तूर्त फक्त ८ गाळे खालील अटींवर देण्यात यावेत.

१) सुरुवातीस भाडेपट्ट्याचा कालावधी एक वर्षाचा राहील व १ वर्षानंतर संस्थेने प्राधिकरणाकडे मुदतवाढीकरिता फेर अर्ज करावा.
२) मुंबई इ.दु. व पु. मंडळाने संक्रमण शिबिरातील शाळेसाठी वा अशा प्रकारच्या अन्य प्रयोजनासाठी गाळ्याचे वाटप केले आहे त्या धर्तीवर आज रोजी लागू होणारे भाड्याचे दर निश्चित करून त्यानुसार भाडे आकारणी करण्यात यावी. तसेच प्राधिकरणाच्या/मंडळाच्या/प्रकल्पाच्या प्रचलित धोरणानुसार या भाड्यात वाढ झाल्यास त्यानुसार सदर संस्थेकडून भाडे प्रकल्पास देय राहील.
३) हे गाळे दुरुस्ती करण्यासाठी जो काही खर्च होणार आहे तेवढी रक्कम संस्थेकडून सिक्युरिटी डिपॉझिट म्हणून घ्यावी.
४) दुरुस्तीचा खर्च प्रकल्पाने करावा.
५) गाळ्यांच्या वितरणाअगोदर संस्थेची नोंदणी, तसेच शाळेच मान्यता इत्यादी बाबी तपासून घेण्यात याव्यात.

**Item No.** 15 **Resolution No.** 5241

विषय : स्लोव्हाकिया येथील आंतरराष्ट्रीय तांत्रिक परिषदेत उपस्थित राहण्याकरिता श्री. ए. एम. महाजन, मुख्य अभियंता यांना पुरस्कृत करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, स्लोव्हाकिया येथील आंतरराष्ट्रीय तांत्रिक परिषदेस उपस्थित राहण्याकरिता श्री. ए. एम. महाजन, मुख्य अभियंता यांना या संबंधातील शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वांना अधीन राहून पुरस्कृत करण्यात येत आहे व त्यासाठी येणाऱ्या अंदाजित खर्च रु. ७०,०००/- या खर्चास मान्यता देण्यात येते. हा खर्च प्राधिकरणाच्या संशोधन व प्रशिक्षण या शिबिरामधून करण्यात यावा. तसेच या ठरावाचे कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 16 **Resolution No.** 5242

विषय : पवई येथील गृहनिर्माण महाप्रकल्प कंत्राटातून वगळलेल्या स्टिल्ट अधिक ७ मजली ९ इमारतींऐवजी स्टिल्ट अधिक १४ मजली उत्तुंग इमारती बांधण्यास परवानगी देण्याची विकासकांनी केलेली विनंती.

ठराव : प्राधिकरणाने बहुमताने असा निर्णय घेतला की, पवई येथील गृहनिर्माण महाप्रकल्प कंत्राटातून वगळलेल्या उच्च उत्पन्न गट - २ मधील स्टिल्ट आणि ७ मजली ९ इमारतींऐवजी उच्च उत्पन्न गट - ३ खालील स्टिल्ट आणि १४ मजली ५ उत्तुंग इमारती बांधण्यास विकासक मे. बी. जी. शिर्के यांनी केलेल्या विनंतीनुसार परवानगी देण्यात येत आहे.

सदर विकासकांनी यानुसार काम केल्यास त्यांना कार्यादेश दिला, त्यावेळेस म्हणजे दिनांक १४/३/१९९१ रोजी मंजूर केलेला दर अधिक कंत्राटानुसार देय असणारे एस्कलेशन अधिक प्राधिकरणाने दिनांक २.६.९३ च्या बैठकीत स्टिल्ट आणि १४ मजली इमारतींकरिता देय ठरविलेली प्रति गाळा रु. १.५० लाख ही रक्कम व त्यावरील एस्कलेशन असा दर या कामासाठी सदर विकासकास देय राहील.

याशिवाय प्राधिकरणाचा ठराव क्र. ५१६९ दिनांक २०.३.९५ नुसार सुधारित स्पेसिफिकेशन करिता प्राधिकरणाने मंजूर केलेली रक्कम या कामासाठी सदर विकासकास देय राहील.

मात्र उपाध्यक्ष/प्रा. यांनी या ठरावास विरोध नोंदवून असहमती दर्शविली.

यानंतर सभापती/मुं.मं. यांनी मा. अध्यक्ष/प्रा. यांना दिनांक २०.७.९६ रोजी दिलेल्या खालील विषयांवर आयत्यावेळी चर्चा करून निर्णय घेण्यात आला.

**Item No.** 17 **Resolution No.** 5243

विषय : राजेंद्र नगर, बोरिवली (पूर्व) येथील राजेंद्र नगर, कन्झुमर्स सोसायटीजवळ झुणका भाकर केंद्र उघडण्यासाठी जागा वितरण करणेविषयी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, राजेंद्र नगर, बोरिवली येथे राजेंद्र नगर कन्झुमर्स सोसायटीच्या पाठीमागे उपलब्ध असलेल्या ९१ चौ. मी. क्षेत्रफळाच्या जमिनीमधून सुमारे २०० चौ. फू. क्षेत्रफळाच्या म्हाडाच्या भूखंडावर राजेंद्र नगर सार्वजनिक श्री गणेशोत्सव मंडळ या संस्थेस झुणका भाकर केंद्रासाठी रु. १००/- प्रति वर्षाला नाममात्र भाड्यावर वापरण्यास परवानगी देण्यात यावी. ही परवानगी फक्त उक्त वापरासाठीच राहील. सदर भूखंडाची मालकी व सर्व हक्क म्हाडाकडेच राहतील व सदर संस्थेला या भूखंडावर कोणताही हक्क व अधिकार असणार नाही. सदर भूखंडाचा वापर विहित प्रयोजनासाठी न झाल्यास सदर परवानगी आपोआप रद्द ठरेल.

वरीलप्रमाणे बैठकीच्या मूळ विषयसूचीवरील व आयत्यावेळच्या विषयसूचीवरील विषय विचारार्थ घेण्यात आल्यावर आणि विचाराधीन सर्व प्रस्तावावर उपरोक्त निर्णय झाल्यानंतर उपस्थितांचे आभार मानून बैठकीचे काम संपल्याचे सभा अध्यक्षांनी जाहीर केले.

**Meeting No.** 142 **Meeting Date** 07-Sep-19

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या दि. १२.१.९६ रोजी झालेल्या १३९ व्या बैठकीत व दि. २७.२.९६ रोजी झालेल्या विशेष बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल तसेच १४० व १४१ या बैठकींत घेतलेल्या निर्णयाचा अनुपालन अहवाल.

ठराव :

---

**Item No.** 3 **Resolution No.** 5244

विषय : औरंगाबाद मंडळाने बामूळ गाव रोड, लातूर येथे बांधलेले अल्प उत्पन्न गटाचे २८ गाळे व मध्यम उत्पन्न गटातील २२ गाळे वाटपाबाबत.

आरंभाची रक्कम भरण्यास सवलत देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, औरंगाबाद मंडळाने बामूळ गाव रोड, लातूर येथील गाळ्यांसाठी आय.डी.पी. बाबत मंडळाचा ठराव क्र. ६०५ अन्वये घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे व अमरावती मंडळाने बडनेरा येथील गाळ्यांसाठी आय.डी.पी. ३ हप्त्यांनी भरण्यासाठी मागितलेल्या परवानगीस मंजूरी देण्यात येत आहे.

---

**Item No.** 4 **Resolution No.** 5245

विषय : हुडको अर्थसहाय्यित योजनांसाठी २.५.९६ पासून अंमलात आणलेली सुधारित प्रमाणपद्धती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, हुडको अर्थसहाय्यित योजनांसाठी दि. २.५.९६ पासून अंमलात आलेली सुधारित प्रमाणपद्धती संबंधी प्राधिकरणाने नोंद घेतली व प्राधिकरण राबवित असलेल्या निरनिराळ्या उत्पन्न गटातील योजनांसाठी सुधारित व्याजाच्या दरासंबंधी हुडकोची दि. २.५.९६ पासून अस्तित्वात आलेली प्रमाणपद्धती प्राधिकरणाने अवलंबन करण्यास मान्यता दिली.

---

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : 'गृहनिर्माण महाप्रकल्प' दि. ३१.७.९६ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

---

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : अर्धवेळ सफाई कामगार व पंप अटेंडंट यांच्या एकत्रित वेतनामध्ये सुधारणा करण्याविषयी.

ठराव :

---

**Item No.** 7 **Resolution No.** 5246

विषय : नागपूर सुधार प्रन्यासकडून नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने भाडेपट्टीवर घेतलेल्या जमिनीवर जमिनीच्या अधिमूल्यावर भाडेपट्टा आकारणीच्या दराबाबत शासनाचे आदेश.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, या विषयाबाबत शासनाने निर्गमित केलेले आदेश रद्द करून याबाबीत पुनर्विचार करून सुधारित आदेश निर्गमित करण्यासाठी सदरहू प्रकरण पुन्हा शासनाकडे पुनर्विचारार्थ पाठविण्यात यावे.

**Item No.** 8 **Resolution No.** 5247

विषय : महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांना भुसावळ येथील मध्यम उत्पन्न गटातील ४५ गाळ्यांपैकी २५ गाळे वितरणाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, शासनाच्या मान्यतेसाठी सदरहू प्रस्ताव पाठविण्यात यावा.

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी म्हाडातर्फे संक्रमण शिबिरे बांधण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.** 5248

विषय : हरयाणा स्टेट कॉर्पोरेशन सप्लाय ॲन्ड मार्केटिंग फेडरेशन लि. चंदिगढ यांच्याकरिता नवी मुंबई, वाशी येथे गोदामाचे बांधकाम म्हाडातर्फे एजन्सी बेसीसवर करून देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीमध्ये प्रस्तावित केल्यानुसार हरयाणा स्टेट कॉर्पोरेशन सप्लाय ॲन्ड मार्केटिंग फेडरेशन लि. चंदिगढ यांच्याकरिता वाशी, नवी मुंबई येथे गोदामाचे बांधकाम म्हाडातर्फे १२.५० टक्के एजन्सी दराने करण्याकरिता मंजूरी देण्यात येते. या ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

**Item No.** 11 **Resolution No.** 5249

विषय : कोकण मंडळाच्या कार्यक्षेत्रातील मीरा रोड (पूर्व) येथील १६८ गाळे (दोन इमारती) बांधावयाच्या ३.३. गटातील कामाच्या निविदावर निर्णय घेण्याबाबत.

ठराव : बाब टिप्पणीत विशद केलेल्या माहितीनुसार प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, मुंबई व मुंबई महानगरप्रदेशात निवासी गाळ्यांच्या किंमती घसरत आहेत, त्यामुळे मीरा रोड या क्षेत्रातदेखील उच्च उत्पन्न गटाच्या निविदा स्वीकारणे उचित होणार नाही. कोकण मंडळाने या परिस्थितीचा अभ्यास करून उच्च उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गटातील गाळ्यांची मागणी आजमावून पुन्हा निविदा मागविण्यात याव्यात.

**Item No.** 12 **Resolution No.** 5250

विषय : मुंबई बेटातील इमारतीविषयी दि. ३.९.९६ रोजी कोसळलेल्या तवाडीया इमारतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्रयोगाखातर ५ वॉर्डातील ५ इमारतींची निवड करून इमारतींची सर्वंकष तपासणी करावी. अशा तपासणीकरिता इमारतीतील गाळ्यांचे कृत्रिम छत काढणे, प्लॅस्टर तोडणे व रंग काढणे व तपासानंतर भाडेकरूंना घरांची पूर्वीसारखी स्थिती करून देण्यासाठी दुरुस्ती करून देणे यासाठी प्राधिकरणाला जादाचा खर्च करावा लागणार आहे. हा सर्व म्हाडाने संशोधन व प्रशिक्षण या शीर्षकातून करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

यानंतर मा. उपाध्यक्ष/प्रा. यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या स्टॅपिंग पॅटर्नचा मुद्दा उपस्थित करताना सांगितले की, राजीव गांधी प्रकल्पातील कर्मचारी वृंदाला नवीन प्राधिकरणास सामावून घेण्याबाबत त्या प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याशी चर्चा करावी लागेल आणि याबाबतीत त्यांच्याशी चर्चा करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

श्री. नंदू साटम, सदस्य/प्रा. म्हणाले की, या प्रकल्पातील कर्मचाऱ्यांची वयोमर्यादा आता होऊन गेलेली आहे. या प्रकल्पात त्यांची १०/१० वर्षे सेवा झाल्यानंतर त्यांना सेवेतून कमी करणे अन्यायकारक आहे.

याबाबत शंका उत्पन्न करताना मा. अध्यक्ष/प्रा. म्हणाले की, म्हाडाने या कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली नव्हती. मग या कर्मचाऱ्यांची जबाबदारी म्हाडाने घेणे योग्य नव्हे.

श्री. नंदू साटम, सदस्य/प्रा. यांनी सुद्धा याबाबत आपले विचार मांडताना सांगितले की, जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींचा सर्व्हे करून त्यांच्या सहकारी संस्था स्थापन करतेवेळी या समाज विकास अधिकाऱ्यांची गरज आपल्याला लागणारच आहे. अशा परिस्थितीत या समाजविकास अधिकाऱ्यांना या कामाकरिता सामावून घेणे आवश्यक आहे.

श्री. नेरूरकर, सभापती, मुंबई मंडळ याबाबीत बोलताना म्हणाले की, झोपडपट्टी पुनर्वसनाची योजना राबविण्याकरिता समाजविकास अधिकाऱ्यांची फार मोठ्या प्रमाणात गरज आहे. या झोपडपट्ट्यांची गणना करणे, त्यांना सहकारी संस्थेमध्ये सामील होण्यास प्रवृत्त करणे आदी कामे समाजविकास अधिकारीच करू शकतात. म्हणून त्यांना या कामासाठी सामावून घेणे अत्यावश्यक आहे. झोपडपट्टी पुनर्वसनाचे काम स्पार्कसारख्या संस्थेला न देता या समाजविकास अधिकाऱ्यांकडून ही कामे करून घेण्यात यावीत, असे त्यांनी सुचविले.

याबाबतीत मा. उपाध्यक्ष/प्रा. यांनी शेवटी सांगितले की, या कर्मचाऱ्यांना सामावून घेण्याबाबत नवीन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात येईल व त्याप्रमाणे निर्णय घेण्यात येईल.

उपरोक्त चर्चेनंतर मा. अध्यक्ष/प्रा. यांनी सर्वांचे आभार मानल्यानंतर बैठक समाप्त करण्यात आली.

**Meeting No.** 143 **Meeting Date** 25-Oct-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ७-९-१९९६ रोजी झालेल्या १४२ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या दि. २०/७/९६ रोजीच्या १४१ व्या बैठकीत व दि. ७/९/९६ रोजी झालेल्या १४२ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाचा अनुपालन अहवाल.

ठराव :

---

**Item No.** 3 **Resolution No.** 5251

विषय : मोरवाडी-पिंपरी, वाघेरी, पुणे येथील ६०० गाळ्यांपैकी १२० एल.आर.जी. गाळ्यांसाठी प्राप्त झालेली मे. ए. एस. कदम यांची निविदा स्वीकारण्याबाबत.

ठराव : एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतले.

अ) एम.पी.डब्ल्यू.डी. मॅन्युअलच्या २११ परिच्छेदात अनुसरून १२० एल.आय.जी. गाळ्यांची निविदा, प्राधिकरणाने स्वीकारावयाची झाल्यास मंडळाने ८० (इमारत क्र. 'क') ची निविदा प्राधिकरणाच्या निर्णयासाठी एकत्रितपणे पाठवावयास हवी होती. तसे न केल्यामुळे स्वीकारलेल्या उक्त ८० (इमारत क्र. 'क') साठी मे. ए. एस. कदम यांची स्वीकारलेली निविदेबाबत प्राधिकरणाच्या स्तरावर पुणे मंडळाच्या कार्यवाहीस प्राधिकरणाची मंजूरी देण्यात येत आहे.

ब) १२० एल.आय.जी. गाळ्यांसाठी मंडळास प्राप्त झालेल्या मे. ए. एस. कदम यांची निविदा अंदाजित रकमेच्या ३७.५ टक्के जादा आहे. (चालू दरसूचीवर १९.३७ टक्के दर आहे) सदरहू निविदा प्राधिकरणाने स्वीकारण्यासाठी मंडळाने शिफारस केली आहे, ती मान्य करण्यात येते.

क) सदरहू कामासाठी प्राधिकरणाने विभाजन करण्याची परवानगी पहिल्या टप्प्यासाठी (ठराव क्र. ५०८४ दि. १४.६.९४ अन्वये) दिली होती. पुणे मंडळाने उर्वरित कामासाठी गाळ्यांच्या प्रतिसादास अनुसरून विभागणी करून वरीलप्रमाणे निविदा मागविल्या आहेत. सदर विभाजनास प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे.

याबाबतची कार्यवाही कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता त्वरित करण्यात यावी.

---

**Item No.** 4 **Resolution No.**

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी म्हाडातर्फे संक्रमण शिबिरे बांधण्याबाबत प्रगती अहवाल.

ठराव :

| **Item No.** | **5** | **Resolution No.** | **5252** |
|---|---|---|---|

विषय : महात्मा फुले शिक्षण संस्था, धारावी, मुंबई या संस्थेस माध्यमिक शाळेसाठी राजीव गांधी निवारा प्रकल्पाच्या धारावी येथील संक्रमण शिबिरातील इमारत क्र. ३१ मधील पहिल्या मजल्यावरील ८ गाळे वितरण करण्याबाबत वि.स.स. श्री. बाबुराव माने यांची मागणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महात्मा फुले शिक्षण संस्था, धारावी, मुंबई या संस्थेस माध्यमिक शाळेसाठी राजीव गांधी निवारा प्रकल्पाच्या धारावी येथील संक्रमण शिबिरातील इमारत क्र. ३१ मधील तळमजल्यावरील ८ गाळे काही अटींवर एक वर्षाच्या कालावधीसाठी भाडे तत्वावर वितरित करण्यात आले आहेत, हा निर्णय 'जैसे थे' ठेवण्यात यावा. त्यात गाळेबदलींचा कोणताही फेरबदल करण्यात येऊ नये.

| **Item No.** | **6** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पातील धारावी, मुंबई येथील ४ निवासी इमारतींमधील १२० गाळ्यांच्या विक्रीबाबत.

ठराव :

| **Item No.** | **7** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : 'गृहनिर्माण महाप्रकल्प' दि. ३०.९.९६ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

| **Item No.** | **8** | **Resolution No.** | **5253** |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९९४-९५ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्वीकृत करण्याबाबत.

ठराव : प्राधिकरणाने या बाबींचा विचार करून एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९९४-९५ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा स्वीकृत करण्यात येत आहे.

| **Item No.** | **9** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : म्हाडाच्या मुंबई येथील विविध वसाहतीतील दीर्घकाळापासून रिक्त असलेल्या ९२ गाळ्यांचे वाटप विक्री योजनेनुसार म्हाडाच्या कर्मचाऱ्यांना करण्याबाबत प्राधिकरणाने निर्णय घेऊन ठराव संमत केला होता या वाटपास शासनाची स्थगिती.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.** 5254

विषय : पवई येथील महागृहनिर्माण प्रकल्पांतर्गत जमिनीवर असलेल्या अनधिकृत अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पवई येथील गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या जागेवर वसलेल्या ६० झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन शासनाच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत २.५ एफ.एस.आय.मधील अतिरिक्त चटईक्षेत्राचा लाभ घेऊन सदरहू योजना राबविण्याच्या प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात येत आहे. तथापि, चर्चेच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती झोपडपट्टीवासियांच्या तपशीलासह प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करण्यात यावी.
मूळ विषयसूचीवरील व पूरक विषयसूचीवरील विषयांवर निर्णय घेतल्यानंतर मा. अध्यक्ष/प्रा. यांच्या अनुमतीने खालील विषय चर्चेसाठी घेण्यात आला.

**Item No.** 11 **Resolution No.** 5255

विषय : भूकंप पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत उस्मानाबाद जिल्ह्यातील गावांकरिता घरे बांधणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बलसूर या गावाचे पुनर्बांधणीचे काम नवीन तंत्रज्ञान वापरून कमी किंमती म्हणजे रु. ६६,०००/- एवढ्या रकमेस बांधकाम करण्यास व त्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यास शासन मान्यता देत असेल तर सदरहू बांधकाम करण्यास म्हाडाची तयारी आहे. अन्यथा, सदरहू काम बलसूर येथील युनिक सर्व्हिस ट्रस्ट या सेवाभावी संस्थेस देण्यात यावे.
उपरोक्त चर्चेनंतर मा. अध्यक्ष/प्रा. यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व त्यानंतर बैठक समाप्त करण्यात आली.

**Meeting No.** **144** **Meeting Date** **07-Dec-19**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २५-१०-१९९६ रोजी झालेल्या १४३ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** **2** **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या दि. २०/७/९६, ७/९/९६ रोजी झालेल्या १४१ व १४२ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाचा अनुपालन अहवाल.१

ठराव :

**Item No.** **3** **Resolution No.**

विषय : राज्य शासनाच्या सेवेतील अभियंत्यांना शासन निर्णय दि. १४/१२/१९९५ अन्वये लागू केलेली सुधारित वेतनश्रेणी प्राधिकरणातील अभियंत्यांना लागू करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** **4** **Resolution No.** **5256**

विषय : प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती दरवर्षी रु. २,४००/- याप्रमाणे करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ कर्मचारी संघटनेच्या मागणीनुसार वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती दरवर्षी रु. २,४००/- सन १९९६-९७ पासून प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना विहित अटींच्या व शर्तीच्या अधीन राहून देण्यात यावी. तसेच या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत दर तीन वर्षांनी पुनर्विचार करण्यात यावा. या ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

**Item No.** **5** **Resolution No.**

विषय : शिस्तभंगाची कारवाई म्हणून विभागीय चौकशी पूर्ण करून त्या अनुषंगाने दिलेली शिक्षा रद्द करणेबाबत श्री. डी. एस. गद्रे, निवासी कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी प्राधिकरणास सादर केलेल्या अपिलाचे अवलोकन करून निर्णय घेण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 6 **Resolution No.** 5257

विषय : १६० गाळे अल्प उत्पन्न गट (३६० गाळ्यांपैकी) दिंडोशी मालाड (पूर्व) मूळ ठेकेदार मे. सोळंकी ब्रदर्स यांचे राखण व पहारा याबाबत झालेल्या खर्चाचे देयक अदा करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, दिंडोशी, मालाड (पूर्व) येथील ३६० गाळ्यांपैकी १६० गाळ्यांची राखण व पहारा करण्यासाठी मे. सोळंकी ब्रदर्स यांना रु. १,१४,७५०/- इतकी रक्कम बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे अदा करण्यात यावी.

**Item No.** 7 **Resolution No.** 5258

विषय : पवई गृहनिर्माण महाप्रकल्प

सुधारित स्पेसिफिकेशन व सॅन्डेटेक्स मॅट पेंटच्या बाबींसाठी अतिरिक्त खर्चास मंजूरीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पवई येथील गृहनिर्माण महाप्रकल्पासाठी मुंबई मंडळाने मंजूर केलेल्या १२ (११ अधिक १) सुधारित बाबींसाठी लागणाऱ्या रु. १०,०८,८९,९३६/- खर्चास (निविदा रकमेवर १९.५५ टक्के) म्हणजेच प्राधिकरणाने पूर्वी मंजूर केलेल्या १५ टक्केहून ४.६५ टक्के जास्तीच्या खर्चास प्राधिकरण मंजूरी देत आहे व या निर्णयाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

**Item No.** 8 **Resolution No.** 5259

विषय : सर्व्हे क्र. ४१ (पै) चारकोप टप्पा क्र. ४, कांदिवली (प) येथील ६ एमएलडी क्षमतेच्या मलप्रवाह प्रक्रिया संयंत्र (स्युएज ट्रीटमेंट प्लॅंट) बांधकामाच्या निविदा स्वीकारणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे क्र. ४१ (पै) चारकोप टप्पा क्र. ४, कांदिवली (प) येथील ६ एमएलडी क्षमतेच्या मलप्रवाह प्रक्रिया संयंत्र बांधकामाचा मे. रेबा ओनव्हायरो सिस्टीम्स प्रा. लि. यांचा वाटाघाटीनंतरचा रु. १,३७,५०,०००/- रकमेचा देकार स्वीकृतीसाठी मान्यता देत आहे व या निर्णयाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

**Item No.** 9 **Resolution No.** 5260

विषय : भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९५२ चे कलम ६ ला झालेल्या सुधारणेनुसार म्हाडा अंशदान ८.३३ टक्के ऐवजी १० टक्के दि. १/६/१९८९ पासून म्हाडा कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या अंशदायी भविष्य निर्वाह निधी नियम १९८५, नियम २ (सहा) मध्ये वित्तलब्धी म्हणजे मूळ वेतन अधिक त्यावरील महागाई भत्ता असा बदल करून नियम ८ (ब) व नियम ११ (१) मध्ये ८.३३ प्रतिशत ऐवजी १० प्रतिशत असा बदल करण्यास मंजूरी देण्यात येत असून त्याप्रमाणे शासनाच्या मंजूरीने प्राधिकरणाच्या अंशदानाची वर्गणी १/६/१९८९ या पूर्वलक्षी प्रभावाने या अंशदानी भविष्य निर्वाह निधीमध्ये भरण्यास या ठरावाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **Item No.** | **10** | **Resolution No.** | **5261** |

विषय : २० कलमी कार्यक्रमांतर्गत झोपडपट्टी सुधार कार्यक्रम

झोपडपट्ट्यांमध्ये परिसर सुधार कामाकरिता मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी खर्चाची कमाल मर्यादा ठरविणेबाबत.

ठराव : बाब टिप्पणीत सुचविल्याप्रमाणे वरील सर्व बाबींचा सखोल विचार करून असा निर्णय घेतला की, झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमांतर्गत शासनाने ठरवून दिलेल्या कमाल खर्चाच्या रु. ८००/- दरडोई मर्यादा बाब टिप्पणीत निर्देशित केलेल्या निरनिराळ्या सुविधांवरील मंजूर करण्यात येत आहे. या निर्णयाची स्थायीकरणाची वाट न पाहता त्वरित अंमलात आणून पुढील कारवाई करण्यासाठी सर्व मुख्याधिकारी/विभागीय मंडळे यांना कळविण्यात यावे. हा निर्णय मुंबई व पुणे महापालिका क्षेत्रास लागू राहणार नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| **Item No.** | **11** | **Resolution No.** | |

विषय : 'गृहनिर्माण महाप्रकल्प' दि. ३१/१०/१९९६ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

| | | | |
|---|---|---|---|
| **Item No.** | **12** | **Resolution No.** | |

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी म्हाडातर्फे संक्रमण शिबिरे बांधण्याबाबत.

ठराव :

| | | | |
|---|---|---|---|
| **Item No.** | **13** | **Resolution No.** | **5262** |

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत काम करण्यासाठी मंडळाने कंत्राटदारांची नोंदणी करण्याबाबत.

ठराव : एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतला.

१) प्राधिकरणाचा निर्णय क्र. ५०८५, दिनांक १६/४/१९९४ व निर्णय क्रमांक ५१११, दिनांक ३०/८/१९९४ अन्वये स्थापन केलेल्या समित्यांचे परिपत्रक क्र. २५५०, दिनांक २९/९/१९९४ रद्द करण्यात येत आहे.

२) सर्व वर्गातील कंत्राटदारांसाठी मराठी, इंग्रजी, हिंदी व गुजराथी भाषेत नोंदणीसाठी जाहिरात द्यावी.

३) कंत्राटदारांची नोंदणी/श्रेणीवाढ/नूतनीकरण बाब टिप्पणीतील नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार करावे.

४) प्राधिकरणाची वेगळी नोंदणी असली तरी सार्वजनिक बांधकाम विभाग/महानगरपालिका खात्यातील नोंदणीकृत कंत्राटदारास निविदा भरण्याची अनुमती देण्यात येत आहे.

**Item No.** 14 **Resolution No.**

विषय : इब्राहिम कासम चाळ, गॅस कंपनी लेन, फ. ग. द. विभाग, चिंचपोकळी, मुंबई येथील इमारत मालकी तत्वावर पुनर्रचित करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 15 **Resolution No.**

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पातील धारावी, मुंबई येथील ४ निवासी इमारतीमधील १२० गाळ्यांच्या विक्रीबाबत.

ठराव :

**Meeting No.** Special **Meeting Date** 15-Mar-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ७-१२-१९९६ रोजी झालेल्या १४४ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या दि. २५/१०/१९९६ रोजी झालेल्या १४३ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाचा अनुपालन अहवाल.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 5263

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन १९९७-९८ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व सन १९९६-९७ चे सुधारित अंदाजपत्रक.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सादर करण्यात आलेले म्हाडाचे सन १९९७-९८ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व सन १९९६-९७ चे सुधारित अंदाजपत्रक यांना प्राधिकरणाची मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 4 **Resolution No.**

विषय : प्राधिकरण व प्रादेशिक मंडळे यांचेसाठी कर्मचारी वर्ग अनुसूची मंजूर करणे.

ठराव :

**Meeting No.** 145 **Meeting Date** 05-Apr-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १५-३-१९९७ रोजी झालेल्या अंदाजपत्रकीय विशेष बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या दि. ७/१२/९६ रोजी झालेल्या १४४ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाचा अनुपालन अहवाल.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 5264

विषय : प्राधिकरण आणि प्रादेशिक मंडळे यांच्यासाठी कर्मचारी वर्ग अनुसूची मंजूर करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीतील विवेचनाचा विचार करून सोबतच्या परिशिष्टातील म्हाडाच्या कर्मचारी आकृतीबंधास मागील वर्षीच्या आकृतीबंधात नमूद असलेली राजीव गांधी प्रकल्पातील सर्व १६३ पदे अंतर्भूत करून भविष्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. तसेच कर्मचारीवर्ग आकृतीबंधात आवश्यकतेनुसार बदल, पदनिर्मिती करणे वा रद्द करणे, पदाचे पुनर्नामभिकरण (रिडेसिग्नेशन), पदांची अदलाबदल, आवश्यक तेथे रिझर्व पूल मध्ये (रिझर्व पूल) पदे समाविष्ट करणे, पदांचे फेरवाटप (रिडिस्ट्रिब्युशन), पदे परावर्तित करणे (डायव्हर्शन/कनव्हर्शन), राखीव गटातील पदे कार्यान्वित करणे (ॲक्टिव्हेट) इत्यादीबाबतचे अधिकार मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना पूर्वीप्रमाणेच प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच आकृतीबंध सुधारणा समितीच्या शिफारसी प्राप्त झाल्यानंतर त्या शिफारसी व त्यानुसार आकृतीबंधात केलेले बदल प्राधिकरणासमोर त्वरित सादर करण्यात यावी, तसेच यापुढे वित्तीय वर्षात कर्मचारी वर्ग आकृतीबंधामध्ये वेळोवेळी केल्या जाणाऱ्या महत्वपूर्ण बदलांची माहिती प्राधिकरणासमोर माहितीसाठी सादर करण्यात यावी.

**Item No.** 4 **Resolution No.**

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी म्हाडातर्फे संक्रमण शिबिरे बांधण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 5 **Resolution No.** 5265

विषय : अर्धवेळ सफाई कामगार व पंपचालक यांच्या एकत्रित वेतनात सुधारणा करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सध्या बदलत्या परिस्थितीत आणि वाढती महागाई लक्षात घेता सदर अर्धवेळ कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ होणे इष्ट असल्याने मंडळाच्या ठरावानुसार अंशकालीन पंपचालक व सफाई कामगार यांचा पगार रु. ८१/- प्रतितास, प्रतिमासवरून रु. १६१/- प्रतितास/प्रतिमास करण्यात येत आहे.
त्याचप्रमाणे सध्याच्या धोरणानुसार मंडळाच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे दिनांक १.४.९४ पासून दरवर्षी सेवाशुल्कात रु. ५/- ची वाढ करून भाववाढीमुळे होणाऱ्या जास्तीच्या खर्चाची पूर्तता करण्यात येते. परंतु सफाई कामगार व पंपचालकाचे पगारात रु. ८१/- वरून रु. १६१/- प्रतितास/प्रतिमास वाढ केल्यामुळे होणारा खर्च हा अपेक्षित वाढीपेक्षा जास्त होणार असल्यामुळे दरवर्षी रु. ५/- ऐवजी रु. १०/- ची वाढ सेवाशुल्कात करण्यात येत आहे व तद्नंतर प्रत्येक वर्षी मंडळाच्या सध्याच्या पद्धतीप्रमाणे रु. ५/- ची विहित वाढ कायम ठेवण्यात येत आहे.
त्याचप्रमाणे बाब टिप्पणीत दर्शविण्यात आलेल्या वेतनवाढीच्या सुधारित तक्त्यात मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 6 **Resolution No.** 5266

विषय : ५३ गाळे, मध्यम उत्पन्न गट, वर्धा येथील गाळ्यांच्या वाढीव अग्रिम रकमेबाबत व गाळ्यांचा ताबा देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सदरहू बाबतीत गाळेधारकाकडून रु. २५,५३८/- गाळ्याच्या वाढील किंमतीचा पहिला हप्ता व अनामत रक्कम घेतल्यानंतर गाळेधारकांना ताबा देण्याची व उर्वरित रक्कम रु. ३१,७५०/- एक वर्षाच्या कालावधीत व्याजासहित दोन हप्त्यांत वसूल करण्यात यावेत.
त्याचप्रमाणे मागणी अभावी रिक्त राहणाऱ्या गाळ्यांच्या बाबतीत आरंभी भरावयाच्या (आय.डी.पी.) रकमेत काही सवलत दिल्यास गाळ्याची विक्री होऊ शकेल अशी मंडळाची खात्री होत असेल व ही रक्कम भरण्यास सवलत दिल्यास प्राधिकरणाचे काही आर्थिक नुकसान होणार नसेल तर अशा प्रकरणी निर्णय घेण्याचे अधिकार प्रादेशिक मंडळाला देण्यात यावेत आणि अशा प्रकारे निर्णय घेतलेले प्रस्ताव एकत्रितपणे प्राधिकरणाच्या माहितीस्तव सादर करण्यात यावेत.

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : शिस्तभंगाची कारवाई म्हणून विभागीय चौकशी पूर्ण करून त्या अनुषंगाने दिलेली शिक्षा रद्द करण्याबाबत - श्री. डी. एस. गद्रे, निवासी कार्यकारी अभियंता, सेवानिवृत्त, मुं. इ. दु. व पु. मंडळ यांनी प्राधिकरणास सादर केलेल्या अपिलाचे अवलोकन करून निर्णय घेण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 8 **Resolution No.** 5267

विषय : प्राधिकरणाचे गाळे/भूखंडात आरक्षण ठेवण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, नियम क्रमांक-१३ चे पोटकलम-७ मध्ये संसदेचे, विधानसभेचे तसेच विधान परिषदेचे आजी माजी सदस्य या प्रवर्गात महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हापरिषद यांचे सदस्य तसेच प्राधिकरण व प्राधिकरणाच्या विभागीय मंडळाचे सदस्य यांचाही अंतर्भाव करण्याचे व त्याचप्रमाणे नियम-१३ पोटकलम-११ मध्ये चित्रपट, दूरदर्शन, नाटक, तमाशा या माध्यमातील कलाकार तसेच परफॉर्मिंग आर्टशी संबंधित असलेले कलाकार या प्रवर्गात खेळाडू या प्रवर्गाचा समावेश करण्याचे प्रस्तावित आहे. यानुसार शासनाला संबंधित नियमात सुधारणा करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात यावा व शासनाकडून संबंधित नियमात सुधारणा होऊन अधिसूचना प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**Item No.** 9 **Resolution No.** 5268

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्प - नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत पुनर्रचित केलेल्या शिवस्मृती इमारतीतील (मुंबई सेंट्रल) अनिवासी गाळ्यांच्या किंमतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सदरहू बाब टिप्पणीतील श्री. हसमुख नटवरलाल जानी यांच्या बाबतीतील वस्तुस्थिती खरी असेल तर श्री. जानी यांना शिवस्मृती गृहनिर्माण सहकारी संस्थेतील इमारत क्रमांक ४ मधील गाळा क्रमांक २ वितरित करण्यात यावा. त्याचप्रमाणे शिवस्मृती गृहनिमाण सहकारी संस्थेच्या कार्यालयासाठी सदरहू गाळा वितरित करण्याचा निर्णय प्राधिकरणाच्या दिनांक ३/१/१९९५ च्या बैठकीत घेण्यात आला. त्या निर्णयाची पार्श्वभूमी व टिप्पणी याबाबतचा अहवाल संचालक, राजीव गांधी निवारा प्रकल्प यांनी उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्यामार्फत मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांना पाठविण्यात यावा.

**Item No.** 10 **Resolution No.** 5269

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत ना. म. जोशी मार्गावरील 'आमची सावली' या इमारतीची पुनर्रचना करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, राजीव गांधी प्रकल्पाची मुदत फक्त एका वर्षाने शासनाने वाढवून दिलेली आहे. अशा परिस्थितीत ही तोट्याची योजना राजीव गांधी प्रकल्पाने राबविणे प्रकल्पाच्या हिताचे होणार नाही. याकरिता सदरहू योजना पुढील कार्यवाहीकरिता मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली.

**Item No.** 11 **Resolution No.**

विषय : मंडळातर्फे राबविण्यात आलेल्या २४८ गाळे अधिक २० गाळे उच्च उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट, दिंडोशी, मालाड या योजनेचे मूळ ठेकेदार मे. व्ही. एस. जोग कन्स्ट्रक्शन लि. याचा राखण व पहारा प्रस्ताव.

ठराव :

| **Item No.** | **12** | **Resolution No.** | **5270** |
|---|---|---|---|

विषय : स. नं. क्र. ३८५ (भाग) मुलुंड येथील जमिनीवर अंधेरी-घाटकोपर लिंक रोडवरील झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसनासाठी राबविण्यात आलेल्या योजनेबाबत.

सामाईक शौचालये बांधकामास झालेला रु. ४२ लक्ष खर्च निर्लेखन करण्यास मंजूरी मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीतील रु. ४२ लक्ष या सामाईक शौचालयाच्या कामावर झालेला खर्च निर्लेखित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

| **Item No.** | **13** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : 'गृहनिर्माण महाप्रकल्प' दि. २८.२.९७ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

| **Item No.** | **14** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील कंत्राटदारांना सुसज्जता अग्रिम अदा करण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **15** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी म्हाडातर्फे संक्रमण शिबिरे बांधण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **16** | **Resolution No.** | **5271** |
|---|---|---|---|

विषय : पवई व ओशिवरा येथील महाप्रकल्प योजनेतील शिल्लक सदनिकांच्या वितरणाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाचे व्यापक हित विचारात घेऊन पवई/ओशिवरा येथील उच्च उत्पन्न गटातील रिक्त सदनिकांच्या वितरणासाठी विनियम-१४अेच्या तरतुदीनुसार 'प्रथम येणाऱ्यास प्रथम सदनिका वितरण' तत्वावर जाहिरात करण्यास मुंबई मंडळास परवानगी देण्यात येत आहे.
तसेच कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता याबाबतीत स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देण्यास मंजूरी देण्यात येते.

| **Item No.** | **17** | **Resolution No.** | **5272** |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघाला प्राधिकरणाच्या अतिरिक्त निधीमधून रु. ५० कोटी रक्कम उपलब्ध करून देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघाला, प्राधिकरणाच्या अतिरिक्त निधीमधून सहा महिने कालावधीकरिता रु. ५० कोटी रक्कम शासन हमीवर उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच इतिवृत्त स्थायी होण्याची वाट न बघता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

| **Item No.** | **18** | **Resolution No.** | **5273** |
|---|---|---|---|

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या पुनर्रचित इमारतीतील अतिरिक्त क्षेत्रफळाच्या दराबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाने बाब टिप्पणीत नमूद केलेल्या अतिरिक्त सदनिकांचे विक्री दराबाबत वेळोवेळी घेतलेले दरवाढीबाबतचे निर्णय हे योग्य व समर्थनीय आहेत व हे निर्णय ज्या निकषाच्या आधारावर घेण्यात आलेले आहेत, त्याच निकषांच्या आधारावर यापुढील अतिरिक्त गाळ्यांच्या वितरणाच्या बाबतीतील निर्णय घेण्यात यावेत.

**Item No.** 4 **Resolution No.** 5279

विषय : श्रीमती व्ही. व्ही. म्हात्रे, वरिष्ठ लिपिका यांच्या पतीच्या हृदयावरील शस्त्रक्रियेबाबत वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर करण्याबाबत व तत्कालीन महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ कर्मचारी वैद्यकीय प्रतिपूर्तीची १९६८ मधील नियमावलीत बदल करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) मुंबईतील नानावटी, सर्वोदय व तत्सम ट्रस्टची इस्पितळे हृदयावरील शस्त्रक्रियेसाठी व त्या अनुषंगाने मिळणाऱ्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी (बायपास, ॲन्जीयोप्लास्टी व हार्ट सर्जरी) मान्यताप्राप्त ठरविण्यास शासनाला शिफारस करण्यात यावी.

२) तसेच नवीन मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती येथील सर्व शासकीय व नगरपालिकेची, महानगरपालिकेची इस्पितळे व त्या त्या विभागातील खाजगी इस्पितळे उक्त शस्त्रक्रियेसाठी मान्यताप्राप्त ठरविण्यास शासनाकडे शिफारस करण्यात यावी.

फक्त संबंधित खाजगी इस्पितळे कॅश मेमो व प्रमाणपत्रे त्या त्या विभागातील शासकीय व इस्पितळामधील वैद्यकीय प्राधिकाऱ्यांकडून प्रतिस्वाक्षरांकित (सर्टिफाईड) करवून आणल्यासच त्यांना प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरविण्यात यावी.

३) शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले निर्णय प्राधिकरणाने वेळोवेळी जसेच्या तसे स्वीकारले असल्यामुळे शासनाच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती नियमावलीमधील तरतुदी लागू करण्यास मान्यता देण्यात येते. यामुळे महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ कर्मचारी वैद्यकीय प्रतिपूर्ती १९६८ नियमावलीमधील क्र. २(ई)(४) व क्र. २(ई)(५) येथे विहित केलेली २१ वय वर्षांची अट आपोआप निघून जाईल.

४) शासनाच्या सार्वजनिक आरोग्य खात्याच्या दि. २३/७/९२ जा. क्र. एमएजी/१०९२/१६७७/सीआर-२२९/आरोग्य-७ मधील तरतुदी प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना लागू करण्यास मान्यता देण्यात येते.

५) श्रीमती व्ही. व्ही. म्हात्रे, वरिष्ठ लिपिका, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी त्यांच्या पतीवर नानावटी इस्पितळात केलेल्या ॲन्जीयोप्लास्टी या हृदयावरील शस्त्रक्रियेसाठी मागितलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीचे प्रकरण प्राधिकरणाच्या शिफारशीसह शासनाला मान्यतेसाठी पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

या ठरावाची अंमलबजावणी ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता मंजूर करण्यात यावी.

---

**Item No.** 5 **Resolution No.** 5280

विषय : प्रतिक्षानगर, सायन कोळीवाडा येथील संक्रमण शिबिरातील २००० चौ. मी. जमीन मुंबई महानगरपालिकेला उदंचन केंद्राकरिता देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

प्रतिक्षानगर, सायन कोळीवाडा येथील संक्रमण शिबिरातील २००० चौ. मी. जमीन मुंबई महानगरपालिकेला उदंचन केंद्राकरिता कोणतेही अधिमूल्य न लावता वार्षिक रु. १/- नाममात्र भाडेपट्ट्यांवर म्हाडाच्या प्रचलित नियमाप्रमाणे हस्तांतरण करण्यास मान्यता देण्यात येते.

ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता याबाबतची अंमलबजावणी करण्यात यावी.

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणातील ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची बदली विभागीय मंडळात झाली आहे व अशा अधिकारी/कर्मचाऱ्याने बदली झालेल्या विभागीय मंडळात सेवानिवासस्थान घेतले नसेल तर त्यास पूर्वीचे ठिकाणी घेतलेले सेवानिवासस्थान त्यांचेकडे ठेऊन घेण्यासाठी सवलत देणेबाबत.

ठराव :

**Item No.** 7 **Resolution No.** 5281

विषय : 'ॲडव्हांटेज' महाराष्ट्र खालील प्रकल्प 'क' साठी प्राप्त झालेल्या निविदेवर निर्णय घेणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ॲडव्हान्टेज महाराष्ट्र अंतर्गत मुंबई मंडळाकडे प्रकल्प 'क' साठी सादर केलेली मे. विराज इस्टेट प्रा. लि. नाशिक यांची निविदा प्राधिकरणाच्या आर्थिक हिताची नसल्याने ती नामंजूर करण्यात येत आहे. तसेच या निर्णयाची अंमलबजावणी या बैठकीचा इतिवृत्तात स्थायी होण्याची वाट न पाहता त्वरित करावी, असा निर्णय एकमताने घेतला.

**Item No.** 8 **Resolution No.** 5282

विषय : सायन-कोळीवाडा या प्रस्तावित रस्त्यावरील झोपडपट्टीधारकांचे कायम स्वरुपी पुनर्वसन करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वडाळा येथील जमिनीवर एजन्सी तत्वावर गृहनिर्माण प्रकल्प हाती घेण्यास तत्वत: मंजूरी मिळणेबाबत.

ठराव : सायन-कोळीवाडा या प्रस्तावित रस्त्यावरील झोपडपट्टीवासियांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कोकरी आगार येथील जमिनीवरील गृहनिर्माण योजना एजन्सी तत्वावर व 'डिपॉझिट कॉन्ट्रीब्युशन वर्क' म्हणून प्राधिकरणाने हाती घेण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे. या योजनेसाठी संपूर्ण मांडवली गुंतवणूक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण करेल व तयार होणाऱ्या इमारतीतील सदनिकांचे वितरण प्राधिकरण करेल. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास एजन्सी चार्जेस म्हणून नियमानुसार निधी प्राधिकरण देईल. तसेच त्या प्राधिकरणास जशा प्रकारची गृहनिर्माण योजना कार्यान्वित करून हवी असेल त्याप्रमाणे योजना कार्यान्वित करण्यात यावी, असा प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला.

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : औरंगाबाद येथील आंबेडकर नगर या घोषित झोपडपट्टीमध्ये औरंगाबाद महानगरपालिकेने बांधून दिलेल्या शौचकुपाच्या जोत्यावरील बांधकामास रु. २३,५०,६००/- साठी झोपडपट्टी सुधार योजनेअंतर्गत विशेष बाब म्हणून मान्यता मिळणेबाबत.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.** 5283

विषय : चिकणघर, कल्याण येथील विविध उत्पन्न गटातील संमिश्र सदनिकांच्या योजनेसाठी राखण व देखमालीचा खर्च मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, चिकणघर, कल्याण येथील विविध उत्पन्न गटातील संमिश्र सदनिकांच्या योजनेसाठी राखण व देखमालीच्या रु. ३४,०००/- खर्चाच्या प्रस्तावास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

**Item No.** 11 **Resolution No.** 5284

विषय : भारतीय मानक ब्युरोच्या आय.एस.ओ. ९००० प्रमाणे मानकांची गुणवत्ता (क्वालिटी सिस्टीम सर्टिफिकेशन) पद्धतीचे प्रमाणपत्र म्हाडाला प्राप्त करण्यासाठीची संमती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. तसेच आय.एस.ओ. ९००० ची मालिका गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी लागणाऱ्या खर्चासदेखील प्राधिकरण मंजूरी देत आहे.
या ठरावाची अंमलबजावणी ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

**Item No.** 12 **Resolution No.** 5285

विषय : एस. पी. नगर, अंबरनाथ येथे उच्च उत्पन्न गटातील ८ गाळे व ४ दुकाने बांधकाम (राखण व पहारा ठेवण्याबाबतच्या खर्चास मंजूरी).

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, एस. पी. नगर, अंबरनाथ येथील बांधकामास जानेवारी, १९९६ ते डिसेंबर, १९९७ या २४ महिन्यांच्या कालावधीसाठी राखण व पहारा ठेवण्यास रु. ७५०/- प्रति चौकीदार प्रतिमाह या हिशेबाने दररोज २ चौकीदारांच्या २४ महिन्यांसाठी रु. ३६,०००/- च्या खर्चाच्या प्रस्तावास प्राधिकरण मान्यता देत आहे.

**Item No.** 13 **Resolution No.** 5286

विषय : पवई व ओशिवरा येथील गृहनिर्माण महाप्रकल्पातील उच्च उत्पन्न गटातील सदनिकांचे आणि व्यापारी गाळ्यांचे वितरण विक्री किंमतीपोटी २५ टक्के व ५० टक्के भरणा केल्यानंतर करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पवई व ओशिवरा येथील बांधलेल्या सदनिकांचे वाटप अर्जदारांकडून विक्री किंमतीपोटी २५ टक्के रक्कम स्वीकारून व उर्वरित ७५ टक्के रक्कम वार्षिक १६ टक्के दराने व्याज आकारून पुढील पाच वर्षांसाठी वसूल केली जाईल, या तत्वावर विक्री करण्यास परवानगी देण्यात येत आहे. तसेच व्यापारी गाळे व दुकाने हे ५० टक्के रक्कम घेऊन व उर्वरित रकमेवर २१ टक्के दराने व्याज आकारून २० समान हप्त्यांत व्याजासह ५ वर्षात वसूल करण्याच्या शर्तीवर वाटपाची परवानगी देण्यात येत आहे.
प्राधिकरणाने ठराव क्रमांक ५२६६, दिनांक ५/४/१९९७ रोजी मंजूर केला असला तरी मुंबई मंडळाचे त्यावेळचे मुख्यअधिकारी श्री. अशोक लाल यांनी अशा प्रकारची विक्री फेब्रुवारी महिन्यात सुरू होत आहे, त्यास प्राधिकरणातर्फे कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. तसेच यापुढे या सदनिकांची विक्रीची मोठ्या प्रमाणात जाहिरात देऊन जास्तीत जास्त प्रयत्न करण्याकरिता जी कार्यवाही करावी लागेल ती कार्यवाही करण्याचे अधिकार प्राधिकरणातर्फे मुंबई मंडळाचे मुख्याधिकारी यांना देण्यात येत आहेत.

---

**Item No.** 14 & 15 **Resolution No.** 5287

विषय : १४ - महाप्रकल्प - ३ (एसआरडी) योजनेअंतर्गत प्रकल्पनिहाय सद्यस्थिती

१५ - म्हाडातर्फे २०,००० ते २५,००० संक्रमण शिबिरांच्या गाळ्यांचे बांधकाम हाती घेण्याबाबत.

ठराव : शासनाचे निर्देशानुसार म्हाडातर्फे सुमारे २०,००० ते २५,००० संक्रमण शिबिरांचे बांधकाम हाती घ्यावयाचे आहे व त्यासाठी लागणारी संपूर्ण मांडवली गुंतवणूक म्हाडाने त्याच्या निधीतून करावयाची आहे, याची प्राधिकरणाने नोंद घेतली. प्राधिकरणाची सध्याची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन तूर्तास टप्पा-१ म्हणून प्रशासनाने सुचविलेल्या ६ साईटवरच सध्या लक्ष केंद्रित करावे व सुमारे ७,३९० संक्रमण शिबिरांच्या सदनिकांचे बांधकाम त्वरित कसे सुरू करता येईल, हे पहावे.
झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाचे छाननी शुल्क माफ करून घेण्यासाठी प्रशासनाने शासनाकडे पाठपुरावा करावा. जर भावी काळात संक्रमण शिबिरे म्हणून बांधण्यात आलेल्या सदनिका झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणास नको असतील किंवा झोपडपट्टीधारक प्राधिकरणाने बांधलेल्या संक्रमण शिबिरात रहावयास जाण्यास तयार न झाल्याने ते गाळे अवितरित रहाणार असतील तर त्यांची विक्री अल्प उत्पन्न गटातील गाळे म्हणून बाजारात नेहमीच्या अटी व शर्तीवर विकण्यास तत्वतः मान्यता देण्यात येत आहे, असे प्राधिकरणाने एकमताने ठरविले.

**Item No.** **16** **Resolution No.** **5288**

विषय : मॉडर्न मिल (महालक्ष्मी) व मातुल्य मिल (लोअर परेल) येथे विकास नियंत्रण नियम ५८ अन्वये प्राधिकरणास प्राप्त झालेल्या जमिनीवर संक्रमण सदनिकांची योजना कार्यान्वित करणेबाबत.

ठराव : मॉडर्न मिल व मातुल्य मिल या जमिनींवर प्रशासनाने बाब टिप्पणीत सुचविल्यानुसार संक्रमण गाळे व फ्री सेलचे गाळे अशी स्वयंपूर्ण संमिश्र योजना राबविण्यासाठी पुढील कार्यवाही करावी. तसेच या जमिनींवर योजना राबविण्यासाठी प्राधिकरणाने मंजूरी दिलेल्या पूर्वपात्र विकासकांकडून किंवा ॲडव्हांटेज महाराष्ट्र धर्तीवर नियोजनासह योजना कार्यान्वित करण्यापर्यंत सर्व कामांसाठी स्पर्धात्मक निविदा मागवाव्यात, असा निर्णय प्राधिकरणाने एकमताने घेतला.

**Item No.** **17** **Resolution No.** **5289**

विषय : मानखुर्द व सायन येथे बांधावयाच्या संक्रमण शिबिरांचे सदनिकांचे बांधकामाबाबत शासनाकडून प्राप्त झालेले मार्गदर्शन.

ठराव : मानखुर्द व सायन योजनांमधील बहिस्थ नागरी सुविधांचे काम प्राधिकरणाने नेहमीच्या पद्धतीने स्पर्धात्मक निविदा मागवून स्वतंत्रपणे करण्याविषयी कार्यवाही करावी.

**Item No.** 18 **Resolution No.** 5290

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पातर्फे नागरी नूतनीकरण, धारावी पुनर्वसन व धारावी सोडून अन्य पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या निवासी व अनिवासी गाळ्यांची अनधिकृत हस्तांतरणे नियमित करणेबाबत तसेच आकारण्यात यावयाच्या दंडात्मक रकमेबाबतचा प्रस्ताव.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
राजीव गांधी निवारा प्रकल्पातर्फे नागरी नूतनीकरण, धारावी पुनर्वसन व धारावी सोडून अन्य पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या निवासी व अनिवासी गाळ्यांची अनधिकृत हस्तांतरणे नियमित करणेबाबत तसेच आकारावयाच्या दंडात्मक रकमेस खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येते.

१) नागरी नूतनीकरण -

| अ. क्र. | गाळ्यांचे क्षेत्रफळ चौ. फू. | सबसिडी रुपये | हस्तांतरण शुल्क (दंड) | एकूण (वसुली) देयक रुपये |
|---|---|---|---|---|
| १) | २०० चौ. फू. पर्यंत | १२,९००/- | २०,०००/- | ३२,९००/- |
| २) | २०१ ते २५० चौ. फू. | १२,९००/- | २५,०००/- | ३७,९००/- |
| ३) | २५० हून अधिक | १२,९००/- | ३०,०००/- | ४२,९००/- |

२) धारावी पुनर्बांधणी योजना -

| अ. क्र. | गाळ्यांचे क्षेत्रफळ चौ. फू. | सबसिडी रुपये | हस्तांतरण शुल्क (दंड) | एकूण (वसुली) देयक रुपये |
|---|---|---|---|---|
| १) | २०० फूटापर्यंत | ५,४००/- | २०,०००/- | २५,४००/- |
| २) | २०१ ते २५० चौ. फू. | ५,४००/- | २५,०००/- | ३०,४००/- |
| ३) | २५० हून अधिक | ५,४००/- | ३०,०००/- | ३५,४००/- |

| अ. क्र. | गाळ्यांचे क्षेत्रफळ चौ. फू. | सबसिडी रुपये | हस्तांतरण शुल्क (दंड) | एकूण (वसुली) देयक रुपये |
|---|---|---|---|---|
| १) | २०० फूटापर्यंत | | २०,०००/- | शासकीय विम्धगान दिलेली नुकसान |
| २) | २०१ ते २५० फूटापर्यंत | | २५,०००/- | भरपाई सबसिडी व दंड हस्तांतरण शुल्क |
| ३) | २५० हून अधिक. | | ३०,०००/- | मिळून जी रक्कम येईल ती रक्कम व थकबाकी व्याजासह |

सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यापूर्वी शासनाची मान्यता घेण्यात यावी, असेही ठरविण्यात आले.
या निर्णयाची अंमलबजावणी बैठकीचे कार्यवृत्त स्थायी होण्याची वाट न पाहता त्वरित करण्यात यावी.
उपरोक्त चर्चेनंतर मा. अध्यक्ष/प्रा. यांनी सदरहू बैठक व्यवस्थित पार पाडल्याबद्दल सर्व उपस्थित मान्यवर सदस्यांचे व अधिकाऱ्यांचे आभार मानले व त्यानंतर बैठक समाप्त करण्यात आली.

**Meeting No.** 148 **Meeting Date** 11-Nov-1

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ३-९-१९९७ रोजी झालेल्या १४७ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या दि. २२/६/९७ रोजी झालेल्या १४६ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : म्हाडातर्फे सुमारे २०,००० ते २५,००० संक्रमण शिबिरांच्या गाळ्यांचे बांधकाम हाती घेणेबाबत.

ठराव :

**Item No.** 4 **Resolution No.** 5290-

विषय : सेंट्रल वॉटर ॲन्ड पॉवर कमिशन, खडकवासला पुणेकरिता कार्यालयीन इमारत व हॉस्टेल म्हाडातर्फे एजन्सी तत्वावर बांधण्याचा प्रस्ताव.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सेंट्रल वॉटर ॲन्ड पॉवर कमिशन, खडकवासला, पुणे यांच्या सेंट्रल ट्रेनिंग युनिट या संस्थेसाठी कार्यालयीन इमारत व हॉस्टेल म्हाडातर्फे एजन्सी तत्वावर बांधण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.
या निर्णयाची अंमलबजावणी बैठकीचे कार्यवृत्त स्थायी होण्याची वाट न पाहता त्वरित करण्यात यावी.

**Item No.** 5 **Resolution No.** 5291

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन १९८८-८९ ते १९९१-९२ या वित्तीय वर्षांचे वार्षिक लेखे प्राधिकरणाने स्वीकृत करण्याबाबत.

ठराव : या बाबीचा विचार करून एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन १९८८-८९ ते १९९१-९२ या वित्तीय वर्षांचे वार्षिक लेखे स्वीकृत करण्यात येत आहेत.

**Item No. 6 Resolution No. 5292**

विषय : पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या फेडरेशनला दिंडोशी मालाड येथे सुमारे ५४ एकर जमीन उपलब्ध करून देण्याबाबत.

ठराव : १) बोरिवली येथील नॅशनलपार्क येथील ३२ हजार कुटुंबियांचे पुनर्वसन करून शिल्लक असलेली मोकळी जमीन पोलीस गृहनिर्माणाकरिता देण्यात यावी.
२) याबाबत परस्पर आलेल्या अर्जांवर शासना स्तरावर विचार करण्यात यावा. हे करीत असताना सामान्य प्रशासन विभाग, गृहनिर्माण विभाग व गृह विभाग यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे.
३) एसआरए च्या धर्तीवर म्हणजेच २.५ एफ.एस.आय. देऊन तेथे राहत असलेल्या लोकांचे पुनर्वसन करण्याची तयारी असेल आणि स्वबळावर ही योजना फक्त सामान्य पोलीसांकरिता राबविण्याची तयारी असेल तर तशा प्रकारे जमीन पोलीस गृहनिर्माणाकरिता उपलब्ध करून देण्यास म्हाडा तयार आहे.

**Item No.** 7 **Resolution No.** 5293

विषय : मानखुर्द व प्रतिक्षानगर, सायन येथे सुमारे ५००० संक्रमण सदनिका बांधण्याचे कंत्राट मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा. लि. यांना देणेबाबत.

ठराव : विचार करून एकमताने निर्णय घेतला की,

१) बाब टिप्पणीत दर्शविल्यानुसार व दिनांक ११/१२/१९८४ व १२/३/१९९७ च्या शासनाच्या ठरावाच्या अधीन राहून मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा. लि., पुणे यांना सुमारे १०,००० संक्रमण सदनिकांचे बांधकाम टप्प्याटप्प्याने देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) या सुमारे १०,००० संक्रमण सदनिकांसाठी शासनाने निश्चित केलेल्या रु. ७५०/- चौ. फूट या बांधकाम दरास (पाईल फाऊंडेशनसाठी वापरल्या जाणाऱ्या लायनरच्या किंमतीशिवाय) मान्यता देण्यात येत आहे.

३) प्रथम टप्प्यात दिल्या जाणाऱ्या ५,००० संक्रमण सदनिकांसाठी मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा. लि. पुणे यांच्या शासनाने निश्चित केलेल्या रु. ७५०/- चौ. फूट (लायनरशिवाय) या दराने येणाऱ्या रु. १२४.५० कोटी या कंत्राटास व कंत्राट रकमेस मान्यता देण्यात येत आहे. झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा. लि. यांचे इमारत नकाशांना मंजूरी देताना काही फेरबदल सुचविले तर तसेच योजनेच्या आराखड्यास मंजूरी देताना ज्या आकाराच्या इमारती बांधल्या जाणार आहेत त्याचे क्षेत्रफळ लक्षात घेऊन वरील कंत्राट रकमेत फेरबदल संभवतो. हा फेरबदल लक्षात घेता जर प्राधिकरणाने मंजूर केलेल्या निविदा रकमेवर १० टक्केपेक्षा जास्त वाढ होत नसेल तर प्रशासनाने मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा. लि. यांचेबरोबर करारनामा करावा.

४) वरील १०,००० संक्रमण सदनिकांव्यतिरिक्त आणखी २००० संक्रमण सदनिकांसाठी तांबे समितीने निवड केलेल्या म्हाडाच्या १५ पूर्व अर्हता प्राप्त विकासकांकडून देकार मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) संक्रमण सदनिकांचे प्रत्यक्ष बांधकामासाठी व अन्य बाबींसाठी १९९७-९८ या वर्षात अंदाजपत्रकात मंजूर झालेल्या रु. २५ कोटी या व्यतिरिक्त रु. ६१ कोटी या अपेक्षित वाढीव खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सुधारित तरतूद १९९७-९८ च्या सुधारित अंदाजपत्रकात प्रशासनाने अंतर्भूत करावी.

६) कास्ट-इन-सिटू पाईलससाठी वापरल्या जाणाऱ्या लायनरबाबत प्रशासनाने निर्णय घेतल्यावर त्या खर्चाबाबत प्राधिकरणाची स्वतंत्रपणे मान्यता घ्यावी.

७) या ठरावाचे स्थायीकरणाची पुढील बैठकीपर्यंत वाट न पाहता प्रशासनाने पुढील कार्यवाही त्वरित करावी.

**Item No.** **8** **Resolution No.** **5294**

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पाने राज्य शासनाच्या झोपडपट्टी पुनर्विकासासाठी म्हाडांतर्गत विकासकाची भूमिका पार पाडण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, राजीव गांधी निवारा प्रकल्पाने राज्य शासनाच्या झोपडपट्टी पुनर्विकासासाठी म्हाडांतर्गत विकासकाची भूमिका पार पाडण्याबाबत मंजूरी देण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने रा. गां. प्रकल्प, मुंबई मंडळामध्ये विलीन करून जागतिक बँक प्रकल्प आणि राजीव गांधी प्रकल्प या दोन्ही प्रकल्पाचे एक परिमंडळ कार्यरत करण्यास मंजूरी देण्यात येते. तसेच प्रशासकीय दृष्टीकोनातून वेगाने निर्णय घेण्यासाठी संचालक/रा. गां. प्र. यांना अधिकार देण्यासाठी अधिकारप्रदानतेचा ठराव मुंबई मंडळाच्या स्तरावर मंजूर करून प्राधिकरणापुढे अंतिम निर्णय घेण्यासाठी पाठविण्यात यावा.

रा. गां. प्रकल्पातील कर्मचाऱ्यांना म्हाडाच्या सेवेत सामावून घेण्यात यावे. त्यांना ज्या दिवसापासून म्हाडाच्या सेवेत समाविष्ट करण्यात येईल त्या दिवसापासून जेष्ठता देण्यात यावी.

**Item No.** 9 **Resolution No.** 5295

विषय : प्राधिकरणाच्या विविध योजनेसाठी वास्तुशास्त्रज्ञ नियोजन सल्लागारांच्या पॅनेलचे नूतनीकरण.

अर्जाची छाननी करण्यासाठी प्राधिकरणाने पूर्वी ठरवून दिलेल्या निकषांमध्ये काही आवश्यक सुधारणा करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, वास्तुशास्त्रज्ञांची पॅनेल्स बनविताना या आधीच्या प्राधिकरणाच्या ठराव क्र. ११०२ दिनांक ८.३.१९९१ अन्वये व निकष ठरविण्यासाठी नेमलेल्या समितीने ठरविलेल्या मार्गदर्शक सूत्रामध्ये/निकषामध्ये फेरबदल करून खालील सुधारित मार्गदर्शक सूत्रानुसार/निकषानुसार यापूर्वी प्राधिकरणाने उपरोक्त ठरावानुसार नियुक्त केलेल्या निवड समितीमार्फत अर्जाची निवड करून नोंदणी करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीमार्फत कार्यवाही करण्यात यावी. या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

अ) गृहनिर्माण क्षेत्रात अर्जदार वास्तुशास्त्रज्ञास किमान ५ वर्षे व्यावसायिक कामाचा अनुभव असावा/लॅण्डस्केप पॅनेलकरिता त्या क्षेत्रातील किमान ३ वर्षांचा अनुभव असावा/गृहनिर्माण क्षेत्रात त्याने किमान तीन प्रकल्प पूर्ण केलेले असावेत व त्याची एकूण किंमत रु. ५० लाख असावी किंवा १००० चौ. मी. क्षेत्रफळाचे बांधकाम झालेले असावे/तसेच त्याने दोन इतर प्रकल्प (व्यापारी संकुल, कार्यालयीन इमारत इ.) क्षेत्रफळ प्रत्येकी १०० चौ. मी. पूर्ण केलेले असावेत/कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर मध्ये वास्तुशास्त्रज्ञ म्हणून नोंदणी झालेली असावी/किमान १ अनुभवी (क्वालिफाईड) वास्तुशास्त्रज्ञ सेवेत असावा.

ब) इमारत दुरुस्ती व पुनर्रचना क्षेत्रातील पॅनेलकरिता त्या क्षेत्रातील किमान तीन वर्षांचा अनुभव व दुरुस्ती क्षेत्रासाठी स्ट्रक्चरल इंजिनियरच्या सेवांची उपलब्धता असणे आवश्यक राहील. इमारत दुरुस्ती क्षेत्रातील पॅनेलकरिता कौन्सिल ऑफ आर्किटेक्चरमध्ये वास्तुशास्त्रज्ञ म्हणून नोंदणी झालेली असावी, ही अट असू नये.

क) अर्जासोबत किमान ५ प्रकल्पांचे जरूर ते तपशील जसे की, प्लॅन, एलिव्हेशन, सेक्शन व फोटोग्राफ्स जोडण्यात यावे. ५ पैकी ३ गृहनिर्माण प्रकल्प व २ इतर प्रकल्प (व्यापारी संकुल, कार्यालयीन इमारत इ.) असावेत. इमारत दुरुस्ती व पुनर्रचना क्षेत्राकरिता त्या क्षेत्रातील कामाचा तपशील देण्यात यावा.

ड) पॅनेल्स बनविताना वास्तुशास्त्रज्ञांची कामाच्या मूल्यावर आधारित वेगवेगळ्या संवर्गासाठी खाली दिलेल्या तक्त्याप्रमाणे निवड करावी.

| संवर्ग | कामाचे मूल्य (वर्कलोड) |
|---|---|
| संवर्ग-१ | रु. १० कोटींपेक्षा जास्त |
| संवर्ग-२ | रु. ५ कोटी ते रु. १० कोटींपर्यंत |
| संवर्ग-३ | रु. ३ कोटी ते ६ कोटींपर्यंत |
| संवर्ग-४ | रु. ३ कोटींपेक्षा कमी |

उपरोक्त संवर्ग-१ व संवर्ग-२ अंतर्गत प्रकल्पाचे काम पॅनेलवरील वास्तुशास्त्रज्ञांना देण्यापूर्वी त्या त्या संवर्गात पॅनेलकरिता सर्व वास्तुशास्त्रज्ञांकडून प्रस्तावित प्रकल्पासाठी

डिझाईन ब्रीफ/प्रकल्प नियोजनाबाबत स्पर्धात घडवून आणावी व अशा प्रकारे प्राप्त झालेल्या प्राथमिक नियोजनाच्या प्रस्तावाबाबत प्राधिकरणाने ठराव क्रमांक १०९३ दिनांक ८.३.९१ अन्वये नियुक्त केलेल्या अर्जाची निवड करणाऱ्या समितीने छाननी करावी व ज्या वास्तुशास्त्रज्ञाने सर्वात उत्तम प्रस्ताव सादर केला असेल त्या वास्तुशास्त्रज्ञाची त्या प्रकल्पासाठी नेमणूक करावी.

इ) उत्तमोत्तम वास्तुशास्त्रज्ञांची पॅनेलवर निवड होण्याच्या दृष्टीने अर्जाची छाननी करताना गुणांकन पद्धतीचा (मार्किंग सिस्टीम) अवलंब करावा. प्राधिकरणाच्या ठराव क्र. ११०३, दिनांक ८.३.१९९१ अन्वये ठरविल्याप्रमाणे अर्जाची छाननी करून योग्य उमेदवारांची निवड करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने अशी गुणांकन पद्धती निश्चित करावी व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(इमारत दुरुस्ती मंडळाची कार्यप्रणाली भिन्न असल्यामुळे, त्या पॅनेलकरिता अर्जाची छाननी करताना गुणांकन पद्धतीचा अवलंब न करता सर्वसाधारणपणे या क्षेत्रातील कामाच्या अनुभवास प्राधान्य देऊन दुरुस्ती कामासाठी वास्तुशास्त्रज्ञांची निवड करण्यात यावी.)

फ) वास्तुशास्त्रज्ञांची नोंदणी अर्ज करताना माहिती अर्जाच्या विहित नमुन्यात भरून घ्यावी.

या व्यतिरिक्त इतर आवश्यक बाबी खालीलप्रमाणे राहतील.

१) वास्तुशास्त्रज्ञांची नोंदणी करताना प्रशासकीय खर्च म्हणून रु. २५०/- शुल्क आकारण्यात यावे.

२) वास्तुशास्त्रज्ञाच्या करारपत्रावर सही करण्यासाठी विभागीय मंडळाचा मुख्य अधिकारी (दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ वगळता), सर्व संवर्गाकरिता उपाध्यक्ष/प्रा., यांच्या पूर्वमान्यतेने (प्राधिकरणाचे पत्र दिनांक १४-५-१९९५ नुसार) सक्षम अधिकारी राहील. दुरुस्ती कामाबाबत संबंधित उपमुख्य अभियंता व पुनर्रचना कामासाठी मुख्य अभियंतांच्या मान्यतेने करारपत्रावर सही करण्यासाठी उपमुख्य अभियंता सक्षम असतील.

४) वास्तुशास्त्रज्ञांचे नव्याने तयार करण्यात आलेले पॅनेल पाच वर्षे मुदतीकरीता राहील. पाच वर्षानंतर पॅनेलचे नुतनीकरण करण्यात येईल.

५) पुनर्रचना व गृहनिर्माणाच्या पॅनेलवरील नोंदणी रद्द करण्यासाठी (दुरुस्ती मंडळ वगळता) निवड समिती सक्षम राहील. नोंदणी रद्द केलेल्या वास्तुशास्त्रज्ञास उपाध्यक्ष/प्रा., यांचेकडे अपील करण्याची मुभा राहील. दुरुस्ती पॅनेलवरील नोंदणी रद्द करण्यासाठी संबंधित पॅनेलवरील नोंदणी रद्द झालेल्या वास्तुशास्त्रज्ञांना मुख्य अभियंता यांचेकडे अपील करण्याची मुभा राहील.

मूळ विषयसूचीवरील विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेतल्यानंतर मा. अध्यक्ष/प्रा. यांच्या परवानगीने खालील आयत्या वेळचे विषय चर्चेस घेण्यात आले.

| **Item No.** | **10** | **Resolution No.** | **5296** |
|---|---|---|---|

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्प - १ व ओशिवरा गृहनिर्माण महाप्रकल्प - २ मधील रिक्त सदनिकांच्या विक्रीबाबतचे धोरण.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ओशिवरा व पवई येथील सदनिकांच्या किंमती लक्षात घेता व या सदनिकांकरिता शर्ती व अटी दर्शविणाऱ्या पुस्तिकेत अर्जासोबत भरलेल्या अनामत रकमेतून १० टक्के रक्कम मंडळाकडे समर्पहरण करण्यात येईल, अशी अट असल्यामुळे विशेष बाब म्हणून सदनिकेच्या किंमतीच्या १ टक्के रक्कम न कापता अनामत रकमेच्या १० टक्के रक्कम कापून इतर रक्कम परत करण्यास प्राधिकरण एकमताने मंजूरी देत आहे.

| **Item No.** | **11** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ महाप्रकल्प माहे सप्टेंबर, १९९७ अखेरचा प्रगती अहवाल.

ठराव :

| **Item No.** | **12** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : मुंबई मंडळाच्या अंधेरी येथील गोदामात सन १९८६ पासून पडून असलेल्या १० मि. ली. व्यासाच्या मृदू पोलादी सळ्यांच्या लिलाव विक्रीअंती प्राप्त उच्चतम बोलीमुळे येणाऱ्या त्रुटीची रक्कम निर्लेखित करणे.

ठराव :

| **Item No.** | **13** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : गणेश भुवन ही पुनर्रचित इमारत दि. २९-६-९७ रोजी कोसळून झालेल्या अपघातातील मृत व्यक्तींच्या वारसांना तसेच जखमींना द्यावयाचे आर्थिक सहाय्य.

ठराव :

**Meeting No.** 149 **Meeting Date** 09-Apr-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २३/३/१९९८ रोजी झालेल्या अर्थसंकल्पीय 'विशेष' बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या दि. ११/११/१९९७ रोजी झालेल्या १४८ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरण आणि प्रादेशिक मंडळे यांच्या कार्यालयासाठी कर्मचारी वर्ग आकृतीबंध.

ठराव :

**Item No.** 4 **Resolution No.** 5298

विषय : मागणी अभावी रिक्त राहिलेल्या सदनिकेच्या विक्रीचे धोरण.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, विविध ठिकाणी मागणीअभावी रिक्त राहिलेल्या सदनिका व भूखंड विक्री शक्यतो बाजारभावाप्रमाणे करण्याचा प्रयत्न करावा व असे शक्य न झाल्यास बाजारभावापेक्षा १० ते २० टक्क्यांनी सदनिकांच्या किंमती कमी करून विक्री करण्याचे अधिकार प्रादेशिक मंडळाच्या मुख्यअधिकाऱ्यांना/सभापतींना देण्यात येत आहेत.

उपरोक्त कार्यवाही करताना म्हाडाचे नुकसान होणार नाही, याची खबरदारी विभागीय मंडळाच्या मुख्यअधिकारी/सभापतींनी घ्यावी.

या ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

**Item No.** 5 **Resolution No.** 5299

विषय : प्राधिकरणाचे गाळे/भूखंडाचे वाटपासाठी १५ वर्षे वास्तव्याची अट सैन्यदल त्याचप्रमाणे केंद्रशासनाचे कर्मचाऱ्यांसाठी काढून टाकणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, याबाबतीत न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी शासनाची मंजूरी घ्यावी लागेल, यास्तव सदरहू प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी प्रतिनियुक्तीवरील अधिकारी यांना सेवानिवासस्थाने वाटप करण्याबाबत सुधारित मार्गदर्शक तत्वे.

ठराव :

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : मुंबईतील विविध वसाहतीतील विविध योजनअंतर्गत दीर्घकाळापासून रिक्त असलेल्या गाळ्यांचा वापर म्हाडा कर्मचाऱ्यांसाठी सेवानिवासस्थान म्हणून करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : अ) प्राधिकरणाच्या निवासी गाळ्यांच्या हस्तांतरण फी व नियमितीकरण फी मध्ये वाढ करण्याबाबत.

ब) गाळ्यांच्या हस्तांतरण फी एवढीच फी भूखंडाच्या हस्तांतरणास लावणेबाबत व तशा प्रकारची तरतूद विनियमात करणेबाबत.

क) अनिवासी/व्यापारी गाळ्यांच्या व भूखंडाच्या हस्तांतरणास परवानगी देणे व हस्तांतरण फी आकारणे व तशा प्रकारची विनियमात तरतूद.

ड) म्हाडाच्या वसाहतीतील बहुमजली इमारती किंवा स्वतंत्र भूखंडावर बांधण्यात आलेल्या इमारतीचे अभिहस्तांतरण झाल्यावर इमारतीचे किंवा इमारतीतील गाळ्यांचे पुर्नविक्रीनंतर जमिनीचा भाडेपट्टा पुर्नखरेदीदाराच्या नावे करणेबाबत.

इ) लाभार्थींस उपलब्ध असलेले जादा चटईक्षेत्र विकण्यास परवानगी देण्याबाबतची इतर प्रकरणे.

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : हुडको वित्तीय संस्थेच्या कर्ज पुरवठ्याची प्रचलित पद्धतीबाबत माहिती/तपशिल (कर्ज मर्यादा, व्याज दर इ.)

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.**

विषय : पवई महाप्रकल्प - १.
सुधारीत स्पेसिफीकेशन्सच्या अतिरिक्त खर्चास मंजूरीबाबत.

ठराव :

**Item No.** 11 **Resolution No.**

विषय : ५२ गाळे उच्च उत्पन्न गट व २८ दुकानी गाळे, समता नगर, पोईसर, कांदिवली (पूर्व), मूळ ठेकेदार मे. बी. बी. बिल्डर्स यांचे राखण व पहारा दाव्याबाबत.

ठराव :

**Item No.** 12 **Resolution No.** 5300

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजना शीघ्रगतीने कार्यान्वित करण्यासाठी म्हाडातर्फे मुंबईत १.२५ लक्ष सदनिका बांधण्याचा कार्यक्रम.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, उपरोक्त टिप्पणी त्यामध्ये उल्लेख केलेल्या शिफारशींसह प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यास मंजूरी देण्यात येते.
यानंतर मूळ विषय पत्रिकेवरील विषय क्रमांक १३ ते १६ पुढे ढकलण्यात व विषय क्रमांक १४९/१७ चर्चेस घेण्यात आला.

**Item No.** 17 **Resolution No.** 5301

विषय : गृहनिर्माण प्रकल्पातील पवई आणि ओशिवरा येथील केंद्रीय शासनाच्या विविध विभागांना वितरीत करावयाच्या सदनिकांमध्ये द्यावयाच्या अतिरिक्त सुविधांबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सदरहू बाब टिप्पणीत उल्लेखित केलेली कामे नियमानुसार निविदा मागवून तातडीने करावयाचे असल्यामुळे अल्प मुदतीची सूचना देऊन निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे.
याबाबतीतील कार्यवाही त्वरेने करावयाची असल्यामुळे सभेचे कार्यवृत्त स्थायी होण्याची वाट न पाहता 'गोदरेज ॲण्ड बॉयस'कडे वॉर्डरोबची मागणी नोंदविण्यास परवानगी देण्यात येत आहे.
मूळ विषयसूचीवरील विषयांवर वरीलप्रमाणे चर्चा झाल्यानंतर मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांच्या अनुमतीने खालील आयत्यावेळी विषय चर्चेस घेण्यात आला.

**Item No.** 18 **Resolution No.** 5302

विषय : ओशिवरा व पवई येथील महाप्रकल्पातील बांधण्यात आलेल्या सदनिकांसाठी ज्यांनी अर्ज केले व ते सोडतीत यशस्वी झाले त्यांनी सोडत काढल्यानंतर अर्ज मागे घेतले किंवा गाळे वितरण स्वीकारण्यास नकार दिला तर अशांकडून अनामत रकमेमधून प्रश्शासकीय खर्चापोटी १० टक्के रक्कम वळती करून घेण्याविषयी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, ओशिवरा व पवई येथील महाप्रकल्पातील बांधण्यात आलेल्या सदनिकांसाठी ज्यांनी अर्ज केले व ते सोडतीत यशस्वी झाले त्यांनी सोडत काढल्यानंतर अर्ज मागे घेतले किंवा गाळे वितरण स्वीकारण्यास नकार दिला तर अशांकडून अनामत रकमेमधून प्रशासकीय खर्चापोटी १० टक्के रक्कम म्हणजेच रु. १०,०००/- वळती करून घेण्याच्या मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येते. तसेच यापुढेही त्याचप्रमाणे पवई ओशिवरा प्रकरणांमध्ये कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.
यानंतर सचिव/गृहनिर्माण व उपाध्यक्ष/प्रा. यांना मंत्रालयात महत्वाच्या बैठकीसाठी उपस्थित रहाणे आवश्यक असल्यामुळे मा. अध्यक्ष/प्रा. यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

**Meeting No.** 150 **Meeting Date** 18-May-1

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ६-४-१९९८ रोजी झालेल्या १४९ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या दि. २३-३-१९९८ रोजी झालेल्या अंदाजपत्रकीय विशेष बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 5303

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व त्यांच्या अखत्यारीतील विभागीय मंडळात कार्यरत असणाऱ्या कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ सहाय्यकांना दि. १-४-८१ पासून रुपये ६००-३०-७५०-४०-९५० (असुधारित) व दिनांक १-१-८५ पासून रु. २०००-६०-२३०० - द.रो. - ७५-३२०० ही सुधारित वेतनश्रेणी देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व त्यांच्या अखत्यारीतील विभागीय मंडळात कार्यरत असणाऱ्या कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ सहाय्यकांना दिनांक १-४-१९८१ पासून रु. ६००-३०-७५०-४०-९५० (असुधारित) व दिनांक १-१-१९८५ पासून रु. २०००-६०-२३००-द.रो.-७५-३२०० ही सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत व दिनांक ७-७-१९९७ पासून थकबाकी देण्याबाबत शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येते. या ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी करण्याची वाट न पाहता करण्यात यावी.

**Item No.** 4 **Resolution No.** 5304

विषय : अंशदायी भविष्य निर्वाह निधीमध्ये प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांचे अंशदान १२ टक्के करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
केंद्र शासनाने भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९५२ च्या कलम ६ मध्ये केलेली सुधारित वाढ, शासनाच्या दि. ७-३-९८ च्या अधिसूचनेच्या बदलाच्या आधारे १० प्रतिशतवरून १२ प्रतिशत दिनांक २२-९-१९९७ पासून लागू करण्यात यावी व तशी अंशदान भविष्य निर्वाह निधी नियम १९८५ (दुरुस्ती) १९९८ मध्ये बदल करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यास मंजूरी देण्यात येते. या ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता त्वरीत करण्यात यावी.

**Item No.** 5 **Resolution No.** 5305

विषय : महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीनुसार मालमत्तेवरील घसाऱ्याचे दर अचूक लावण्याची पद्धत अवलंबिण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील परिच्छेद ४१५ नुसार प्राधिकरण व प्राधिकरणाच्या अंतर्गत असलेल्या सर्व मंडळांनी/प्रकल्पांनी घसारा कपात करण्याबाबतच्या ठरावास मंजूरी देण्यात येते. या ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी होण्याची वाट न पाहता करण्यात यावी.

---

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय :
अ) प्राधिकरणाच्या निवासी गाळ्यांच्या हस्तांतरण फी व नियमितीकरण फी मध्ये वाढ करणेबाबत.
ब) गाळ्यांच्या हस्तांतरण फी एवढीच फी भूखंडाच्या हस्तांतरणास लावणेबाबत व तशा प्रकारची तरतूद विनियमात करणेबाबत.
क) अनिवासी/व्यापारी गाळ्यांच्या व भूखंडाच्या हस्तांतरणास परवानगी देणे व हस्तांतरण फी आकारणे व तशा प्रकारची विनियमात तरतूद.
ड) म्हाडाच्या वसाहतीतील बहुमजली इमारती किंवा स्वतंत्र भूखंडावर बांधण्यात आलेल्या इमारतीचे अभिहस्तांतरण झाल्यावर इमारतीचे किंवा इमारतीतील गाळ्यांचे पुनर्विक्रीनंतर जमिनीचा भाडेपट्टा पुनर्खरेदीदाराच्या नावे करणेबाबत.
ई) लाभार्थींस उपलब्ध असलेले जादा चटईक्षेत्र विकण्यास परवानगी देण्याबाबतची इतर प्रकरणे.

ठराव :

---

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : हुडको वित्तीय संस्थेच्या कर्ज पुरवठ्याचे प्रचलित पद्धतीबाबतची माहिती/तपशील, कर्ज, मर्यादा, व्याज दर इत्यादी.

ठराव :

---

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : पवई महाप्रकल्प - १
सुधारित स्पेसिफिकेशनच्या अतिरिक्त खर्चास मंजूरीबाबत.

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.** 5306

विषय : ५२ गाळे उच्च उत्पन्न गट व २५ दुकानी गाळे समतानगर, पोईसर, कांदिवली (पूर्व) मूळ ठेकेदार मे. बी. बी. बिल्डर्स यांचे राखण व पहारा दाव्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
समतानगर, कांदिवली (पूर्व), पोईसर येथील ५२ गाळे उच्च उत्पन्न गट व २८ दुकानी गाळे यांच्या राखण व पहारा यासाठी मे. बी. बी. बिल्डर्स यांना रु. ३,५७,७५०/- (रुपये तीन लाख सत्तावन्न हजार सातशे पन्नास मात्र) अदा करण्यास मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 10 **Resolution No.** 5307

विषय : मे. बी. जी. शिर्के, टेक्नॉलॉजी लि. यांना ५००० संक्रमण शिबिराचे बांधकामात कास्ट इन सीटू पाईलसाठी कॉंक्रिटच्या शाकीफिशियल कव्हरसाठी निविदा रकमेशिवाय अतिरिक्त रक्कम देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. यांना मानखुर्द व सायन येथील सदनिकांचे बांधकामात कास्ट-इन-सिटू पाईलच्या कॉंक्रीटच्या सॅक्रिफिशियल कव्हरसाठी प्रशासनाने केलेल्या आकडेमोडीने येणारी रक्कम, निविदा रकमे व्यतिरिक्त अधिकची रक्कम म्हणून देण्यास मान्यता देण्यात येते. तसेच उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी प्राधिकरणाची बैठक होईपर्यंत कंत्राटदाराची आर्थिक कोंडी थोडीशी सुटावी या उद्देशाने प्रशासनाने केलेल्या आकडेमोडीच्या ५० टक्के रक्कम कंत्राटदारास देण्यास घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. सॅक्रिफिशियल कव्हरसाठी प्रशासनाने केलेली आकडेमोड व कंत्राटदाराने केलेला दावा (क्लेम) यामध्ये मोठी तफावत असल्यामुळे वाद (डिस्प्युट) निर्माण झाला आहे. सदर वाद (डिस्प्युट) कंत्राटातील कलम (क्लॉज) मधील तरतूदीनुसार लवादाकडे (आरबीट्रेटर) पाठविण्यात यावा असे ठरविण्यात आले. तसेच लवाद म्हणून दोन्ही बाजूंना मान्य असल्यामुळे श्री. रा. त्रि. अत्रे, सचिव (निवृत्त) सार्वजनिक बांधकाम विभाग यांची नेमणूक करण्याचे ठरविण्यात यावे. लवादाचा निर्णय दोन्ही बाजूवर बंधनकारक राहील व तो माहितीसाठी मुंबई मंडळ व प्राधिकरणापुढे ठेवावा.

**Item No.** 11 **Resolution No.**

विषय : मुंबई मंडळाच्या एस. आर. डी. परिमंडळांतर्गत कार्यान्वित असणाऱ्या योजनांविषयी प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 12 **Resolution No.** 5308

विषय : ३२ गाळे उच्च उत्पन्न गट, सातपूर, नाशिक ठेकेदाराच्या सुरक्षा व देखभाल देयकाच्या अदायगीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सातपूर, नाशिक येथील ३२ गाळे, उच्च उत्पन्न गट योजनेच्या सुरक्षा व देखभाल यासाठी ठेकेदाराने केलेल्या रु. ९४,५००/- या देखभालीच्या खर्चास मंजूरी देण्यात येते.

---

**Item No.** 13 **Resolution No.** 5309

विषय : मुंबई मंडळाच्या अंधेरी येथील गोदामात सन १९८६ पासून पडून असलेल्या १० मि. मी. व्यासाच्या मृदू पोलादी सळ्यांचा लिलाव विक्रीअंती प्राप्त उच्चतम बोलीमुळे येणाऱ्या त्रुटीची रक्कम निर्लेखित करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई मंडळाच्या अंधेरी येथील गोदामात सन १९८६ पासून पडून असलेल्या १० मि. मी. व्यासाच्या मृदू पोलादी सळ्यांच्या लिलाव विक्रीअंती प्राप्त उच्चतम देकार रु. ७१,७८६/- स्वीकारण्यास मान्यता देण्यात येते. तसेच, होणारी हानी रु. १,६६,६४९/- निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 14 **Resolution No.** 5310

विषय : स. क्र. २६३ मालवणी या जमिनीवर अल्प उत्पन्न गटाच्या पुनर्वसनांच्या काही सदनिका व सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी विकसित भूखंडाची योजना कार्यान्वित करणे व पुनर्वसनाच्या सदनिकांचे काम मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. यांना देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी यांचे ११-५-१९९८ चे पत्रातील देकार हा आर्थिकदृष्ट्या फायदेशीर असल्याने त्यांना मालवणी योजनेतील नियोजित ९,५६० सदनिकांपैकी सुमारे ३,५०० सदनिकांचे काम शासनाच्या दिनांक १२-३-९७ च्या निर्णयातील १०,००० सदनिकांपैकी दुसऱ्या टप्प्यातील ५००० सदनिकांचा भाग म्हणून दिनांक १२-३-९७ च्या शासन निर्णयान्वये उच्चाधिकार समितीने ठरविलेल्या बांधकामाच्या दरानुसार मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी यांना देण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता प्रशासनाने मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. यांना लेटर ऑफ इंटेन्ट देण्यास मान्यता देण्यात येत आहे.
मूळ विषयसूचीवरील विषयावर चर्चा करून निर्णय घेतल्यानंतर मा. अध्यक्ष/प्रा. यांच्या अनुमतीने खालील आयत्यावेळेचा विषय चर्चेत घेण्यात आला.

---

**Item No. 15 Resolution No.**

विषय : पुनर्रचित इमारत १५ जी ते के, नवी चिखलवाडी येथील गाळे वितरणाबाबत.

पुनर्रचित इमारतीतील गाळे देताना जुन्या रहिवाश्यांना हस्तांतरण आकार लावण्याबाबत.

ठराव :

**Meeting No.** 151 **Meeting Date** 15-Jun-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १८-५-१९९८ रोजी झालेल्या १५० व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या दि. ६-४-९८ रोजी झालेल्या १४९ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहींचा अनुपालन अहवाल.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 5311

विषय : हृदयावरील शस्त्रक्रियेसाठी व त्या अनुषंगाने कर्मचाऱ्याने केलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी इस्पितळे मान्यताप्राप्त ठरविणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
हृदयावरील शस्त्रक्रिया, हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया व ॲन्जियोप्लास्टी यापैकी कोणतीही शस्त्रक्रिया, म्हाडाच्या किंवा औषधोपचार म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी तो/ती रहात असलेल्या कोणत्याही इस्पितळामध्ये करवून व त्यासंबंधीची देयके शासनाने या औषधोपचार/शस्त्रक्रियेसाठी मान्यताप्राप्त ठरवून दिलेल्या इस्पितळाकडून अथवा शासकीय इस्पितळांकडून प्रमाणित करून घेतली. तर या खर्चाची प्रतिपूर्ती नियमानुसार देय प्रदानापर्यंत सिमित करून करण्यात यावी.

**Item No.** 4 **Resolution No.** 5312

विषय : तारतंत्री/पंपचालक या संवर्गात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध नसल्याने कुंठीतता घालविण्यासाठी १२ वर्षे सेवा झाल्यानंतर वरील वरिष्ठ वेतनश्रेणी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ज्या पंपचालकांना दिनांक १-१०-१९९४ पासून अथवा त्यानंतर १२ वर्षे झालेली आहेत त्यांना दिनांक १-१०-१९९४ पासून अथवा प्रत्यक्ष १२ वर्षे झालेल्या तारखेपासून रु. १२००-३०-१४४०-द.रो-३०-१८०० ही वेतनश्रेणी देण्यात यावी. तसेच,
२) पंपचालक व तारतंत्री ही दोन्ही पदे अदलाबदल योग्य असल्यामुळे, मुख्य तारतंत्री या पदाची वेतनश्रेणी रु. ९७५-२५-११५०-द.रो-३०-१५४० वरून रु. १२२०-३०-१४४०-द.रो-३०-१८०० अशी सुधारणा करण्यात यावी व याबाबत प्राधिकरणाच्या स्तरावर कार्यवाही करून शासनाची कार्योत्तर मंजूरी घ्यावी. तसेच तारतंत्री संवर्गामधील ज्या कर्मचाऱ्यांची सेवा दिनांक १-१०-१९९४ रोजी किंवा त्यानंतर १२ वर्षे झाली असेल त्यांना त्या दिवसापासून रु. १२००-३०-१४४०-द.रो-३०-१८०० ही वेतनश्रेणी देण्यात यावी.

**Item No.** 5 **Resolution No.** 5313

विषय : थालसेमिया मेजर या रोगावर घेतलेल्या औषधोपचाराच्या खर्चाची प्रतिपूर्ती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाने दि. ३१-३-१९९७ जा. क्र. संकीर्ण-१०९७/प्र.क्र.१०७/प्रशा-३ च्या पत्रामध्ये आदेशित केल्याप्रमाणे प्राधिकरणामध्ये व प्राधिकरणांतर्गत असलेल्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना वा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबियांपैकी कोणालाही थालसेमिया

मेजर या रोगावर केलेल्या रक्तशुद्धीकरणानंतर डेसफेरल इन्जेक्शनसाठ

आलेला वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीस अनुज्ञेय ठरवावा व शासनाने/प्राधिकरणाने वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी वेळोवेळी विहित केलेल्या २३ गंभीर आजारामध्ये सदर रोगाचा समावेश करण्याबाबत शासनाला विनंती करावी.
तसेच, मूत्रपिंड निकामी झाल्यानंतर रोग्याला डायलेसिसवर ठेवावे लागते. या प्रक्रियेवर येणारा खर्च हा बराच महागडा आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण संघटनेच्या अध्यक्षांनी तथा प्राधिकरणाचे कर्मचारी सदस्य श्री. कारखानीस यांनी सूचित केल्याप्रमाणे 'डायलेसिस' या रोगाचा प्राधिकरणाने व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या २३ गंभीर आजारामध्ये समावेश करण्यासाठी शासनाला विनंती करण्याचे ठरले.

---

**Item No.** 6 **Resolution No.** 5314

विषय : श्री. व्ही. बी. गुंजोटीकर, माजी अपील अधिकारी/प्रा. यांच्या नियुक्तीबद्दल.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाने दिनांक २२-२-१९९१ रोजी केलेल्या ठराव क्र. १८८७, दिनांक २२-२-१९९१ वर आधारीत दिनांक १९-३-१९९१ जा. क्र. एमएच/एसटीपी/१५९०/४८९९/प्र-१० च्या आदेशामधील 'कंत्राटी पद्धतीवर' हे शब्द काढून टाकण्याच्या मा. उपाध्यक्ष/प्रा. यांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

---

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : मुंबईतील विविध वसाहतीतील विविध योजनेअंतर्गत दीर्घकाळापासून रिक्त असलेल्या गाळ्यांचा वापर म्हाडा कर्मचाऱ्यांसाठी सेवानिवासस्थान म्हणून करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 8 **Resolution No.** 5315

विषय : म्हाडामार्फत गृहनिर्माण योजनेसाठी नेमलेल्या खाजगी वास्तुशास्त्रज्ञांना द्यावयाच्या व्यावसायिक शुल्काबाबतचा म्हाडाच्या दिनांक २१/१०/९२ च्या ठरावामध्ये सुधारणा करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
म्हाडामार्फत राबविण्यात येत असलेल्या व यापुढे घ्यावयाच्या रुपये १० कोटी किंमतीपेक्षा जास्त किंमती असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना, अल्प उत्पन्न गट व तत्सम योजना (रिपिटेटिव्ह टाईप ऑफ ग्रुप हाऊसिंगसाठी) प्रकल्पाकरिता खाजगी वास्तुशास्त्रज्ञांना द्यावयाचे व्यावसायिक शुल्क खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार अदा करण्यात यावेत.

| प्रकल्प किंमत (लाखामध्ये) | व्यावसायिक शुल्काची एकूण टक्केवारी | |
|---|---|---|
| | नियतकालिक देखरेखीसाठी | दैनंदिन देखरेखीसाठी |
| १) रु. १००० लाखापेक्षा जास्त ते रु. २५०० लाखापर्यंतच्या प्रकल्पाच्या किंमतीसाठी. | २.२५ | ३.२५ |
| २) रु. २५०० लाखापुढील ते रु. ५००० लाखापर्यंतच्या प्रकल्पाच्या किंमतीसाठी. | २.०० | ३.०० |
| ३) रु. ५००० लाखापुढील ते रु. १०००० लाखापर्यंतच्या प्रकल्पाच्या किंमतीसाठी. | १.७५ | २.७५ |
| ४) रु. १०००० लाखापुढील ते रु. १५००० लाखापर्यंतच्या प्रकल्पाच्या किंमतीसाठी. | १.५० | २.५० |
| ५) रु. १५००० लाखापेक्षा जास्त प्रकल्पाच्या किंमतीसाठी. | १.२५ | २.२५ |

विविध किंमतीच्या प्रकल्पासाठी देय असलेले नियतकालिक व दैनंदिन देखरेखीसाठी सरासरी व्यावसायिक शुल्काची टक्केवारी.

| प्रकल्प किंमत (लाखामध्ये) | व्यावसायिक शुल्काची एकूण टक्केवारी | |
|---|---|---|
| | नियतकालिक देखरेखीसाठी | दैनंदिन देखरेखीसाठी |
| १) रुपये ५० कोटी | २.१२५ टक्के | ३.१२५ टक्के |
| २) रुपये १०० कोटी | १.९३७५ टक्के | २.९३७५ टक्के |

| | | |
|---|---|---|
| ३) रुपये २०० कोटी | १.६५६२५ टक्के | २.६५६२५ टक्के |
| ४) रुपये ३०० कोटी | १.५२०८ टक्के | २.५२०८ टक्के |

*टीप :- व्यावसायिक शुल्क नियतकालिक व दैनंदिन देखरेखीसाठी अनुक्रमे*
—— १.५० टक्के व २.५० टक्के पेक्षा कमी करण्यात येऊ नये.

२ (अ) जमिनीचे सर्वेक्षण करणे, यामध्ये सीमांचे सीमांकन करणे, जमिनीच्या सीमा महसूल खात्याकडून प्रमाणित करून घेणे, जमिनीच्या मालकीचे कागदपत्र जसे की, ७/१२ चा उतारा, इंडेक्स-२, मालमत्ता नोंदणीपत्र इत्यादी समाविष्ट राहील. जमिनीशी संबंधित विकास आराखड्यातील तरतूदी संबंधित महानगरपालिकेकडून प्राप्त करणे, जमिनीच्या उतार चढावाबाबतचे (कन्टुर) सर्व्हेक्षण करणे (कन्टुरप्लॅन इ.) त्रिमिती पद्धती किंवा अन्य स्वीकारार्ह पद्धतीने क्षेत्रफळ ठरविणे.

जमिनीमध्ये अपेक्षित खोलीपर्यंत चाचणी खड्डे करून जमिनीचे, पाण्याचे व खडकांचे नमुने गोळा करणे.

विविध प्रकारच्या चाचण्या करणे, जसे की, सल्फेट व क्लोराईड यांच्या अंतर्भावाबद्दल माहिती इत्यादी चाचणी खड्ड्यांद्वारे इमारतीच्या पायासाठी जमिनीचा सुयोग्य स्तर ठरविणे (एस. बी. सी.) विशेषतः खुल्या अपेक्षित सर्व्हेक्षण करणे. या सर्व प्रकारच्या सर्व्हेक्षणावर येणारा खर्च रु. २५ कोटी पर्यंतच्या प्रकल्पासाठी प्राधिकरणाने स्वतंत्र अदा करावा. मात्र प्रकल्प किंमत रुपये २० कोटीपेक्षा जास्त असल्यास हा सर्व सर्व्हेक्षणाचा खर्च खाजगी वास्तुशास्त्रज्ञ यांनी त्यांच्या व्यावसायिक शुल्कातून करावा. सरकारी व स्थानिक नियोजन संस्थांना द्यावयाचे वैधानिक शुल्क हे खाजगी वास्तुशास्त्रज्ञांनी भरावयाचे आहे. मात्र म्हाडाकडून त्याचा परतावा मिळेल..

३. व्यावसायिक शुल्क, प्रकल्पाच्या प्रत्यक्ष किंमतीवर न देता प्रकल्पाची अंदाजित किंमत ज्यावर निविदा मागविण्यात येतात. (निविदा मागविल्याच्या वर्षाच्या डी. एस. आर. नुसार) अशा किंमतीवर अंतिमतः देय ठरविण्यात यावे.

४. खाजगी वास्तुशास्त्रज्ञांची सेवा करारपत्रानुसार ५ टप्प्यात विभागली आहे. प्रथम ४ टप्प्यांसाठी एकूण शुल्काच्या ६० टक्के शुल्क अदा न करता ४० टक्के शुल्क अदा करावे व ५ व्या टप्प्यासाठी (देखरेखीचा टप्पा) एकूण शुल्काच्या ६० टक्के शुल्क अदा करावे.

५. खाजगी वास्तुशास्त्रज्ञांची सेवा केव्हाही खंडित करण्याचे अधिकार प्राधिकरणाने राखून ठेवावेत. त्यासाठी अध्या देय असलेले १५ टक्के 'टर्मिनेशन फी' देण्यात येऊ नये. वास्तुशास्त्रज्ञांची सेवा खंडित केल्यास, किंवहुना वास्तुशास्त्रज्ञांनी प्रकल्पाच्या सेवेतून राजीनामा दिल्यास, त्यांनी प्रत्यक्ष केलेल्या कामासाठी जे काम तांत्रिकदृष्ट्या मान्य करण्यासारखे आहे. अशाच कामासाठी त्या प्रमाणात व्यावसायिक शुल्क अदा करण्यात यावे.

५. विविध मंडळांसाठी खाजगी वास्तुशास्त्रज्ञांचे पॅनेल्स ५ वर्षाकरिता अस्तित्वात असली तरी गरजेनुसार विविध विभागीय मंडळांसाठी प्राप्त झालेल्या खाजगी वास्तुशास्त्रज्ञांच्या अर्जानुसार प्राधिकरणाने ठराव क्र. ११०३, दिनांक ८-३-१९९१ अन्वये अर्जामधून निवड करून नोंदणीकरणासाठी नेमून दिलेल्या समितीने विविध मंडळांसाठी खाजगी वास्तुशास्त्रज्ञांची पॅनेल्सवर निवड करावी. तसेच वास्तुशास्त्रज्ञांच्या देयकांच्या संदर्भात आवश्यक नोंदी मोजमाप नोंदवहीमध्ये वास्तुशास्त्रज्ञांच्या देयकांच्या कामाचे मूल्यमापन करून यापुढे नोंदविण्याची संबंधित अधिकाऱ्यांना सक्ती करण्यात यावी.

७. *मुंबई मंडळाने अशा प्रकारच्या प्रकल्पांसाठी यापूर्वी नेमलेल्या खाजगी*

वास्तुशास्त्रज्ञांच्या करारपत्रात या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता या निर्णयानुसार सुधारणा करण्यात यावी.

**Item No. 9 Resolution No. 5316**

विषय : दोन लाख झोपडपट्टी रहिवाश्यांना मोफत घरे पुरविण्याची योजना राबविण्याकरिता म्हाडा अंतर्गत आणि महत्वाचा घटक म्हणून निर्माण करावयाच्या शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून तसेच म्हाडाकडून समभाग म्हणूक प्रत्येकी रु. ३०० कोटी एवढी रक्कम देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) राजीव गांधी निवारा प्रकल्प दिनांक १/४/१९९८ पासून बंद झाला असल्यामुळे प्रकल्पाचे बँक खाते दिनांक १/४/१९९८ पासून बंद करण्यात आले. तसेच संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांचे नावे नव्याने बँकेत खाते क्र. १५७९९ उघडण्यात आले. यास प्राधिकरणाने कार्योत्तर मंजूरी दिली.

२) नव्याने स्थापन झालेल्या प्रकल्पाचे दैनंदिन कामकाज चालवण्याकरिता रु. १ कोटी रकमेचा निधी शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाला मा. उपाध्यक्ष/प्रा., यांनी उपलब्ध करुन दिला. त्यास प्राधिकरणाने आजच्या बैठकीत कार्योत्तर मंजूरी दिली.

३) दिनांक १ एप्रिल, १९९८ रोजी राजीव गांधी निवारा प्रकल्प बंद झाला त्यावेळी प्रकल्पाचा शिल्लक असलेला मुक्त निधी (क्लोजिंग बॅलन्स) रुपये ३० कोटी प्राधिकरणाने पूर्वी घेतलेल्या ठराव क्र. ५३०९, दिनांक ६/४/१९९८ च्या निर्णयाप्रमाणे नव्याने स्थापन झालेल्या शिवशाही पुनर्वसन प्रकल्पास कर्ज म्हणून उपलब्ध करुन द्यावा, यास प्राधिकरणाने आजच्या बैठकीत मान्यता दिली.

४) प्राधिकरणाने आज शासनाकडून शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाकरिता रु. ३००/- समभागाच्या स्वरुपात म्हाडाने गुंतविण्याबाबत जी विनंती केली आहे त्या विनंती पत्राची नोंद घेतली.

दिनांक १ एप्रिल, १९९८ पासून शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाची स्थापना झाली आहे व प्रकल्पाचे कार्य सुरू झालेले आहे.

५) नजिकच्या भविष्यात प्रकल्पाचे कंपनीमध्ये रुपांतर व्हावयाचे असल्याने म्हाडाकडून घ्यावयाची रक्कम रु. ३०० कोटी समभाग (इक्विटी शेअर्स) अपेक्षित आहे, याची नोंद घेण्यात आली. हे करत असताना म्हाडाचे आर्थिक हित जपण्यासाठी योग्य त्या उपाययोजनेबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी प्राधिकरणाची एक 'विशेष बैठक' आयोजित केली जाईल, असे मा. अध्यक्ष/प्रा., यांनी आज बैठकीत जाहीर केले. या विशेष बैठकीस सर्व प्रादेशिक मंडळाचे मा. सभापती आणि मा. मंत्री, गृहनिर्माण यांना निमंत्रित करण्यात येईल, असे मा. अध्यक्ष/प्रा., यांनी सांगितले. सदर 'विशेष बैठकीत' शिवशाही पुनर्वसन प्रकल्प नावाच्या कंपनीत रु. ३०० कोटी समभागाच्या स्वरुपात गुंतविण्यासंबंधी विचारपूर्वक निर्णय घेण्यात येईल.

वरील ठरावावर श्री. कारखानीस, सदस्य/प्रा., यांनी आपले मत विशेष बैठकीत चर्चा होईपर्यंत राखून ठेवले.

| **Item No.** | **10** | **Resolution No.** | **5317** |
|---|---|---|---|

विषय : इमारत दुरुस्ती व पुनर्रचना कार्यक्रमासाठी देण्यात येणाऱ्या उचल रकमेवरील व्याज आकारणीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीमध्ये नमूद केलेली आर्थिक स्थिती विचारात घेता, प्राधिकरणाने इमारत दुरुस्ती व पुनर्रचना कार्यक्रमासाठी १९८७-८८ ते १९९२-९३ या कालावधीत दिलेल्या तात्पुरत्या उचल (ब्रिजींग फायनान्स) रकमेवर १० टक्के दराने वसूल केलेले व्याज तसेच दि. ३१-३-१९९८ रोजी येणे बाकी असलेल्या रु. १९००.०० लाख मुद्दल रकमेवर ते फिटेपर्यंत उपार्जित होणारे व्याज आणि १९९३-९४ वर्षापासून दरवर्षी दिलेल्या व वसूल केलेल्या तात्पुरत्या उचल रकमेवर ११ टक्के दराने वसूल केलेले व्याज माफ करण्याची मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची विनंती मान्य करता येण्यासारखी नाही. मात्र १९९८-९९ वर्षापासून त्या फंडाच्या जमा रकमेच्या अधिन राहून देण्यात येणाऱ्या तात्पुरत्या उचल रकमेवर ११ टक्के ऐवजी ५ टक्के या दराने व्याज आकारणी करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. त्याचबरोबर शासनाकडून मंजूर अंशदान/उपकराची रक्कम मिळण्यास विलंब होत असल्याने प्राधिकरणाकडून तात्पुरती उचल घेण्याची पाळी येते. त्यामुळे व्याजाचे दायित्व चुकविण्याच्या दृष्टीने वेळीच अंशदान/उपकराची रक्कम वितरीत करण्याबाबत मंडळाने शासनाकडे आग्रह धरावा अथवा व्याजाच्या रकमेची शासनाकडून प्रतिपूर्ती होण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच काही वर्षेपर्यंत (रु. १९ कोटीच्या जवळपास अनुदान येईपर्यंत) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास प्राधिकरणाने रु. १० कोटी ऐवजी रु. १५ कोटी अनुदानाच्या स्वरुपात द्यावे.

| **Item No.** | **11** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९९५-९६ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्वीकृत करण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **12** | **Resolution No.** | **5318** |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणामध्ये व प्राधिकरणांतर्गत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांचे कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६० वर्षे असे वाढविणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाने आपल्या दिनांक २७/७/९५ च्या ठराव क्र. ५१९४ अन्वये मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा., यांना शासनाकडून आलेले सर्व निर्णय जसेच्या तसे लागू करण्याचे जे अधिकार दिलेले आहेत त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेनिवे-१०९८/४५/सेवा-४, दिनांक २९ मे १९९८ लागू करण्याच्या उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या निर्णयास प्राधिकरणाची ही सभा कार्योत्तर मंजूरी देत आहे. या निर्णयानुसार प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्तीचे वय आता ५८ वर्षाऐवजी ६० वर्षे राहील. सदर निर्णयाची अंमलबजावणी शासन निर्णयाच्या अधीन राहून करण्यासही परवानगी सदर प्राधिकरण देत आहे.

**Item No.** 13 **Resolution No.** 5319

विषय : कोंकरी आगार, वडाळा येथील जमिनीवर मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. यांना सुमारे १५०० सदनिकांचे बांधकाम देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कोंकरी आगार, वडाळा येथे उर्वरित जमिनीवर प्रशासनाने सुचविलेल्या विकल्प - २, नुसार, पुनर्वसन/अल्प उत्पन्न गटाच्या सदनिका बांधण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या सदनिका शासनाच्या दिनांक १२-३-१९९७ च्या निर्णयानुसार मे. बी. जी. एस. टी. एल. यांना दुसया टप्प्यात यावयाच्या ५००० सदनिकांच्या टप्प्याचा भाग राहील व यासाठी शासनाने दि. १२-३-९७ च्या निर्णयात गठीत केलेल्या समितीने निश्चित केलेला बांधकामाचा दर मे. बी. जी. एस. सी. टी. एल. यांचेवर बंधनकारक राहील. मात्र ? पाईलसाठी जर लवादाने अधिकचा दर त्यांचे निर्णयात दिला तर तो मे. बी. एस. सी. टी. एल. यांना देय राहील.
या निर्णयाची अंमलबजावणी या बैठकीचे कार्यवृत्त पुढील बैठकीत स्थायी होण्याची वाट न बघता करण्यात यावी.

**Item No.** 14 **Resolution No.** 5320

विषय : पवई महाप्रकल्प - १.
सुधारीत स्पेसिफिकेशनच्या अतिरिक्त खर्चास मंजूरीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत पवई येथील १४ अतिरिक्त बाबींसाठीच्या रु. २.५७ कोटीच्या अतिरिक्त खर्चास तसेच निविदा रकमेच्या २६.२० टक्के कमाल खर्चाच्या मर्यादित अतिरिक्त बाबींचे प्रदान करण्यासाठी प्राधिकरणाची ही सभा मान्यता देत आहे.
सदर निर्णयाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करावी.

**Item No.** 15 **Resolution No.** 5321

विषय : व्यापारी गाळ्यांचे वितरण म्हाडा विनियम १९८१ मधील कलम २१ के मध्ये सुधारणा करण्याविषयी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
म्हाडा विनियम १९८१ मधील कलम २१ (के) मध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी, असे मुंबई मंडळाने प्रस्तावित केलेल्या प्रस्तावाला प्राधिकरणाची हद सभा एकमताने मान्यता देत आहे.
'उच्चतम निविदाकाराने गाळ्याची रक्कम ठरवून दिलेल्या मुदतीत न भरल्यास त्याचे वितरण रद्द करण्यात यावे. त्यानंतर द्वितीय क्रमांकावर ज्या निविदाकाराची निविदा असेल त्याला त्याने देऊन केलेल्या किंमतीत गाळ्यांचे वितरण करण्यात यावे. परंतु दुसऱ्या क्रमांकावरची निविदा किमान अपेक्षित नक्की केलेल्या किंमतीपेक्षा कमी नसल्याची खात्री करून घ्यावी.'
सदर प्रस्ताव विनियमात सुधारणा करण्यासाठी शासनाकडे पाठवावा. असेही प्राधिकरणाची ही सभा एकमताने ठरवित आहे.

| **Item No.** | **16** | **Resolution No.** | **5322** |
|---|---|---|---|

विषय : पिंपरी, वाघीरे - मोरवाडी पुणे येथील दुसऱ्या टप्प्यातील कामे (२०८ एल. आय. जी. व १९२ एम. आय. जी./एचआयजी) टप्पा क. १ मध्ये कार्यरत असलेल्या दोन ठेकेदारांना विभागून थेट पद्धतीने देण्याबाबतचा प्रस्ताव).

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाची ही सभा विशेष बाब म्हणून मुख्य अधिकारी, पुणे मंडळ यांना १५ दिवसाच्या सिमित कालावधीत जाहिर निविदा काढून या कामासाठी निविदा मागविण्याची परवानगी देत आहे. तसेच प्राधिकरण असेही निर्देश देत आहे की, सदर निविदा प्राप्त झाल्यानंतर त्यावर संबंधितांनी त्वरीत निर्णय घेऊन पावसाळ संपतासंपता ही कामे सुरू होतील, असे पहावे.
उपरोक्त विषयाबाबत स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करावी, असे ठरले.

| **Item No.** | **17** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी प्रतिनियुक्तीवरील अधिकारी यांना सेवानिवासस्थाने वाटप करण्याबाबतची सुधारित मार्गदर्शक तत्वे ठरविण्याबाबतची सुधारित मार्गदर्शक तत्वे ठरविण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **18** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : शिस्तभंगाचा कार्यवाही म्हणून विभागीय चौकशी पूर्ण करून दिलेली शिक्षा रद्द करण्यासाठी श्री. सरोदे, सहाय्यक मिळकत व्यवस्थापक (बडतर्फ) यांनी प्राधिकरणापुढे केलेल्या अपिलावर निर्णय घेणेबाबत.

ठराव :

| **Item No.** | **19** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : श्री. मधू चव्हाण, सभापती, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांना राज्यमंत्र्यांचा दर्जा दिल्याबाबत.

ठराव :

**Item No.** 20 **Resolution No.** 5323

विषय : शिवाजी शिक्षण संस्थेस, पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई येथे सर्व्हे क्र. २६३-ए वर ९९ वर्षाचे भुईभाडे तत्वावर तांत्रिक, माध्यमिक शाळेकरिता १४३८८ चौरस यार्डाच्या वितरीत केलेल्या भूखंडासंबंधी संस्थेबरोबर करावयाच्या भुईभाडेपट्टा करारासंबंधी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शिवाजी शिक्षण संस्था, घाटकोपर यांची मागणी विचारात घेण्यासाठी सदर जमीन १९६० साली तत्कालीन महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने दिली असल्याने बाब टिप्पणीत खेळाच्या मैदानासाठीच्या ५० टक्के जमिनीची किंमत घेणेबाबत नमूद केले.
प्राधिकरणाचे १९९२ चे किंमतीविषयक धोरण लागू न करता सदर जमीन त्यांच्याच ताब्यात असल्यामुळे यापूर्वी महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने केलेले ठराव क्रमांक ५३०४ व ५७५२ हे सदर संस्थेकडून जमीन परत घेण्याचे ठराव रद्दबातल ठरविण्यात येत आहेत. आणि सदरहू संस्थेच्या ताब्यात असलेली जमीन पूर्वीच्याच अटी व शर्तीनुसार भाडेपट्टी करारनामा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

---

**Item No.** 20 **Resolution No.**

विषय : शिवाजी शिक्षण संस्थेस, पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई येथे सर्व्हे क्र. २६३-ए वर ९९ वर्षाचे भुईभाडे तत्वावर तांत्रिक, माध्यमिक शाळेकरिता १४३८८ चौरस यार्डाच्या वितरीत केलेल्या भूखंडासंबंधी संस्थेबरोबर करावयाच्या भुईभाडेपट्टा करारासंबंधी.

ठराव :

---

**Item No.** 20 **Resolution No.** 5323

विषय : शिवाजी शिक्षण संस्थेस, पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई येथे सर्व्हे क्र. २६३-ए वर ९९ वर्षाचे भुईभाडे तत्वावर तांत्रिक, माध्यमिक शाळेकरिता १४३८८ चौरस यार्डाच्या वितरीत केलेल्या भूखंडासंबंधी संस्थेबरोबर करावयाच्या भुईभाडेपट्टा करारासंबंधी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शिवाजी शिक्षण संस्था, घाटकोपर यांची मागणी विचारात घेण्यासाठी सदर जमीन १९६० साली तत्कालीन महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने दिली असल्याने बाब टिप्पणीत खेळाच्या मैदानासाठीच्या ५० टक्के जमिनीची किंमत घेणेबाबत नमूद केले.
प्राधिकरणाचे १९९२ चे किंमतीविषयक धोरण लागू न करता सदर जमीन त्यांच्याच ताब्यात असल्यामुळे यापूर्वी महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने केलेले ठराव क्रमांक ५३०४ व ५७५२ हे सदर संस्थेकडून जमीन परत घेण्याचे ठराव रद्दबातल ठरविण्यात येत आहेत. आणि सदरहू संस्थेच्या ताब्यात असलेली जमीन पूर्वीच्याच अटी व शर्तीनुसार भाडेपट्टी करारनामा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

---

**Item No.** 21 **Resolution No.** 5324

विषय : श्री. आर. एम. फडके, सनदी लेखापाल यांच्या कंत्राटी नेमणूकीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शासनाने मुंबईतील चाळीस लाख झोपडपट्टीवासियांना मोफत घरे पुरविण्याची योजना पूर्णत्वास नेण्यासाठी जी जबाबदारी म्हाडावर सोपविली आहे, त्याकरिता आवश्यक असलेला निधी उभा करण्याच्या दृष्टीने म्हाडाच्या लेख्याचे वाणिज्य पद्धतीत रुपांतर करण्याविषयी आणि म्हाडाच्या अधिकारी/कर्मचारी वर्गाला वाणिज्य लेखापद्धतीचे प्रशिक्षण देऊन परिपूर्ण करण्याच्या दृष्टीने तसेच म्हाडाच्या सर्व मंडळातील/प्रकल्पातील सर्व कामांचे व लेख्यांचे पूर्णपणे संगणीकरण करणे व म्हाडाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना संगणीकरण शिकविणे यासाठी श्री. आर. एम. फडके, सनदी लेखापाल यांची म्हाडामध्ये कंत्राटी पद्धतीने प्रथमतः एक वर्षासाठी रु. १०,०००/- प्रति महिना नेमणूक करण्याबाबत सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे. श्री. फडके यांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती, मानधन बाब टिप्पणी सोबतच्या प्रपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे असतील. तसेच आवश्यकतेनुसार हा कालावधी वाढविण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यासही मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 22 **Resolution No.**

विषय : बृहन्मुंबईत झोपडपट्टी रहिवाशांकरिता सुमारे १.२५ लाख घरे बांधण्यासाठी म्हाडाच्या अंतर्गत व म्हाडाचा अंगभूत घटक म्हणून 'शिवशाही पुनर्वसन प्रकल्प' ही नवीन यंत्रणा निर्माण करणे तसेच पूर्वीच्या जागतिक बँक प्रकल्पातील आणि राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्पातील कर्मचाऱ्यांना म्हाडामध्ये कंत्राटी पद्धतीवर नेमणूका देणेबाबत.
२) बृहन्मुंबईतील झोपडपट्टी रहिवाशांना मोफत घरे पुरविण्याकरिता म्हाडा विकासकाची भूमिका बजावण्यासाठी मान्यता देणे तसेच अनुषंगिक सवलती/मंजूरी देणे.

ठराव :

**Item No.** 23 **Resolution No.** 5325

विषय : संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांना अधिकार प्रदान करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जे अधिकार आहेत ते अधिकार संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांना प्रकल्पाचे दैनंदिन कामकाज घालण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी प्रदान केले आहेत. या निर्णयास प्राधिकरणाची ही सभा कार्योत्तर मंजूरी देत आहे.
२) संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांना कोणते विशिष्ट अधिकार प्रदान करण्याची आवश्यकता आहे, याबाबत उपाध्यक्ष/प्रा. व संचालक शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांनी एकत्र बसून सविस्तर सूची तयार करावी आणि सदर सूचीत मा. अध्यक्ष/प्रा. यांनी मान्यता घ्यावी.
३) संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांना दिलेल्या अधिकारानुसार त्यांनी घ्यावयाच्या ज्या निर्णयाचे परिणाम इतर प्रादेशिक मंडळे/विभागावर होणार असतील तर असे निर्णय संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांनी संबंधित मंडळाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून सर्वसंमतीने निर्णय घ्यावेत. ज्या विषयावर एकमत होणार नाही असे सर्व विषय उपाध्यक्ष व अध्यक्ष/प्रा. यांच्या मान्यतेने प्राधिकरणापुढे ठेवण्यात यावेत.
४) संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून प्रकल्पाकडून जे जे निर्णय घेण्यात येतील ते सर्व निर्णय संपूर्ण तपशीलासह संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांनी प्राधिकरणासमोर माहितीस्तव ठेवावेत.

**Item No.** 24 **Resolution No.** 5326

विषय : पुनर्रचित इमारत १६ जी ते के नवी चिखलवाडी येथील गाळे वितरणाबाबत.

पुनर्रचित इमारतीतील गाळे देताना जुन्या रहिवाशांना हस्तांतरण आकार लावण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पुनर्रचित इमारतीतील ऑक्युपन्ट या सदराखाली रहात असलेली व्यक्ती जर सदर गाळा आपल्या नावावर हस्तांतरित करून मागत असेल तर अशा गाळेधारकांना खोलीचे हस्तांतरण रु. ५,०००/- हस्तांतरण शुल्क घेऊन करून देण्यात यावेत. मात्र गाळेधारक कायदेशीर वारस असेल तर हे हस्तांतरण शुल्क रु. १,०००/- इतकेच असावे.

| **Item No.** | **25** | **Resolution No.** | **5327** |
|---|---|---|---|

विषय : मौ. मालाड (दिंडोशी) येथील स. क्र. २३९/१ पै. सुमारे ३० एकर जमीन प्रबोधन गृहनिर्माण संस्थेला वितरित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्रबोधन गृहनिर्माण संस्थेने मौ. मालाड (दिंडोशी) येथील स. क्र. २३९/१ पै येथील ३० एकर जमिनीची मागणी केली आहे. कुठल्याही संस्थेस जमीन वाटपाचे थेट अधिकार प्राधिकरणास नसल्याने सदर जमीन शासन स्तरावरून प्रबोधन गृहनिर्माण संस्थेस वाटप करण्याचा विचार झाल्यास प्राधिकरणाने मागणी केलेली घाटकोपर येथील स. क्र. २३६-अ येथील शासनाची जमीन प्राधिकरणाला देण्याच्या अटीवर ही शिफारस करण्यात येत आहे.

| **Item No.** | **26** | **Resolution No.** | **5328** |
|---|---|---|---|

विषय : ३६-ब, चंपागल्ली (गणेश भवन) काळबादेवी या इमारतीच्या पुनर्बांधणीच्या निविदाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने प्रस्तावित केल्याप्रमाणे ३५-ब, चंपागल्ली (गणेश भवन) काळबादेवी या इमारतीच्या पुनर्बांधणीच्या निविदेचा देकार फेटाळण्यात येत आहे व ती निविदा पुन्हा बोलविण्याच्या मंडळाच्या प्रस्तावाशी प्राधिकरण सहमती दर्शवित आहे.
वरीलप्रमाणे मूळ विषयसूचीवरील व आयत्यावेळच्या विषयावर चर्चा झाल्यानंतर मा. अध्यक्ष/प्रा. यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाल्याचे जाहीर केले.

**Meeting No.** **Special** **Meeting Date** **01-Jul-19**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १५-६-१९९८ रोजी झालेल्या १५१ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** **2** **Resolution No.** **5329**

विषय : शिवशाही पुनर्वसन कंपनी (प्रस्तावित) करिता रु. ३०० कोटी समभाग उपलब्ध करून देणेबाबत.

ठराव : बहुमताने निर्णय घेतला की,

गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक विसआ-१०९७/प्रक्र. १२१(९७)/प्रशासन-३, दिनांक २८ मे १९९८ शासन निर्णय क्रमांक एचएसजी/१०९८/प्रक्र. ४७/भाग-२/गृनिधी-१, दि. २८ मे १९९८ आणि शासन निर्णय क्रमांक एचएसजी/१०९८/प्रक्र. ४७/भाग-२/गृनिधी-१, दिनांक ३० जून, १९९८ च्या अनुषंगाने व म्हाडा अधिनियम १९७६ कलम २८ (१) (तीन) आणि कलम २८ (३) (पाच) प्रमाणे शिवशाही पुनर्वसन कंपनी (नियोजित) साठी रु. ३०० कोटी समभाग देण्यास मान्यता देण्यात येत आहे. व्यवस्थापकीय संचालक, शिवशाही पुनर्वसन कंपनी (नियोजित) यांनी मागणी केल्याप्रमाणे समभागाचा निधी टप्प्याटप्प्याने देण्यात यावा. म्हाडाच्या मुंबईतील झोपडपट्टीने व्यापलेल्या किंवा खुल्या जमिनी सरसकट शिवशाही पुनर्वसन कंपनीला (नियोजित) हस्तांतर न करता प्रकल्पनिहाय व गरजेप्रमाणे हस्तांतर करण्यासाठी तत्वतः मान्यता देण्यात येत आहे. शिवशाही पुनर्वसन कंपनी (नियोजित) यांनी तयार केलेल्या योजनेला झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मान्यता दिल्यानंतर प्रकल्पासाठी आवश्यक जमिनी व्यवस्थापकीय यांनी राहतील. या अनुषंगाने घेतलेले निर्णय हे उपाध्यक्ष/प्रा. प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत माहितीस्तव सादर करतील. झोपडपट्टीने व्यापलेल्या जमिनीची किंमत फडझलपूरकर समितीने शिफारस केल्याप्रमाणे व राज्य शासनाने मान्य केल्याप्रमाणे शून्य गृहित धरण्यात यावी. प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या मोकळ्या जमिनीचे बाजारभावाप्रमाणे मूल्यनिर्धारण करण्यात यावे व शिवशाही पुनर्वसन कंपनीला मोकळ्या जमिनी हस्तांतर करत असताना त्यांच्या किंमतीची नोंद घेण्यात यावी. शिवशाही पुनर्वसन कंपनीला जमीन हस्तांतर करीत असताना म्हाडाने विकासक म्हणून भूमिका अदा करण्यासाठी नियोजित केलेला टप्पा-१ (बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र. ३ (अ), ३ (ब) व मुंबई मंडळाला नियमित गृहनिर्माण प्रकल्पासाठी आवश्यक असलेली मोकळी जमीन हस्तांतरणातून वगळण्यात यावी.

वरील ठरावास श्री. कारखानीस, कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी व सदस्य/प्राधिकरण यांनी आपला विरोध नोंदविला. यास्तव ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

वरीलप्रमाणे सविस्तर चर्चा केल्यानंतर मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांनी मा. मंत्री, गृहनिर्माण, मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण आणि उपस्थित प्राधिकरण सदस्य व प्रादेशिक मंडळाचे सभापती यांचे आभार मानून बैठक समाप्त झाल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 152 **Meeting Date** 06-Aug-1

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १५-६-१९९८ रोजी झालेल्या १५१ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १-७-१९९८ रोजी झालेल्या विशेष बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या दि. १८/५/१९९८ रोजी झालेल्या १५० व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल.

ठराव :

**Item No.** 4 **Resolution No.**

विषय : शिस्तभंगाची कार्यवाही म्हणून विभागीय चौकशी पूर्ण करून दिलेली शिक्षा रद्द करण्यासाठी श्री. सरोदे, सहाय्यक मिळकत व्यवस्थापक (बडतर्फ) यांनी प्राधिकरणापुढे केलेल्या अपिलावर निर्णय घेणेबाबत.

ठराव :

**Item No.** 5 **Resolution No.** 5330

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९९५-९६ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्वीकृत करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९९५-९६ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा स्वीकृत करण्यात येत आहे.

**Item No.** 6 **Resolution No.** 5331

विषय : मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास प्राधिकरणाकडून दरवर्षी देय झालेले रुपये दहा कोटींचे अंशदान.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ च्या सुधारित कलम ९७ (२) अन्वये प्राधिकरणाकडून पुनर्रचना कार्यक्रमासाठी प्राधिकरणाचे अंशदान म्हणून मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाला दरवर्षी देय झालेले रुपये १० कोटी इतकी रक्कम देण्याकरिता 'प्राधिकरणाकडून मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास पुनर्रचना कार्यक्रमासाठी प्राधिकरणाचे अंशदान म्हणून द्यावयाचा निधी' या नावाचा खास निधी निर्माण करण्यास तसेच,

२) मार्च, १९९७ अखेर असलेल्या प्राधिकरण (खुद्द) च्या अधिक्य निधीच्या रकमेतून रु. ३२ कोटी प्रथमतः या निधीकडे वर्ग करण्यास आणि

३) १९९८-९९ च्या वार्षिक लेख्यापासून पुढे दरवर्षी प्रादेशिक मंडळे हे अधिक्य निर्माण करतील. त्या अधिक्याच्या रकमपैकी किमान १० टक्के रक्कम त्या मंडळाकडून वरील राखीव निधीमध्ये जमा करण्याकरिता दरवर्षी प्राधिकरणाकडे वर्ग करण्यास व

४) १९९८-९९ च्या वार्षिक लेख्यापासून पुढे दरवर्षी प्राधिकरण (खुद्द) कडे आयडल निधीच्या गुंतवणूकीतून जमा होणाऱ्या व्याजाच्या रकमेपैकी किमान १० टक्के रक्कम प्राधिकरण स्तरावर वरील निधीमध्ये जमा करण्यासाठी वर्ग करण्यास व उर्वरित व्याजाची रक्कम पूर्वीच्या निकषाप्रमाणे सर्व मंडळांकडे वर्ग करण्यास,

५) त्याचप्रमाणे हे अंशदान कलम ९७ (२) च्या सुधारणानुसार फक्त पुनर्रचित कार्यक्रमासाठीच देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित या नियोजित कंपनीची प्रारुप घटना व प्रारुप नियमावली ('मेमोरंडम ऑफ असोसिएशन' आणि 'आर्टिकल्स ऑफ असोसिएशन') बाबत अभिप्राय.

ठराव :

**Item No.** 8 **Resolution No.** 5332

विषय : राष्ट्रीय प्रतिदर्श सर्व्हेक्षण संघटना सांख्यिकी विभाग, केंद्र सरकार यांचे क्षेत्रीय कार्यालयासाठी पुणे व कोल्हापूर येथे प्राधिकरणाच्या व्यापारी संकुलात अनिवासी जागा देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
राष्ट्रीय प्रतिदर्श सर्व्हेक्षण संगठन या केंद्र सरकारच्या अखत्यारितील संघटनेस महर्षी नगर, पुणे येथे ४२०० चौरस फूट ना-रहिवासी जागा व नागलापार्क, कोल्हापूर येथील नियोजित व्यापारी संकुलात प्रचलित बाजारभावाप्रमाणे किंमत आकारून ११०० चौरस फूट क्षेत्रफळाची जागा आरक्षित करून वाटप करण्यात यावी. त्याचप्रमाणे भविष्यात प्राधिकरणाच्या विविध मंडळांमार्फत बांधण्यात आलेल्या व्यापारी संकुलामध्ये केंद्र सरकार व राज्य सरकारच्या विविध विभागाकडून मागणी आल्यास त्याबाबतीत निर्णय घेण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत. मा. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण यांनी भविष्यात अशा प्रकारे मागणी आल्यास प्रचलित बाजारभाव लक्षात घेऊन त्या आधारे किंमतीवर वाटप करण्याचा निर्णय घ्यावा.

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांना अधिकार प्रदान करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.** 5333

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत कामे करण्यासाठी कंत्राटदारांची नोंदणी करण्याबाबतचे सुधारित नियम लागू करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक २०.४.९८ रोजीच्या परिपत्रकातील खालील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात यावी.

१) कंत्राटदाराची कामे करण्याची क्षमता नवीन वर्गाप्रमाणे नोंदविण्यात यावी.

२) कंत्राटदाराच्या नोंदणी/नूतनीकरण/श्रेणीवाढ इ.साठी अटी व शर्ती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुधारित (अपेंडीक्स ११) १९९८ अन्वये असाव्यात.

३) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या परिपत्रकातील तरतुदींनुसार नोंदणी अधिकाऱ्याने सुधारित नियमांच्या श्रेणीनुसार नवीन अध्यादेश काढावेत.

४) कंत्राटदाराच्या नोंदणी पद्धतीबाबत खालील पद्धतीचा अवलंब करावा.

अ) वर्ग-१ व २ मधील नोंदणी, नूतनीकरण, श्रेणीवाढ इत्यादी करिता उपाध्यक्ष/प्रा. निर्णय घेतील. प्रस्ताव वित्त नियंत्रक/प्रा., मुख्य अभियंता-२/प्रा., मुख्य अभियंता-१/प्रा. यांचेमार्फत उपाध्यक्ष/प्रा. यांना सादर करण्यात यावेत.

ब) स्थापत्य शाखेतील वर्ग-३, वर्ग-३ व वर्ग-४(अ) तसेच विद्युत शाखेतील वर्ग-अ व ब कंत्राटदारांच्या नोंदणी, नूतनीकरण, श्रेणीवाढ इत्यादीकरिता मुख्य अभियंता-१,२/प्र. निर्णय घेतील. प्रस्ताव वित्त नियंत्रक/प्रा. यांचे मार्फत मुख्य अभियंता-१,२/प्राधिकरण यांचेकडे सादर करण्यात यावेत.

क) स्थापत्य शाखेतील वर्ग-५, ६, ७, ८ व ९ तसेच विद्युत वर्ग - क, ड व ई यांचे अधिकार प्रादेशिक मंडळाच्या उपमुख्य अभियंता दर्जाच्या मुख्य अधिकाऱ्यांना राहतील. जेथे मुख्य अधिकारी, उपमुख्य अभियंता दर्जाचे नसतील तेथे सदरची कार्यवाही त्या मंडळाचे काम पाहणारे मुख्य अधिकारी पाहतील. हे प्रस्ताव कार्यकारी अभियंता व मुख्य लेखाधिकारी यांचेमार्फत प्राप्त करून त्यावर निर्णय घेण्यात यावेत. तसेच या वर्गातील मुंबईतील सर्व प्रस्तावांवर उपमुख्य अभियंता (दक्षिण) यांनी निर्णय घ्यावेत.

ड) उर्वरित बाबी शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, निर्णय दिनांक २०.४.९८ प्रमाणे राहतील.

इ) सुशिक्षित व बेरोजगार अभियंत्यांना सवलती व नोंदणीबाबत मुख्य अभियंता-१/प्रा. यांचे परिपत्रक क्रमांक - का.अ.३/मु.अ.२/१०६७/दिनांक ३.५.९७ मधील पद्धती व तरतुदींचा अवलंब करावा. यात नोंदणी झाल्यावर बेरोजगार अभियंत्यांना त्याचे वर्गीकरणाच्या किंमतीइतके म्हणजे रु. ५ लाख ऐवजी रु. १५ लाख असा बदल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुधारित नियमानुसार करण्यात यावा.

| **Item No.** | **11** | **Resolution No.** | **5334** |
|---|---|---|---|

विषय : सावेडी, अहमदनगर येथील १९२ गाळे मध्यम उत्पन्न गट योजनेची अंतिम विक्री किंमत निश्चित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नाशिक मंडळाने सावेडी, अहमदनगर येथील १९२ गाळे मध्यम उत्पन्न गट योजनेतील प्रत्यक्ष खर्चावर आधारित निश्चित केलेली किंमत रु. ४९,५००/- प्रति गाळा अंतिम करण्यास प्राधिकरणाची मान्यता देण्यात येते. तसेच न्यायालयाची अंतरिम स्थगिती उठविण्याबाबत आवश्यक ती पुढील कार्यवाही विधी सल्लागार/प्राधिकरण यांनी त्वरित पूर्ण करावी.

| **Item No.** | **12** | **Resolution No.** | **5335** |
|---|---|---|---|

विषय : एस.आर.डी. योजनांमध्ये अतिरिक्त चटई क्षेत्रफळामध्ये उपलब्ध होणाऱ्या पुनर्वसन सदनिकांचे वितरणाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्रशासनाने बाब टिप्पणीत नमूद करण्यात आलेले धोरण योग्य आहे व त्यास प्राधिकरण एकमताने मान्यता देत आहे. त्यानुसार यापुढे एस.आर.डी. योजनांतर्गत तयार होणाऱ्या पुनर्वसनाच्या सदनिका एम.एस.आर.डी.सी./रेल्वे/इंडियन नेव्ही किंवा इतर सार्वजनिक उपक्रमातील संस्थांना देताना या धोरणाप्रमाणे पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी.

| **Item No.** | **13** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे उस्मानाबाद जिल्ह्यातील भूकंप पुनर्वसनाचे समन्वयक म्हणून उत्कृष्ट काम केल्याबद्दल शासनाकडून म्हाडाचा गौरव.

ठराव :

| **Item No.** | **14** | **Resolution No.** | **5336** |
|---|---|---|---|

विषय : ३६-ब, चंपागल्ली, गणेश भुवन, काळबादेवी या इमारतीच्या पुनर्बांधणी कामाच्या दुसऱ्या वेळी मागविलेल्या निविदांबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीतील निविदेतील दर कमी करून निविदा मान्य करण्याचा निर्णय मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ व मुख्य अभियंता-२/प्राधिकरण यांनी एकत्रितपणे घेण्यात यावा.
निविदा भरणारे कंत्राटदार जर कमी केलेल्या दरावर येत नसेल तर सदर काम कार्यालयामार्फत करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**Item No.** **15** **Resolution No.** **5337**

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याविषयी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यात यावा.
२) घरबांधणी अग्रिमाकरिता प्राधिकरण अधिनियम १९७६ नियम १६२ मधील तरतुदींनुसार प्राधिकरणाच्या स्तरावर स्वतंत्र निधी उभारण्यात यावा. प्रारंभी या निधीमध्ये प्राधिकरणाच्या शिल्लक निधीमधून रुपये पन्नास लक्ष वर्ग करण्यात यावेत.
३) म्हाडा घरबांधणी अग्रिम अधिनियम १९८४ चे नियम रद्द करून शासनाने घरबांधणीसंबंधी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील नियमच म्हाडाचे नियम म्हणून स्वीकारावेत.

**Item No.** **16** **Resolution No.**

विषय : १ मे दिनानिमित्त शिवाजी पार्क, दादर येथे चित्ररथ संचलन.

चित्ररथ बांधणीसाठी वांद्रे रेक्लमेशन मैदान खास बाब म्हणून विनामूल्य उपलब्ध करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 17 **Resolution No.** 5338

विषय : केंद्र शासनाने अत्यल्प उत्पन्न गट व अल्प उत्पन्न गट या प्रवर्गासाठी राज्य शासनास निर्देशित केलेल्या ७७,४२० सदनिकांच्या योजनेबाबत कृती आराखडा (ॲक्शन प्लान).

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) केंद्र शासनाने राज्य शासनास निर्देशित केलेल्या ७७,४२० सदनिकांच्या योजनेअंतर्गत अत्यल्प व अल्प उत्पन्न गटासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेच्या कृती आराखड्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही सुरू करावी.
२) सदरहू योजनेच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार विभागीय मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांना बाब टिप्पणीत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रदान करण्यात येत आहेत.
३) प्रचलित पद्धतीने आकारण्यात येणाऱ्या आस्थापना खर्चामध्ये सुधारणा करून तो खर्च १२ टक्क्यांऐवजी ५ टक्के आकारणे व अपेक्षित निविदा अधिक्य (टेंडर प्रिमियम) १० टक्के ऐवजी ५ टक्के ठेवणे व एस्कलेशन तरतूद निरंके करण्यास मान्यता देण्यात येते. एस्कलेशन तरतूद टेंडरमधून वगळण्यात यावा व तसा स्पष्ट उल्लेख निविदा कागदपत्रामध्ये करावा.
४) योजनेसाठी लागणारा निधी हुडको अथवा तत्सम वित्तीय संस्थांकडून कर्जरूपाने घेण्यास प्राधिकरण संमती देत आहे व तसा प्रस्ताव मुख्य अधिकाऱ्यांनी वित्तीय संस्थेकडे विहित नमुन्यात पाठवावेत.
५) ठोस मागणी असल्याशिवाय काम सुरू करण्यात येऊ नये व जेवढी निश्चित मागणी असेल तेवढ्याच सदनिका/गाळे यांचे काम हाती घेण्याची दक्षता घ्यावी.

**Item No.** 18 **Resolution No.**

विषय : शिवशाही पुनर्वसन प्रकल्पांतर्गत घेतलेल्या निर्णयाची माहिती प्राधिकरणास सादर करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 19 **Resolution No.**

विषय : मुंबई मंडळाच्या एस.आर.डी. परिमंडळांतर्गत कार्यान्वित असणाऱ्या योजनांविषयी मासिक प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 20 **Resolution No.** 5339

विषय : म्हाडा सुवर्ण महोत्सवी वर्ष कार्यक्रम आयोजनासाठी सन १९९८-९९ च्या सुधारित अंदाजपत्रकात आर्थिक तरतूद करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

सुवर्ण महोत्सवी वर्षात गठीत केलेल्या समितीच्या कार्यक्रमास दुजोरा देऊन त्यासाठी अपेक्षित असलेला खर्च व अशाच प्रकारच्या खर्चासाठी इतर प्रादेशिक मंडळांकडून भविष्यात संभवित असलेल्या निधीच्या मागण्या विचारात घेऊन त्यासाठी एक सामाजिक (सोशल वेल्फेअर) खर्चासाठी स्वतंत्र असा 'कल्याण निधी' निर्माण करण्यास व त्या निर्मितीनंतर त्यात प्राधिकरण (खुद्द) च्या अधिक्यातून रुपये २५ लाख निधी वर्ग करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे या निधीतून या सोबतच्या प्रस्तावानुसार अपेक्षित असलेला खर्च रुपये ८ लाख प्रित्यर्थ आवश्यक असलेली सविस्तर माहिती प्राप्त झाल्यानंतर ती रक्कम त्या समितीस देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

यानंतर सभापती, मुंबई मंडळ यांनी अशी विनंती केली की, मुंबई मंडळामार्फत पवई येथे बांधण्यात आलेल्या वसाहतीचा नामकरण समारंभ २२ ऑगस्ट, १९९८ रोजी आयोजित करण्यात आला आहे. त्यास प्राधिकरणाच्या सदस्यांना निमंत्रित करण्यात यावे.

यानंतर श्री. मोवर, सदस्य/प्रा. यांनी राजीव गांधी प्रकल्पांतर्गत ज्या सदनिका बांधण्यात आल्या आहेत व ज्यांची अनधिकृतरित्या विक्री झालेली आहे असे गाळे नियमित करण्यासाठी दंडात्मक फी आकारण्यात यावी व या सदनिका गाळेधारकांना नियमित करून द्याव्यात म्हणजे प्राधिकरणाच्या निधीत वाढ होईल, तसेच मुंबई मंडळाच्या विविध वसाहतींमध्ये अनधिकृतरित्या जी गॅरेज टाकण्यात आली आहेत अशांकडून दंडात्मक रक्कम वसूल करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्यात यावा.

यावर उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी असा खुलासा केला की, राजीव गांधी प्रकल्पांतर्गत ज्या सदनिका बांधण्यात आलेल्या आहेत त्या सदनिकांच्या नियमितीकरणासाठी व हस्तांतरणाबाबतचा प्रस्ताव दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून सादर करण्यात आलेला आहे त्याची प्राधिकरणाच्या स्तरावर तपासणी करण्यात येत आहे, ही बाब लवकरच प्राधिकरणाच्या बैठकीत निर्णयास्तव सादर करण्यात येईल. पुढे मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी सभागृहात असे आश्वासन दिले की, श्री. मोवर, सदस्य/प्रा. यांनी जे मुद्दे उपस्थित केले त्याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येईल व तसा प्रस्ताव प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करण्यात येईल.

उपरोक्त चर्चेनंतर वरीलप्रमाणे मूळ विषयसूचीवरील व आयत्या वेळच्या विषयावर चर्चा झाल्यानंतर मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाल्याचे जाहीर केले.

**Meeting No.** 153 **Meeting Date** 29-Sep-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ६-८-१९९८ रोजी झालेल्या १५२ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या दिनांक १५.६.९८ रोजी झालेल्या १५१ व्या बैठकीत व दिनांक १.७.९८ रोजी झालेल्या विशेष बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 5341

विषय : शिस्तभंगाची कार्यवाही म्हणून विभागीय चौकशी पूर्ण करून दिलेली शिक्षा रद्द करण्यासाठी श्री. सरोदे, सहाय्यक मिळकत व्यवस्थापक (बडतर्फ) यांनी प्राधिकरणापुढे केलेल्या अपीलावर निर्णय घेण्याबाबत विधी सल्लागार/प्रा. यांचे मत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. सरोदे, सहाय्यक मिळकत व्यवस्थापक (बडतर्फ) यांनी प्राधिकरणापुढे सादर केलेल्या अपीलावर पूर्ण विचार करून व उपलब्ध पुरावे विचारात घेता त्यांना सेवेतून बडतर्फ केल्याची शिक्षा कमी करून त्याऐवजी सक्तीची सेवानिवृत्ती अशी शिक्षा देण्यात आली. सक्तीची सेवानिवृत्तीची शिक्षा त्यांना ज्या तारखेपासून सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते त्या तारखेपासून अंमलात येईल.

**Item No.** 4 **Resolution No.** 5342

विषय : तत्कालीन राजीव गांधी निवारा प्रकल्प विभागात कंत्राटी पद्धतीवर कार्यरत असणाऱ्या अभियंत्यांना सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
तत्कालीन राजीव गांधी निवारा प्रकल्प विभागात दिनांक ३१.३.९८ पर्यंत कंत्राटी पद्धतीवर कार्यरत असणाऱ्या कनिष्ठ अभियंत्यांची वेतनश्रेणी रु. १४००-२३०० वरून रु. १६४०-२९०० शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १६.७.९७ जा.क्र.एमएचए/१०९६/प्रक्र.१५२/(९६)/प्रशा-३च्या आदेशामध्ये व प्राधिकरणाच्या दि.२३.७.९७ जा.क्र.एमएच/आरओपी-११८८/२९४२/प्र-७ च्या आदेशामध्ये सुधारित केल्याप्रमाणे दिनांक १.१.८६ अथवा प्रत्यक्ष नेमणूक स्वीकारलेल्या दिनांकापासून खालील अटींच्या अधीन राहून सुधारण्यात याव्यात.
१) वरील वेतनश्रेणी फक्त वेतननिश्चितीसाठी सुधारण्यात आली असून वेतन व भत्त्यामधील प्रत्यक्ष फरक दिनांक १.१.९६ पासून अनुज्ञेय राहील.
२) वरील सर्व कंत्राटी अभियंत्यांची सेवा दिनांक ३१.३.९८ पासून संपुष्टात आल्यामुळे व त्यांची दिनांक १.४.९८ पासून नव्याने नेमणूक केलेली असल्यामुळे त्यांचे दिनांक ३१.३.९८ रोजीचे निश्चित होणारे सुधारित वेतन संरक्षित करावे.
३) या सर्व कंत्राटी अभियंत्यांनी त्यांच्या सेवा समाप्तीच्या नोटीसाविरुद्ध न्यायालयात अर्ज दाखल केले आहेत व हे सर्व अर्ज प्रलंबित आहेत. यास्तव या सर्व अभियंत्यांना सुधारित वेतनश्रेणी मंजूर करताना अशी स्पष्ट जाणीव करून देण्यात यावी की, प्राधिकरणाच्या हक्कांना बाधा न आणता त्यांना हा लाभ देण्यात येत आहे. तसेच सुधारित वेतनश्रेणी लागू केल्यामुळे न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणी त्यांना त्यांची सेवा अखंडित होती असा हक्क प्रस्थापित करता येणार नाही. तसेच त्यांना नियमित सुधारित वेतनश्रेणी लागू केल्यानंतरसुद्धा त्यांची सेवा कंत्राटी पद्धतीवरच राहील.

---

**Item No.** 5 **Resolution No.** 5343

विषय : पूर्वीच्या मध्यप्रदेश गृहनिर्माण (महाकोशल मंडळाकडून) नागपूर गृहनिर्माण मंडळाला देणे असलेली रक्कम रु. ६७,३७६/- ची रक्कम निर्लेखित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, 'महाकोशल गृहनिर्माण मंडळा'कडे रु. ६७,३७६/- रक्कम थकीत राहिली होती. राज्य पुनर्रचनेच्यावेळी सदर महामंडळ मध्यप्रदेश राज्यात गेले. त्यावेळी बराचसा पत्रव्यवहार करण्यात आला होता. परंतु ही बाब निकाली निघाली नाही. सप्टेंबर, १९९७ मध्ये म्हाडाच्या १९८८-८९ या वर्षीच्या लेख्यांबाबत लोकलेखा समितीपुढे चर्चा झाली. त्यावेळी या विषयासंबंधी प्राधिकरणाकडून असा खुलासा करण्यात आला की, महाकोशल गृहनिर्माण मंडळाकडे थकीत असलेली रक्कम रु. ६७,३७६/- निर्लेखित करण्यात येईल. यास्तव सदर रक्कम रु. ६७,३७६/- निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 6 **Resolution No.** 5344

विषय : म्हाडाच्या कर्मचाऱ्यांना अदा करावयाच्या उपदानाच्या रकमेच्या परिगणनेच्या सूत्राचा समावेश म्हाडा कर्मचारी उपदान नियमावली १९८५ मध्ये करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरण, उपदान विनियम १९८५ नियम ५ (२) खाली उपदानाची रक्कम, वेतन अधिक महागाई भत्ता मागिले महिन्याचे दिवस २६, गुणिले १५ याप्रमाणे परिगणित करण्याबाबत सदर उपदान विनियमात दिनांक १५.६.१९८२ या पूर्वलक्षी प्रभावाने शासनाच्या मंजूरीने सुधारणा करण्यास मंजूरी देण्यात येते. त्याप्रमाणे आवश्यक ती सुधारणा करण्याकरिता प्रस्ताव शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : अ) प्राधिकरणाच्या निवासी गाळ्यांच्या हस्तांतरण फी व नियमितीकरण फी मध्ये वाढ करण्याबाबत.
ब) गाळ्यांच्या हस्तांतरण फी एवढीच फी भूखंडाच्या हस्तांतरणास लावणेबाबत व तशा प्रकारची तरतूद विनियमात करणेबाबत.
क) अनिवासी/व्यापारी गाळ्यांच्या व भूखंडाच्या हस्तांतरणास परवानगी देणे व हस्तांतरण फी आकारणे व तशा प्रकारची विनियमात तरतूद.
ड) म्हाडाच्या वसाहतीतील बहुमजली इमारती किंवा स्वतंत्र भूखंडावर बांधण्यात आलेल्या इमारतीचे अभिहस्तांतरण झाल्यावर इमारतीचे किंवा इमारतीतील गाळ्यांचे पुनर्विक्रीनंतर जमिनीचा भाडेपट्टा पुनर्खरेदीदाराच्या नावे करण्याबाबत.
इ) लाभार्थीस उपलब्ध असलेले जादा चटईक्षेत्र विकण्यास परवानगी देण्याबाबतची इतर प्रकरणे.

ठराव :

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : गाळ्यांचे मासिक भाडे/भाडे खरेदी हप्ते विहित मुदतीत न भरल्यास वसूल करावयाचा दंड (ठराव क्र. ४०३०, दि. २०.२.९३ रद्द करणेबाबत.)

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.** 5345

विषय : विनियम १६ अन्वये थेट पद्धतीने वितरित करण्यात येणाऱ्या भूखंडाचे किंमतीविषयक धोरणाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, म्हाडाच्या आर्थिक हिताचे दृष्टीने सहकारी गृहनिर्माण संस्था अथवा अन्य कोणालाही शासनाकडून नियम - १६ खाली भूखंडाचे वाटप करताना त्यांच्या किंमती प्रचलित बाजारभावाने आकारण्यात याव्यात. तसेच दिनांक ३०.७.९३, क्र. ४०९४ चा ठराव व त्या अनुषंगाने दिनांक १२.८.९३ चे परिपत्रक रद्द करण्यात यावे.

**Item No.** 10 **Resolution No.** 5346

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी, प्रतिनियुक्तीवरील अधिकारी यांना सेवानिवासस्थाने वाटप करण्याबाबतची सुधारित मार्गदर्शक तत्वे ठरविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी, प्रतिनियुक्तीवरील अधिकारी यांना सेवानिवासस्थाने वाटप करण्याबाबतची सुधारित मार्गदर्शक तत्वाची अंमलबजावणी करण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यात येत आहेत. याबाबतची अंमलबजावणी करतेवेळी जर काही अडचणी निर्माण झाल्या तर त्या अडचणींच्या अनुषंगाने त्यांनी उपाययोजना करावी व माहितीस्तव प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर कराव्यात.
मुंबई मंडळाच्या विविध वसाहतीत जे २७ रिक्त गाळे विखुरलेले आहेत त्यांचे वाटप प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थान म्हणून त्वरित करण्यात यावे. ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करावी.

---

**Item No.** 11 **Resolution No.** 5347

विषय : पुणे गृहनिर्माण मंडळाच्या परिसरातील जुने विश्रामगृह तोडून पी.डी.सी. (प्रोफेशनल डेव्हलपमेंट सेंटर) हॉस्टेल व प्रशिक्षण केंद्राकरिता इमारत बांधण्याचा सुधारित प्रश्शासकीय मान्यतेचा प्रस्ताव.

ठराव : एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतला.
१) प्रोफेशनल डेव्हलपमेंट सेंटर (पीडीसी) पुणेकरिता इमारत बांधण्याच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकीय रु. २,२३,१५,१३२/- च्या खर्चाकरिता मान्यता देण्यात येत आहे.
२) पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या प्रशासकीय इमारतीतील (गृहनिर्माण भवनातील) तळ व पोटमाळ्यामधील १५०० ते २००० चौ. फूटाची जागा नियमानुसार जाहिरातीद्वारे निविदा पद्धत अंमलात आणून बँकेला काऊंटर सुरू करण्यासाठी अथवा शासकीय व निमशासकीय संस्थेला भाड्याने (रेंटल) देण्यास मंजूरी देण्यात येते. सदरहू भाड्यातून प्राप्त होणाऱ्या रकमेचा विनियोग पीडीसी इमारतीच्या देखभालीचा खर्च भागविण्यासाठी करावा.

**Item No.** 12 **Resolution No.** 5348

विषय : औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अंतर्गत सिडको औरंगाबादस्थित मुर्तुंदवाडी व मूर्तिजापूर येथील जमिनीबाबत तसेच सिडकोशी संबंधित इतर मुद्यांबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अंतर्गत सिडको औरंगाबाद स्थित मुर्तुंदवाडी व मूर्तिजापूर येथील सिडकोने म्हाडास वाटप केलेल्या जमिनीच्या किंमतीबाबतचा वाद १९८६ पासून प्रलंबित होता. तसेच तीसगाव योजनेसाठी विकास शुल्कापोटी म्हाडाने सिडकोला भरलेल्या जादा रकमेबाबत म्हाडास आकारण्यात आलेल्या लीज प्रिमियमबाबत या व इतर अशा ६ मुद्द्यांवर अंतिम निर्णय घेणे यासाठी उपाध्यक्ष/प्रा. यांच्या विनंतीवरून व्यवस्थापकीय संचालक/सिडको यांच्याशी दिनांक ११.३.९८ रोजी सिडको कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आलेली होती. त्यास अनुसरून दोन्ही स्तरावर वाद मिटविण्यासाठी सिडकोने त्यांचे पत्र दिनांक २७.३.९८ द्वारे मा. उपाध्यक्ष/म्हाडा यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला होता. हा प्रस्ताव औरंगाबाद मंडळाच्या बैठकीत ठेवण्यात येऊन त्यास मंडळाने मान्यता देऊन त्याबाबतचा ठराव क्रमांक ६५१ प्राधिकरणास सादर केलेला होता. आता प्राधिकरण स्तरावर औरंगाबाद मंडळाने मान्य केलेल्या बाब टिप्पणी व ठरावाचा विचार करण्यात येऊन संदर्भित विषयी प्राधिकरणाच्या बाब टिप्पणीतील मुद्द्यांवर सर्वानुमते असे ठरविण्यात येत आहे की, म्हाडा व सिडको यांचेमध्ये प्रलंबित असलेल्या ६ मुद्द्यांवर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत.

१) मुकुंदवाडी व मूर्तिजापूर येथील १५.२८ हेक्टर जमिनीचा दर रु. ४० प्रति चौ. मी. असा मान्य करण्यात यावा. या दराप्रमाणे जमिनीची एकंदर किंमत रुपये ६१.१२ लक्ष अशी येते. यापैकी म्हाडाने सिडकोला पूर्वी दिलेली रक्कम रु. ५.२० लक्ष वजा करून उर्वरित रक्कम (रु. ६१.१२ - ५.२० लक्ष) बरोबर ५५.९२ लक्ष रुपये सिडकोला देय असलेल्या रकमेपोटी समायोजित करण्यात यावी.

२) तीसगाव येथील योजनेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार अभिन्यास मंजूरी व इमारत बांधकाम मंजूरीसाठी देय असलेली रक्कम म्हाडाने सिडकोस भरल्यानंतर जी जादा रक्कम रु. ८४.०२ लक्ष सिडकोकडे सध्या पडून आहे. ती रक्कम कोणतेही व्याज न आकारता म्हाडास सिडकोने देय असलेल्या रकमेपोटी समायोजित करण्यात यावी.

३) म्हाडाने बांधलेल्या इतर गृहनिर्माण योजनांसाठी अतिरिक्त लीज प्रिमियमची रक्कम सिडकोस भरणा करू नये. तसेच आतापर्यंत सिडकोकडे लीज प्रिमियमसाठी भरणा केलेली रक्कम रु. २.५७ लक्ष सिडकोकडे देय असणाऱ्या रकमेमध्ये समायोजित करण्यात यावी.

४) म्हाडा वाळुंज क्षेत्रासाठी 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणून कार्यरत असताना म्हाडाने केलेला खर्च रु. १५ लक्ष सिडकोने म्हाडास देय असलेल्या रकमेपोटी समायोजित करण्यात यावा.

५) औरंगाबाद मंडळाने मुर्तुंदवाडी येथे बांधलेल्या ८२ उच्च उत्पन्न गटाच्या गाळ्यांना सिडकोने दंड रक्कम आकारू नये.

६) सिडको म्हाडास दिलेल्या जमिनीच्या किंमतीवर विलंब आकार शुल्क तसेच व्याज लावणार नसल्यामुळे व दोन्ही संस्था शासकीय असल्यामुळे सिडकोने मंडळास परत केलेल्या रु. ६०.८१ लक्ष रकमेवर म्हाडाने दि. १६.९.९६ ते २१.४.९२ या

कालावधीसाठी व्याज आकारू नये.
तसेच सिडको व म्हाडा या दोन्ही संस्थांना देय असणाऱ्या रकमा या समायोजित करावयाचे ठरले असून प्रत्यक्षात दोन्ही संस्था एकमेकांस कोणतीही रक्कम अदा करणार नाहीत हे मान्य करून वरील सहा मुद्द्यांना मान्यता देण्यात येत आहे.
उपरोक्त ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाहीचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यात येत आहेत.

**Item No.** 13 **Resolution No.** 5349

विषय : मॉडर्न मिल, मातुल्य मिल व मुंबई गॅस कंपनी या शहरातील जमिनीवर मुंबई मंडळातर्फे योजना हाती घेणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मॉडर्न मिल, मातुल्य मिल व मुंबई गॅस कंपनी या जमिनीवर योजना हाती घेण्यासाठी खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १) इमारतीची उंची | : विकास नियंत्रण नियमाप्रमाणे सर्व अनुज्ञेय चटईक्षेत्रफळ निर्देशांक त्या त्या प्रकल्पांमध्ये पूर्णपणे वापरण्यात यावा व त्यासाठी आवश्यक तेवढी इमारतींची उंची ठरविण्यात यावी. इमारतींचे उंचीवर बंधन ठेवण्यात येऊ नये. |
| २) सदनिकांचे चटई क्षेत्रफळ | : अल्प उत्पन्न गटाच्या सदनिकांसाठी २०.९ चौ. मी. (२२५ चौ. फू.) व मध्यम उत्पन्न गटाच्या सदनिकांसाठी ३२.५० चौ. मी. ते ३७.१७ चौ. मी. (३५० चौ. फू. व ४०० चौ. फू.) या मर्यादेत असावे. |
| ३) बांधकामाचे सर्वसाधारण विनिर्देश | : अल्प उत्पन्न गटासाठी सर्वसाधारणपणे मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. हे बांधत असलेल्या सदनिकांना ठेवल्यानुसार व मध्यम उत्पन्न गटासाठी सर्वसाधारणपणे वास्तुशास्त्रज्ञ श्री. व्होरा यांनी मॉडर्न मिल जमिनीवरील योजनेसाठी सुचविल्यानुसार ठेवावे. |
| ४) सदनिका मिळण्यासाठी कोण अर्ज करू शकेल | : महाराष्ट्रात १५ वर्षे वास्तव्य व वय १८ वर्षांपेक्षा कमी नसावे. या अटी टाकण्यात याव्यात. |
| ५) विक्री किंमत निश्चित करणे | : या बाबीवर निर्णय प्रलंबित ठेवण्यात आला. |

**Item No.** 14 **Resolution No.**

विषय : मुंबई मंडळाच्या एस.आर.डी. परिसंडळांतर्गत कार्यान्वित असणाऱ्या योजनांविषयी मासिक प्रगती अहवाल.

ठराव :

---

**Item No.** 15 **Resolution No.** 5350

विषय : मुंबई मंडळाच्या मानखुर्द व सायन योजनांमध्ये खुल्या बाजारात विक्री करावयाच्या सदनिकांची विक्री किंमत निश्चित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने घेतलेल्या निर्णयास प्राधिकरणाने सहमती दर्शविली.

---

**Item No.** 16 . **Resolution No.** 5351

विषय : भूतपूर्व राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या गाळ्यांच्या हस्तांतरणाबाबतचे धोरण ठरविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार राजीव गांधी निवारा प्रकल्पाच्या मंडळाकडे वर्ग झालेल्या पुनर्रचित इमारतीतील सुरुवातीचे हस्तांतरण नियमित करण्यासाठी भाडेकरूंना सबसिडी म्हणून मिळालेली रक्कम रु. १२,९००/- अधिक रु. २०,०००/- (किंवा अधिक नियमाप्रमाणे) असे एकूण रु. ३२,९००/- आकारण्यात यावेत व त्यानंतरची हस्तांतरणे, सबसिडीची रक्कम सुरुवातीच्या हस्तांतरणाच्या वेळी भरलेली असल्यामुळे पुन्हा न आकारता मंडळाच्या नियमाप्रमाणे दंडात्मक रक्कम आकारून नियमित करण्यात यावी. या निर्णयास प्राधिकरणाने सहमती दर्शविली.

---

**Item No.** 17 **Resolution No.** 5352

विषय : मुंबई बेटावरील व उपनगरातील संक्रमण शिबिरांचा पुनर्विकास करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई बेटातील व उपनगरातील अस्तित्वात असलेल्या विविध संक्रमण शिबिरांपैकी पहिल्या टप्प्यात वांद्रे (प), कुलाबा, ओशिवरा, जोगेश्वरी (पूर्व), जयकोच या चार संक्रमण शिबिरांच्या पुनर्बांधणीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. या चार प्रकल्पांसाठी बाब टिप्पणीत सुचविलेल्या पर्याय क्र. २ नुसार खाजगी वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक करण्यास प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या व्यावसायिक शुल्क तसेच इतर नेहमीच्या करारनाम्यानुसार मान्यता देण्यात येत आहे. या ठरावाची कार्यवृत्त स्थायी करण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

---

**Item No.** 18 **Resolution No.** 5353

विषय : विद्युत पर्यवेक्षक या संवर्गातील कर्मचाऱ्यांना वाढीव वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विद्युत पर्यवेक्षक या पदनामाची वेतनश्रेणी दिनांक १.१.१९८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने फक्त वेतन निश्चितीसाठी रु. १४००-२३०० वरून रु. १६४०-२९०० अशी सुधारण्यात यावी. मात्र त्यांना वेतन व भत्त्यामधील फरक दिनांक १.१.१९९६ पासून अनुज्ञेय ठरविण्यात यावा. तसेच विद्युत पर्यवेक्षक या पदनामाचे नामाभिधान यापुढे कनिष्ठ अभियंता (विद्युत) असे बदलण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 19 **Resolution No.** 5354

विषय : कोकरी आगार, वडाळा व अन्य योजनांमध्ये उपलब्ध होणाऱ्या अनिवासी सदनिकांमध्ये अतिरिक्त क्षेत्रफळाच्या विक्रीसाठी दर ठरविण्यावर धोरणात्मक निर्णय घेणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शासन निर्णय क्र. झोपुयो-१०९७/४५१५/झोपसु-१, दिनांक १४.५.१९९८ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत दिनांक १.१.१९९५ पूर्वी वाणिज्य वापराखाली अस्तित्वात असलेले चटईक्षेत्र किंवा २२५ चौ. फू. यापेक्षा जे कमी असेल ते चटईक्षेत्र प्राधिकरणाच्या एसआरए योजनेत मोफत मिळण्यास झोपडपट्टीधारक पात्र असतील. यापेक्षा अतिरिक्त अनिवासी क्षेत्रफळासाठी खालील दर आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अधिकचे क्षेत्रफळ चौरस फूटात | अतिरिक्त अनिवासी क्षेत्रफळासाठी आकारावयाचा दर रु. चौ. फूट |
|---|---|
| १) पहिल्या २५ चौ. फूटांपर्यंत अतिरिक्त क्षेत्रफळासाठी | रु. १,८००/- |
| २) २५ चौ. फूटांपेक्षा जास्त परंतु ५० चौ. फूटांपर्यंत अतिरिक्त क्षेत्रफळासाठी | रु. २,२५०/- |
| ३) ५० चौ. फू.पेक्षा जास्त अतिरिक्त क्षेत्रफळासाठी | रु. २,७००/- |
| ४) फोटोपास वरील सध्याचे क्षेत्रफळ २२५ चौ. फू.पेक्षा जास्त असून अनिवासी वापराच्या झोपडपट्टीधारकास २२५ चौ. फू. चे दोन किंवा अधिक स्वतंत्र गाळे हवे असल्यास | रु. ४,५००/- |

वर नमूद केलेले दर हे वडाळा व मानखुर्द येथे सध्या सुरू असलेल्या योजनांसाठी लागू राहतील.

**Item No.** 20 **Resolution No.** 5355

विषय : शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाबाबत शासनाने घेतलेले महत्वपूर्ण निर्णय.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

शासन निर्णय क्र. एचएसजी-१०९८/प्र.क्र.४७-भाग-४/गृनिधी-१, दिनांक २५.९.१९९८ अन्वये पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) शिवशाही पुनर्वसन प्रकल्प ही पूर्णत: शासकीय कंपनी असेल. शासन निर्णय क्र. एचएसजी-१०९८/प्र.क्र.४७-भाग-४/गृनिधी-१, दिनांक २५/९/९८ प्रमाणे म्हाडाने रु. ३०० कोटी एवढी रक्कम दिनांक ३१.१२.१९९८ अगोदर शासनाकडे 'अनामत ठेव' म्हणून द्यावी. याअगोदर म्हाडाने ठराव क्र. ५३००, दिनांक ६.४.१९९८ अन्वये शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाला उपलब्ध करून दिलेले रु. ३० कोटी व्याजासहित परत घेण्यात यावेत.

२) म्हाडाच्या मालकीच्या जमिनीपैकी कोणत्याही आरक्षणाने बाधित नसलेले ११.५० हेक्टर जमीन शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाकडे त्वरित हस्तांतरित करण्याची परवानगी मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना देण्यात येते. जमीन हस्तांतरणाच्या अटी व शर्ती निश्चित करण्याबाबत शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त करण्यात यावे.

३) संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांनी विनंती केल्यानंतर म्हाडाच्या उर्वरित मोकळ्या जमिनीच्या आरक्षणात आवश्यक तो बदल करण्याकरिता शासनास प्रस्ताव सादर करण्याची मा. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना परवानगी देण्यात येते

४) शासनास रु. ३०० कोटी 'अनामत ठेव' म्हणून उपलब्ध करून दिल्यानंतर म्हाडाला दरवर्षी व्याजापोटी सुमारे रु. ३५ कोटींचे नुकसान होणार आहे. म्हणून रु. ३०० कोटी 'अनामत ठेव' या रकमेवर वार्षिक १२ टक्के व्याज देण्यात यावे, अशी विनंती महाराष्ट्र शासनास करण्यात यावी.

५) संपूर्ण महाराष्ट्र राज्यात गृहनिर्माण प्रकल्प राबविण्याची जबाबदारी म्हाडाची आहे. म्हणून रु. ३०० कोटी 'अनामत ठेव' म्हणून शासनास उपलब्ध झालेला निधी हा म्हाडाला जास्तीत जास्त ५ वर्षाच्या मुदतीत शासनाने परत करावा ही विनंती. जेणेकरून भविष्यातील गृहनिर्माण प्रकल्प योजनेवर विपरीत परिणाम होणार नाहीत.

६) ११.५० हेक्टर मोकळी जमीन गृहनिर्माण पुनर्वसन प्रकल्पाला हस्तांतरित केल्यानंतर म्हाडाकडे मुंबई शहरासाठी भविष्यात गृहनिर्माण प्रकल्प राबविण्याकरिता जमीन शिल्लक राहणार नाही. शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाला मोकळी जमीन हस्तांतरित केल्यानंतर शासनाने तेवढीच मोकळी जमीन म्हाडाला उपलब्ध करून द्यावी, अशी शासनास विनंती करण्यात यावी.

वरील ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्याची परवानगी मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना देण्यात येते.

**Item No.** 21 **Resolution No.**

विषय : शिवशाही पुनर्वसन प्रकल्पांतर्गत संचालक यांनी घेतलेल्या महत्वाच्या निर्णयाची माहिती प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करण्याबाबत.

ठराव :

**Item No. 22 Resolution No. 5356**

**विषय :** मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाला विशेष निधी उपलब्ध करून देण्याबाबत.

**ठराव :** एकमताने निर्णय घेतला की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळात मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्रचनेसाठी शासनाने योग्य त्या माध्यमातून रु. १०० कोटी चालू वर्षासाठी 'विशेष बाब' म्हणून विनाव्याज उपलब्ध करून द्यावेत असा प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठविण्यात यावा.

त्याचप्रमाणे सुखथनकर समितीच्या शिफारशी अनुसार खाजगी विकासकांना प्रोत्साहनपर वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक योजनेच्यासवलती म्हाडाला सुद्धा त्याच प्रमाणात उपलब्ध करून देण्यास शासनाला विनंती करण्यात यावी.

उपरोक्त चर्चेनंतर वरीलप्रमाणे विषयसूचीवरील आणि आयत्या वेळच्या विषयावर चर्चा झाल्यानंतर मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाल्याचे जाहीर केले.

**Meeting No.** 154 **Meeting Date** 09-Nov-1

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २९-९-१९९८ रोजी झालेल्या १५३ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ६.८.१९९८ रोजी झालेल्या १५२ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 5357

विषय : श्री. सी. डी. फकिर, तत्कालीन उपमुख्य अभियंता (दक्षता व गुणनियंत्रण) प्राधिकरण यांच्या दिनांक १९/२/१९९३ ते १९/७/१९९३ या कालावधीचे वेतन देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या आस्थापनेवर दिनांक २९/४/१९९३ ते १९/७/१९९३ या कालावधीसाठी उपमुख्य अभियंता या संवर्गात रु. ३७००-१२५-४७००-१५०-५००० या वेतनश्रेणीमध्ये उपमुख्य अभियंता हे पद अधिसंख्य (सुपर - न्युमररी) म्हणून निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. दि. २०.७.९३ म. पू. पासून हे अधिसंख्य पद आपोआप रद्द होईल.

**Item No.** 4 **Resolution No.** 5358

विषय : तत्कालीन जागतिक बँक प्रकल्प विभागात कार्यरत असलेले व आता पुनर्नेमणूक करण्यात आलेले एकत्रित वेतनावरील उपसमाज विकास अधिकारी यांना नियमित वेतनश्रेणी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विधी सल्लागार/प्रा. यांनी सुचविलेले अभिप्राय विचारात घेऊन प्राधिकरणाने दिनांक ३० मे, १९९८ च्या आदेशान्वये नेमणूक केलेल्या तत्कालीन जागतिक बँक प्रकल्पातील बारा उपसमाज विकास अधिकाऱ्यांना रु. १६४०-६०-द.रो.-७५-२९०० ही नियमित वेतनश्रेणी खालील अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
१) सदरहू वेतनश्रेणी ही उपसमाज विकास अधिकाऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या अपील क्र. ५०१ संदर्भात प्राधिकरणाच्या म्हणण्यास हक्कास कोणत्याही प्रकारे बाधा न आणता लागू करण्यात येत आहे.
२) वरील नियमित वेतनश्रेणी मंजूर केल्यामुळे उपसमाज विकास अधिकाऱ्यांना प्राधिकरणातील सेवा अखंड चालू असल्याचा दावा अथवा प्राधिकरणाच्या सेवेत सामावून घेण्याचा हक्क प्राप्त होत नाही.
३) या उपसमाज विकास अधिकाऱ्यांना प्राधिकरणातील नियमित अन्य कर्मचाऱ्यांना जेष्ठता सूचीवर तसेच अन्य संवर्गातील पदावर समकक्षता दाखवून हक्क प्रस्थापित करता येणार नाही. या उपसमाज विकास अधिकाऱ्यांना इतर लाभ वाढीव वेतनश्रेणीनुसार नियमाप्रमाणेच अनुज्ञेय राहतील.

---

**Item No.** 5 **Resolution No.** 5359

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे ५ व्या आयोगाच्या वेतन सुधारणेच्या संदर्भात देय होणाऱ्या थकबाकीच्या अनुषंगाने रु. २,५००/- एवढी आगाऊ रक्कम मंजूर करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतनमानाने प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना दि. १.१.१९९६ पासून लागू होतील, असे गृहित धरून त्या अनुषंगाने दिनांक १.१.९६ पासून अनुज्ञेय होणाऱ्या थकबाकीपोटी रु. २,५००/- एवढी आगाऊ रक्कम प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना त्यांचा दर्जा व गट विचारात न घेता शासन वित्त विभागाच्या दि. ९.१०.९८ क्र. पेपुर-१०९८/प्र.क्र.२७/९८/सेवा-१० मधील निर्णयाच्या तरतुदींच्या अधीन राहून मंजूर करण्याच्या मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांच्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

---

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : प्रबोधन गृहनिर्माण संस्था, दिंडोशी- मालाड (सं.नं. २३९/१) येथील ३० एकर जमीन वितरित करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 7 **Resolution No.** 5360

विषय : मुंबई इमारत दुरुस्ती मंडळाच्या अखत्यारीतील पुनर्रचित इमारतीमधील गाळे मालकी हक्काने देण्यासंबंधी म्हाडा अधिनियम १९७६ मधील शासनाने दुरुस्ती केलेल्या नियमांची अंमलबजावणी करताना उद्भवणाऱ्या अडचणींबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पुनर्रचित इमारतीमधील गाळेधारकांना मालकी तत्वावर गाळे हस्तांतरित करण्यासंबंधात येणाऱ्या अडचणींचा व त्या अनुषंगाने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने सुचविलेल्या शिफारशी विचारात घेऊन खालीलप्रमाणे एकमताने निर्णय घेतला की,

१) म्हाडा अधिनियम कलम १०३ (इ) अन्वये जर एखाद्या इमारतीमधील ३० टक्के गाळेधारक सहकारी संस्था स्थापन करण्यास पुढे आले नाहीत तर असे गाळेधारक त्या सहकारी संस्थेचे भाडेकरू म्हणून राहतील व सहकारी संस्थेस त्यांच्याकडून उचित भाडे वसूल करण्याचा अधिकार राहील. या धर्तीवर मंडळाच्या पुनर्रचित इमारतीतील गाळे मालकी हक्काने हस्तांतरित करण्याच्या योजनेत जे ३० टक्के भाडेकरू सहभागी होत नाहीत अशांसाठी म्हाडा अधिनियम कलम ९४ मध्ये तडकाफडकी निष्कासन कार्यवाही ऐवजी म्हाडा अधिनियम कलम १०३ (ई) प्रमाणे तरतूद करण्यात यावी.

२) उपकरप्राप्त इमारतीच्या पुनर्विकासासाठी ना-हरकत प्रमाणपत्र धारकाने स्थापन केलेल्या सहकारी संस्थेत जे ३० टक्के भाडेकरू सहभागी होणार नाहीत अशा भाडेकरूंवर तडकाफडकी निष्कासनाची कार्यवाही करण्याऐवजी म्हाडा अधिनियम कलम १०३ (इ) च्या धर्तीवर म्हाडा अधिनियम कलम ९५ (अ) मध्ये तरतूद करण्यात यावी.

३) इमारतीच्या मालमत्ता कर भरण्यासंबंधी शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास ज्याप्रमाणे प्रचलित मालमत्ता कराच्या २० टक्के करापर्यंत सवलत देण्यात आली आहे, ती सवलत पुनर्रचित इमारतीमधील सहकारी गृहनिर्माण संस्थांना देण्यात यावी. थोडक्यात टेलिस्कोपीक पद्धतीने मालमत्ता कर आकारण्याचा पद्धतीचा अवलंब करावा.

४) पुनर्रचित इमारतीमधील सदनिका त्यातील गाळेधारकांना विनामूल्य वितरित करण्यात येत असल्यामुळे अत्यंत नाममात्र मुद्रांक शुल्क ठरवावे लागेल. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची ज्याप्रमाणे शासनाने प्रत्येक दस्तऐवजावर रु. १००/- म्हणजे एवढे मुद्रांक शुल्क भरण्याचा निर्णय घेतला आहे तीच सवलत पुनर्रचित इमारतीमधील गाळेधारकांना मिळावी.

५) बहुतेक पुनर्रचित इमारतीमधील गाळ्यांची संख्या १०० किंवा अधिक असल्यामुळे अशा इमारतींचे व्यवस्थापन करण्यात सहकारी गृहनिर्माण संस्थांना अडचणी येत असतात. त्यामुळे अशा प्रकारे मोठ्या इमारतीमध्ये विंगप्रमाणे सहकारी संस्था स्थापन करण्याची गाळेधारकांची इच्छा असल्यास सहकारी संस्था स्थापन करण्यास परवानगी देण्यात यावी व सामायिक सेवेची दुरुस्ती व देखभालीसाठी इमारतीमधील संस्थेचे संघटना स्थापन करावी.

या ठरावाची स्थायीकरणाची वाट न पाहता मा. उपाध्यक्ष/प्रा. यांनी महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडे वरील १ ते ५ मधील शिफारसी कराव्यात.

**Item No.** 8 **Resolution No.** 5361

विषय : 'आदर्श नगर सेवा समिती' या संस्थेस आदर्श नगर, वरळी येथे त्यांचे शाळेलगत शाळेसाठी असलेला भूखंड मुंबई मंडळाची शिफारस लक्षात घेऊन वाटप करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई मंडळाच्या ११७ त्या बैठकीतील ठराव क्र. २०३२ अन्वये मुंबई मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार आणि अटी व शर्तीनुसार आदर्श नगर या वसाहतीमधील १५५३ चौ. मी. क्षेत्रफळाचा प्राथमिक शाळेसाठी आरक्षित असलेला भूखंड व त्या लगतचा ३३४.४४ क्षेत्रफळाचा विकास आराखड्यामध्ये खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेला भूखंड प्राधिकरणाच्या किंमती विषयक प्रचलित धोरणानुसार आदर्श नगर सेवा समिती, वरळी या संस्थेस प्राधिकरणाच्या प्रचलित भूखंडाच्या वितरणाच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 9 **Resolution No.** 5362

विषय : १) एच.डी.एफ.सी. (हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कार्पोरेशन लि.) व
२) यु.टी.आय. (युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया) तसेच
३) एस.एस.एफ.सी. (महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ) यांना त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या सेवानिवासस्थानासाठी एकरकमी खरेदी तत्वावर वितरित करण्यात आलेले गाळे तेथे राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना मालकी तत्वावर हस्तांतरित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
एच.डी.एफ.सी./यु.टी.आय./एम.एस.एफ.सी. व अन्य संस्थांना त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या सेवानिवासस्थानासाठी एकरकमी खरेदी तत्वावर वितरित करण्यात आलेले गाळे तेथे राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना पुढील अटींवर मालकी तत्वावर हस्तांतरित करण्यात यावेत, असा निर्णय घेण्यात आला.
१) गाळेधारकाचे महाराष्ट्रामध्ये सलग १५ वर्षे वास्तव्य असावे.
२) गाळेधारक पती/पत्नीच्या नावे महानगरपालिका हद्दीमध्ये दुसरा गाळा नसावा.
३) हस्तांतरित केलेल्या गाळ्याची विक्री करता येणार नाही. सदर गाळा फक्त कायदेशीर वारसांच्या नावे हस्तांतरित करता येईल.
४) गाळा हस्तांतरणासाठी रु. ५,०००/- प्रशासकीय शुल्क आकारण्यात यावे.

तसेच म्हाडाच्या ज्या कर्मचाऱ्यांकडे एकही मालकी हक्काचे घर नाही, अशा कर्मचाऱ्यांना त्यांच्या संपूर्ण सेवाकाळात एक मालकी हक्काचे घर मिळेल, अशा स्वरुपाची बाब टिप्पणी प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करावी.

---

**Item No.** 10 **Resolution No.** 5363

विषय : मुंबई मंडळाचे विखुरलेले गाळे सेवानिवासस्थान म्हणून वाटपाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) सध्या मंडळाकडे उपलब्ध असलेली २७ सेवानिवासस्थाने प्रतिक्षा यादीमधील ज्येष्ठतेनुसार कर्मचाऱ्यांना त्वरित वितरित करण्यात यावेत.
२) उर्वरित गाळ्यांच्या वितरणासंदर्भात शासनाकडून दि. २४/८/९७ च्या पत्रान्वये कळविलेल्या यादीमधील अर्जदारांची पात्रता निश्चित करून गाळे वाटप करण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 11 **Resolution No.** 5364

विषय : शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लि. साठी म्हाडाने शासनाकडे जमा करावयाची रु. ३०० कोटींची अनामत ठेव.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लिमिटेड करिता म्हाडा शासनाकडे रु. ३०० कोटी अनामत ठेव म्हणून खालीलप्रमाणे जमा करावेत.

| | |
|---|---|
| ऑक्टोबर १९९८ | रु. २० कोटी |
| नोव्हेंबर १९९८ | रु. १४५ कोटी |
| डिसेंबर १९९८ | रु. १३५ कोटी |
| | रु. ३०० कोटी |

२) या अनामत ठेवीवर शासनाने म्हाडाला द.सा.द.शे. १२ टक्के दराने व्याज घ्यावे, अशी विनंती शासनास करावी.
३) ही रक्कम शासनाने व्याजासहित अधिकाधिक ५ वर्षांत पूर्णपणे म्हाडाला परत करावी, अशी विनंती शासनास करावी.
४) शिवशाही पुनर्वसन प्रकल्पास म्हाडाने दिलेली रु. ३० कोटी कर्जाऊ रक्कम १२ टक्के व्याज दराने प्रकल्पाने म्हाडाला त्वरित परत करावी, अशी विनंती शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कंपनीस करावी.
५) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडून घेणात येणाऱ्या ११.५० हेक्टर आरक्षण विरहीत जमिनीच्या बदल्यात शासनाने तेवढीच पर्यायी जमीन म्हाडास द्यावी, अशी विनंती शासनास करावी.

**Item No.** 12 **Resolution No.** 5365

विषय : मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन कार्यक्रम पूर्वअर्हता प्राप्ता कंत्राटदार व प्रकल्प व्यवस्थापन, समंत्रक नेमणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पूर्व अर्हताप्राप्त कंत्राटदार व प्रकल्प व्यवस्थापन समंत्रक यांच्या समितीने अंतिम केलेल्या बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या यादीस मान्यता देण्यात आली.
ज्या कामावर प्रकल्प व्यवस्थापन, समंत्रक नेमण्यात येतील त्या कामात म्हाडाच्या अभियंत्यांची कामे व जबाबदाऱ्या काय असतील याचा अभ्यास करून शिफारसी करण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती नेमण्यात यावी व समितीचा अहवाल निर्णयासाठी प्राधिकरणाच्या बैठकीपुढे सादर करण्यात यावा.

---

**Item No.** 13 **Resolution No.** 5366

विषय : मुंबई मंडळाच्या एस.आर.डी. परिमंडळांतर्ग कार्यान्वित असणाऱ्या योजनांविषयी मासिक प्रगती अहवाल.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई मंडळाच्या एस.आर.डी. परिमंडळांतर्गत कार्यान्वित असणाऱ्या योजनांविषयी सादर करण्यात आलेल्या प्रगती अहवालाची नोंद घेण्यात आली.
तसेच मातुल्य मिल, मॉडर्न मिल, मुंबई गॅस येथील गृहनिर्माण योजना कार्यान्वित करण्यास एकमताने मंजूरी देण्यात आली.

---

**Item No.** 14 **Resolution No.** 5367

विषय : शिवशाही पुनर्वसन प्रकल्पास भूखंड वर्ग करण्याबाबत विनंती.

ठराव : बाब क्रमांक १५४/१४ व संचालक/शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांनी दिनांक २०.१०.९८ व दिनांक २.११.९८ रोजीच्या पत्रान्वये उपाध्यक्ष/प्रा. यांना केलेल्या विनंतीवर सविस्तर चर्चा होऊन एकमताने खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

१) शासन निर्णय क्रमांक - विसआ-१०९७/प्र.क्र.१२१ (९७)/प्रशासन-३, दिनांक २८ मे १९९८ अनुसार राजीव गांधी निवारा प्रकल्प बंद झाला व त्या प्रकल्पाची दायित्वे व मत्ता तसेच चालू प्रकल्प म्हाडाकडे आपोआपच हस्तांतरित झाले. वरील शासन निर्णयानुसार राजीव गांधी निवारा प्रकल्पाकडे असलेली जमीन शिवशाही पुनर्वसन प्रकल्पास गरज असल्यास प्राधिकरणाकडे विनंती करणे आवश्यक राहील.

२) सी.एस. क्रमांक ३४३, धारावी येथील ६२०७.२९ चौ. मी., ४२६८.२१ चौ. मी. व ३४६५.१३ चौ. मी. असे एकूण १३,९४०.६३ चौ. मी. क्षेत्रफळाचे ३ भूखंडाच्या विकासाची कामे तत्कालीन राजीव गांधी निवारा प्रकल्पाने प्रस्तावित केली होती. आता ही विकासकाची कामे करण्यास संचालक/शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांना परवानगी देण्यात येत आहे. त्यानुसार हे तीन भूखंड शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाकडे हस्तांतरित करण्यात यावेत.

३) सी.एस. क्रमांक ५०१ धारावी येथे सुमारे ५,५०० चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड विकास आराखड्यानुसार खेळण्याच्या मैदानासाठी आरक्षित आहेत. या जमिनीवर तात्पुरती संक्रमण शिबिरे (स्ट्रक्चर्स ऑफ टेंपररी नेचर) बांधण्यास संचालक/शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे.

४) सी. एस. क्रमांक ३१५ (भाग) धारावी येथील अंदाजे १४४४.६४ चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड राजीव गांधी निवारा प्रकल्पाच्या अभिन्यासामध्ये खुली जागा म्हणून आरक्षित आहे. या जागेत तात्पुरत्या संक्रमण शिबिराचे (स्ट्रक्चर्स ऑफ टेंपररी नेचर) बांधकामम करण्यास संचालक/शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे.

५) सी. एस. क्रमांक १०१ (भाग) येथे ९६३.९७ चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड राजीव गांधी निवारा प्रकल्पाच्या अभिन्यासामध्ये खुली जागा म्हणून आरक्षित आहेत. या जमिनीवर तात्पुरती संक्रमण शिबिरे (स्ट्रक्चर्स ऑफ टेंपररी नेचर) बांधण्यास संचालक/शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे.

६) सर्व्हे क्रमांक १५७, कांदिवली या जमिनीबाबत मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी सविस्तर टिप्पणी प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये विचारार्थ सादर करावी.

७) सर्व्हे क्रमांक ३८६, मुलुंडया जमिनीबाबत मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी सविस्तर टिप्पणी प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये विचारार्थ सादर करावी.

८) तात्पुरत्या संक्रमण शिबिरांसाठी शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाला म्हाडाच्या उपलब्ध करून देण्यात आलेल्या जमिनी उद्देशपूर्तीनंतर कालांतराने म्हाडाकडे परत करण्यात याव्यात.

९) न्यायप्रविष्ट प्रकरणाबाबत (संवेदनक्षम व गोपनीय कागदपत्रे व प्रकरणे वगळून) व आरक्षणामुळे बाधित असलेल्या जमिनीबाबत आवश्यक ती माहिती आणि कागदपत्रे संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांनी विनंती केल्यास उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१०) वरील अनुक्रमांक २, ३, ४ व ५ मधील जमिनीच्या वापरासाठी अटी व शर्ती शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेनंतर स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

११) स्थायीकरणाची वाट न पाहता या ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| **Item No.** | **15** | **Resolution No.** | **5368** |
|---|---|---|---|

विषय : म्हाडाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त १९९९ सालची दिनदर्शिका तयार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
म्हाडाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त गृहनिर्माण भवनामध्ये स्थापन केलेल्या शिवप्रतिमेचे मुख्य पृष्ठावर छायाचित्र असलेल्या व शिवछत्रपतींच्या जीवनातील महत्वाच्या प्रसंगांची छायाचित्रे असलेली १९९९ सालची १२ पानांची दिनदर्शिका (मराठी कॅलेंडर) (५,००० प्रती) प्रकाशित करण्यास मान्यता देण्यात आली. या दिनदर्शिका प्रकाशनासाठी येणाऱ्या सुमारें अंदाजे रुपये १२ लाख खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहें.

| **Item No.** | **16** | **Resolution No.** | **5369** |
|---|---|---|---|

विषय : मा. उच्च न्यायालयात म्हाडा आणि शासन यांच्या विरुद्ध जनहितार्थ दाखल करण्यात आलेल्या याचिका.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शासकीय वकील, मुंबई उच्च न्यायालय यांनी त्यांच्या दिनांक १५.१०.१९९८ च्या पत्रात नमूद केलेल्या तसेच मा. उच्च न्यायालयाने उपस्थित केलेल्या मुद्द्यांचे अवलोकन करून नोंद घेण्यात आली.
त्याचप्रमाणे बाब टिप्पणीसोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्र क्रमांक २ मधील मा. उच्च न्यायालयाने उपस्थित केलेल्या मुद्द्यांसंबंधी अवलोकन करून तयार केलेल्या प्रारुप उत्तराची नोंद घेण्यात आली. यासंबंधी केलेल्या सूचनांचा विचार करून त्यास शासनाची मान्यता घेऊन शासकीय वकीलांच्या सल्ल्यानुसार प्रतिज्ञापत्र अंतिम करून उच्च न्यायालयात दाखल करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.
ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यात यावी.

| **Item No.** | **17** | **Resolution No.** | **5370** |
|---|---|---|---|

विषय : केंद्र शासनाने निर्देशित केलेल्या ७७,४२० गाळ्यांच्या योजनेसाठी मागविण्यात येणाऱ्या निविदांचा कालावधी ४५ दिवसांऐवजी ३० दिवस करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषयात नमूद केलेल्या योजनेची अंमलबजावणी शीघ्र गतीने करण्यासाठी व केंद्र शासनाने दिलेले उद्दिष्ट गाठण्यासाठी निविदा मागविण्याचा कालावधी ४५ दिवसांऐवजी ३० दिवस करण्याच्या प्रस्तावास प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.
सदर कालावधी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिवसापासून ते निविदा पत्रे विकण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत ३० दिवसांचा मोजण्यात यावा. निविदेस वर्तमानपत्रातून भरपूर प्रसिद्धी देण्यात यावी.

| **Item No.** | **18** | **Resolution No.** | **5371** |
|---|---|---|---|

विषय : २९१-बी, आगबोटवाला चाळ, द. ला. मार्ग, चिंचपोकळी, मुंबई १२ या इमारतीतील गाळ्यांच्या वितरणाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पुनर्रचित आगबोटवाला चाळीचा प्रश्न सोडविण्यासाठी प्राधिकरणाचे सर्व अधिकार मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, मा. सभापती/मुंबई मंडळ, मा. सभापती/मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ व मुख्य अधिकारी/मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ या समितीला प्रदान करण्यात येत आहेत.
या समितीच्या मार्गदर्शनासाठी मुख्य अधिकारी/मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी सविस्तर टिप्पणी सादर करावी. या सविस्तर टिप्पणीच्या आधारावर या समितीने सर्व बाजूंचा सखोल अभ्यास व विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा व पुढील प्राधिकरणाच्या बैठकीत माहितीस्तव सादर करावा.

| **Item No.** | **19** | **Resolution No.** | **5372** |
|---|---|---|---|

विषय : मानखुर्द-सायन-वडाळा व मालवणी येथील दैनंदिन देखरेखीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) मानखुर्द व सायन येथील दैनंदिन पर्यवेक्षणाचे काम प्रशासनाने प्रथमपासून वास्तुशास्त्रज्ञ सल्लागारांकडून करवून घेतले असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे व यापुढेही हे दैनंदिन पर्यवेक्षण वास्तुशास्त्रज्ञ सल्लागारांकडून सुरू ठेवण्यास मंजूरी देण्यात येत आहे.
मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी यांनी दिलेल्या वडाळा येथील टप्पा-२ च्या कामासाठी स्वतंत्र बांधकाम व्यवस्थापन सल्लागारांची नियुक्ती करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

| **Item No.** | **20** | **Resolution No.** | **5373** |
|---|---|---|---|

विषय : पवई गृहनिर्माण प्रकल्पातील मंडळाच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पवई गृहनिर्माण प्रकल्पातील मंडळाच्या जमिनीवरील अधिकृत ३८ झोपडपट्टीवासियांचे मुंबई मंडळाच्या प्रस्तावाप्रमाणे पुनर्वसन करण्यास मान्यता देण्यात येते.
या ३८ अधिकृत झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन केल्यानंतर जी जागा मोकळी होईल त्या जागेवर कोणत्या प्रकारचा प्रकल्प हाती घेण्यात यावा, याबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात यावा.

**Item No.** 21 **Resolution No.** 5374

विषय : अभियांत्रिकी सेवेतील अधिकाऱ्यांना वैयक्तिक प्रशस्तीपत्र देण्याची योजना.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अभियांत्रिकी सेवेतील अधिकाऱ्यांना वैयक्तिक प्रशस्तीपत्रे देण्याची योजना अंमलात आणण्यासाठी व शिफारसी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

१) मुख्य अभियंता - १/प्रा. अध्यक्ष
२) मुख्य अभियंता - २/प्रा. उपाध्यक्ष
३) वित्त नियंत्रक/प्रा. सदस्य
४) उपमुख्य अभियंता (द. व गु.) सदस्य
(दक्षता व गुण नियंत्रक)
५) सचिव/प्राधिकरण सदस्य
६) कार्यकारी अभियंता (सं व प्र.) सदस्य सचिव

सदर समितीने शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेऊन शिफारसी करण्यात याव्यात.

---

**Item No.** 22 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणातील सेवानिवृत्त किंवा मृत कर्मचाऱ्यांना वितरित केलेली सेवानिवासस्थाने सेवानिवृत्त कर्मचारी किंवा मृत कर्मचाऱ्यांना वारसांना मालकी हक्काने किंवा भाडेतत्वाने कायम स्वरुपी विक्री करण्याबाबत.

ठराव :

**Meeting No.** 155 **Meeting Date** 14-Dec-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ९-११-१९९८ रोजी झालेल्या १५४ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २९/९/१९९८ रोजी झालेल्या १५३ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 5375

विषय : प्राधिकरणाचे कर्मचारी/अधिकारी यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती वाढवून देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या रकमेत प्रतिवर्षी रु. २,४००/- वरून वाढ करून रु. ३,५००/- एवढी रक्कम सन १९९९-२००० या वित्तीय वर्षापासून म्हणजे दिनांक १/४/१९९९ पासून मंजूरी देण्यात येत आहे. सदरहू वैद्यकीय प्रतिपूर्ती वाढविण्याबाबत एक वर्षानंतर पुनर्विचार केला जाईल.

**Item No.** 4 **Resolution No.** 5376

विषय : दादाभाई नौरोजी नगर, अंधेरी (प) येथील बिल्डींग नं. ८ च्या शेजारी २० बाय २० फूट क्षेत्रफळाचा भूखंड विद्युत उपकेंद्रासाठी मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बी. एस. ई. एस. या संस्थेस लोकोपयोगी प्रयोजनासाठी (वीज वितरण) अंधेरी येथील डी. एन. नगर वसाहतीमधील इमारत क्रमांक ८ च्या बाजूचा भूखंड वितरण करणेबाबत मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने घेतलेला निर्णय व याबाबत प्राधिकरणाच्या खाते प्रमुखांनी आपल्या अभिप्रायात दर्शविलेली सहमती लक्षात घेऊन सदरहू भूखंडाचे वितरण म्हाडा अधिनियम १९८२ (जमिनीचे वाटप) मधील विनियम-८ड अनुसार प्राधिकरणाच्या प्रचलित अटी व शर्तीनुसार देण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

**Item No. 5 Resolution No. 5377**

विषय : अ) प्राधिकरणाच्या निवासी गाळ्यांच्या हस्तांतरण फी व नियमितीकरण फी मध्ये वाढ करण्याबाबत.
ब) गाळ्यांच्या हस्तांतरण फी एवढीच फी भूखंडाच्या हस्तांतरणास लावणेबाबत व तशा प्रकारची तरतूद विनियमात करणेबाबत.
क) अनिवासी/व्यापारी गाळ्यांच्या व भूखंडांच्या हस्तांतरणास परवानगी देणे व हस्तांतरण फी आकारणे व तशा प्रकारची विनियमात तरतूद.
ड) म्हाडाच्या वसाहतीतील बहुमजली इमारती किंवा स्वतंत्र भूखंडावर बांधण्यात आलेल्या इमारतींचे किंवा इमारतीतील गाळ्यांचे पुनर्विक्रीनंतर जमिनीचा भाडेपट्टा पुनर्खरेदीदाराच्या नावे करण्याबाबत.
इ) लाभार्थीस उपलब्ध असलेले जादा चटईक्षेत्र विकण्यास परवानगी देण्याबाबतची इतर प्रकरणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) बाब टिप्पणीसोबतच्या तक्ता 'अ' मध्ये मुंबई मंडळासाठी आणि तक्ता 'ब' मध्ये मुंबई बाहेरील विभागीय मंडळांसाठी गाळ्यांचे हस्तांतरण व नियमितीकरण यासाठी सुचविलेले सुधारित दर आकारण्यात यावेत.
२) तक्ता 'क' मध्ये दर्शविलेले मुंबई मंडळासाठी व तक्ता 'ड' मध्ये मुंबई बाहेरील विभागीय मंडळामधील भूखंडाच्या हस्तांतरण व नियमितीकरण करण्यासाठी सुचविण्यात आलेले दर आकारण्यात यावेत.
३) विकसित भूखंड व अनिवासी गाळे/भूखंड यांच्या हस्तांतरणाची तरतूद विनियमात नसल्यामुळे निवासी गाळ्यांकरिता हस्तांतरणाची तरतूद (विनियम २४/२५) जशीच्या तशी लागू करण्याबाबत प्रस्ताव शासनाला पाठविण्यात यावा. शासनाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करावी.
४) तक्ता 'इ' मध्ये मुंबई मंडळासाठी व तक्ता 'फ' मध्ये मुंबईबाहेरील मंडळातील अनिवासी गाळे/भूखंड यांचे हस्तांतरण व नियमितीकरण करण्यासाठी सुचविलेले दर आकारण्यात यावेत.
५) बाब टिप्पणीतील बाब 'ड' मधील म्हाडाच्या वसाहतीतील बहुमजली इमारती किंवा स्वतंत्र भूखंडावर बांधण्यात आलेल्या इमारतीचे अभिहस्तांतरण झाल्यावर इमारतीचे किंवा इमारतीतील गाळ्यांचो पुनर्विक्रीनंतर जमिनीचा भाडेपट्टा पुनर्खरेदीदाराच्या नावे करण्याबाबत खालील दर्शविलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे प्राधिकरणाची मान्यता देण्यात येते.

अ) प्राधिकरणाच्या दि. ४/५/१९८७ नोटीफिकेशनने एमएच/एलआरजी/१०८५/२६८७२/इएस-९ अन्वये फॉर्म 'ड' रद्द केला असल्यामुळे ही तरतूद नव्याने करणे आवश्यक आहे व अशा प्रकारचे अधिकार म्हणजे 'चेंज इन स्टेटस ऑफ लेजी' विभागीय मंडळाच्या मुख्याधिकाऱ्यांना देण्यात येत आहेत.

ब) अशा प्रकरणांना बहुसंख्य प्रकरणी इमारतीची सर्व किंमतही वसूल झालेली असते हे लक्षात घेता भाडेपट्टा करारपत्रातील नामांतरण हे केवळ नाममात्र शिल्लक राहते हे लक्षात घेऊन अशा प्रकारच्या बदलाकरिता प्रशासकीय खर्च म्हणून नाममात्र

फी आकारणे जरुरीचे आहे. हे लक्षात घेऊन निवासी गाळे/भूखंडाकरिता रु. ५००/- व अनिवासी गाळे/भूखंडाकरिता रु. १०००/- आकरावेत.

६) बाब टिप्पणीतील बाब 'ड' मधील लाभार्थीस उपलब्ध असलेले जादा चटईक्षेत्र विकण्याच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता आहे. विभागीय मंडळाच्या गृहनिर्माण योजनेअंतर्गत विकास नियंत्रण नियमावलीनुसार जादा चटईक्षेत्र उपलब्ध होते व अशा चटईक्षेत्राचा वापर करून निर्माण होणारे गाळे (निवासी व अनिवासी) इतरांना विकण्याची परवानगी मागण्यात येते. अशी प्रकरणे खालील प्रकारात मोडतात.

अ) निवासी वापरासाठी वितरित केलेले भूखंड

ब) गृहनिर्माण सहकारी संस्थांना वितरित केलेले भूखंड

क) बैठ्या स्वरुपाच्या गाळ्यांच्या योजनेत उपलब्ध असलेले चटईक्षेत्र.

ड) कार्यालयीन इमारती व उपलब्ध असलेले चटईक्षेत्र.

सर्व प्रकरणांमध्ये लाभार्थीमार्फत अतिरिक्त चटईक्षेत्राचा वापर करून असे निर्माण होणारे गाळे इतरांना विकण्याची विनंती करण्यात येते. या सर्व प्रकरणांमध्ये भूखंड हस्तांतरणाची फी मुंबईकरिता तक्ता 'क' प्रमाणे व मुंबई सोडून इतर मंडळांसाठी तक्ता 'ड' प्रमाणे फी आकारण्यात यावी.

ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यात यावी.

**Item No.** 6 **Resolution No.** 5378

विषय : गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत अंशतः रिक्त इमारतींसाठी संरक्षण व पहारा पुरविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) महाप्रकल्पातील अंशतः रिक्त इमारतींसाठीच्या संरक्षण व पहारा व्यवस्थेसाठीच्या प्रत्येक चौकीदाराला ८ तासांसाठी बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे रु. १,५००/- प्रतिमास या दराने प्रदान करण्यात यावे.

२) वरील रु. १,५००/- प्रतिमास हा ८ तासांसाठीचा दर तळमजला अधिक दोन व वरीलच्या (बहुमजली) - ४ बहुमजली इमारतीच्या गटासाठी देय राहील व या गटासाठी प्रति पाळी २ चौकीदार अनुज्ञेय राहतील. तसेच बैठ्या/एकमजली इमारतींच्या १० इमारतींच्या गटासाठी वरीलप्रमाणे रु. १,५००/- ८ तासांसाठी/प्रतिमास ही रक्कम देय राहील.

३) सदर दर दिनांक १.१२.१९९८ पासून लागू करण्यात येईल. सुधारित दरासंबंधीची तरतूद भविष्यातील सर्व निविदांमध्ये करण्यात येईल. या पूर्वीच्या ज्या निविदांमध्ये सुरक्षा व पहाऱ्यासाठी रु. ७५०/- प्रतिमास/प्रतिपाळी/प्रति चौकीदार असा दर नमूद केला असेल त्या निविदांसाठी नवीन दर लागू होणार नाही.

तसेच पवई व ओशिवरा येथील रिक्त सदनिकांच्या व दुकानी गाळ्यांच्या विक्रीबाबत वरीलप्रमाणे झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने प्राधिकरणाने असा निर्णय घेतला की,

एक) पवई-ओशिवरा या महाप्रकल्प योजनेतील उर्वरित रिक्त दुकानी गाळे विक्री करण्याचे अधिकार व जबाबदारी मुख्याधिकारी, मुंबई मंडळ यांना देण्यात येत आहे. यात जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त झालेली 'उच्चतम निविदा' या धर्तीवर मुख्याधिकारी, मुंबई मंडळ यांनी 'प्रथम येणाऱ्यास प्रथम दुकानी गाळा' या धोरणाप्रमाणे मागासवर्गीय आरक्षित गटातील दुकाने वगळून नियमानुसार कार्यवाही करावी.

दोन) पवई-ओशिवरा येथील निवासी सदनिका केंद्र शासन/केंद्र शासनाचे उपक्रम यांना जास्तीत जास्त सदनिका विक्री करण्याची मोहीम उपाध्यक्ष/प्रा. यांनी हाती घ्यावी. या सदनिकांची विक्री मोठ्या प्रमाणात (बल्क) व एकरकमी खरेदी तत्वावर करण्यात येणार असल्यामुळे केंद्र शासन/केंद्र शासनाचे उपक्रम व राज्य शासन/राज्य शासनाचे उपक्रम यांना सुधारित विक्री किंमतीपेक्षा १० टक्केपर्यंत सूट देण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत. त्यापेक्षा अधिक सूट देण्याची गरज पडल्यास उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी प्राधिकरणाची मान्यता घ्यावी.

**Item No.** 7 **Resolution No.** 5379

विषय : १) मॉडर्न मिल, मातुल्य मिल व मुंबई गॅस कंपनीच्या जमिनीवरील योजनांमध्ये कंत्राटात सुसज्जता अग्रीम (मोबिलायझेशन ॲडव्हान्स) अदा करणेबाबत.
२) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २३/२/९६ च्या शासन निर्णयानुसार म्हाडामधील कामांना सुसज्जता अग्रिम मंजूर करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मॉडर्न मिल, मातुल्य मिल व मुंबई गॅस कंपनीच्या जमिनीवर बांधण्यात येणार असलेल्या सदनिकांसाठीच्या कंत्राटामध्ये कंत्राट रकमेच्या ५ टक्के रक्कम १५ टक्के व्याजाने सुसज्जता अग्रिम (मोबिलायझेशन ॲडव्हान्स) म्हणून कंत्राटदारांना देण्यास मान्यता देण्यात येत आहे. वरीलप्रमाणे सुसज्जता अग्रिम देण्यात येणार असल्यामुळे कंत्राटदारांना बोलीपूर्व बैठकीच्या इतिवृत्तांतात कळविलेल्या प्रशासनाचे कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.
तसेच यापुढेही रु. १०० लाखांपेक्षा जास्त रकमेच्या कंत्राटामध्ये सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दिनांक २३/२/१९९६ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार कंत्राटदाराला सुसज्जता अग्रिम देय राहील, अशी तरतूद निविदांमध्ये करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 8 **Resolution No.** 5380

विषय : मॉडर्न मिल, मातुल्य मिल व मुंबई गॅस कंपनी या जमिनीवर हाती घेतल्या जाणाऱ्या योजनांमधील सदनिकांची विक्री किंमत निश्चित करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, याबाबतीत प्राधिकरणाचा ठराव क्रमांक ५३६६, दिनांक ९/११/१९९८ अन्वये मुख्याधिकारी, मुंबई मंडळ यांनी मागणी न आजमाविता पुढील कार्यवाही करावी.
सदरहू सदनिकांच्या किंमती ठरविण्याबाबत असा निर्णय घेण्यात आला की, याबाबतीत ज्या स्पर्धात्मक निविदा मागविण्यात आल्या आहेत, त्या उघडल्यानंतर सदनिकांची योग्य किंमत ठरविण्यासाठी प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत बाब टिप्पणी सादर करण्यात यावी.

---

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : मुंबई मंडळाच्या एस.आर.डी. परिमंडळांतर्गत कार्यान्वित असणाऱ्या योजनांविषयी मासिक प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.** 5381

विषय : औरंगाबाद येथील शहर भूमापन क्र. २०७२१ या जमिनीवरील जुन्या दोन प्रशासकीय इमारती तोडणे व त्यामुळे मोकळ्या झालेल्या जागेवर मध्यम उत्पन्न गटातील ४८ गाळे बांधणे / या कामाची निविदा स्वीकृतीबाबत टिप्पणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
औरंगाबाद येथील शहर भूमापन क्रमांक २०७२१ या जमिनीवरील जुन्या दोन इमारती तोडणे व त्यामुळे मोकळ्या झालेल्या जागेवर मध्यम उत्पन्न गटातील ४८ गाळे बांधणे या कामासाठी औरंगाबाद मंडळाकडे प्राप्त झालेला मे. संचार कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांनी दाखल केलेली ३३.५१ टक्के जास्त दराची निविदा वाटाघाटीद्वारे दर कमी करून ३३ टक्के या दराने वर्ष १९९४-९५ च्या दरसूचीवर निविदा प्राधिकरण स्वीकारीत आहे.
प्राधिकरणाच्या सदर ठरावाची स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही मुख्याधिकारी, औरंगाबाद मंडळ यांनी करावी.

---

**Item No.** 11 **Resolution No.** 5382

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून काम करताना विकास योजनांमधील विविध सार्वजनिक आरक्षणाचा विकास करण्यासाठी दिनांक ७ एप्रिल, १९९४ चा शासन निर्णय लागू करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) जुळे सोलापूर - १, जुळे सोलापूर - २, नवीन चंद्रपूर व धारावी, मुंबई येथील अधिसूचित क्षेत्रासाठी म्हाडा विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून काम करीत असताना तेथील तसेच यापुढे भविष्यात ज्या ठिकाणी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून काम करेल तेथील अधिसूचित क्षेत्रांसाठी असलेल्या विकास आराखड्यामधील विविध सार्वजनिक आरक्षणांचा विकास करण्याबाबतची कार्यवाही शासनाच्या नगर विकास विभागाच्या दिनांक ७/४/१९९४ च्या आदेशाप्रमाणे म्हाडाने करण्यासाठी अनुमती देण्यात येत आहे.
२) वरील ठिकाणी तसेच यापुढे भविष्यात ज्या ठिकाणी म्हाडा विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून काम करेल, तेथील अधिसूचित क्षेत्रांसाठी असलेल्या विकास योजनांमधील आरक्षणांचा विकास करण्यासाठी जमीन मालकांसाठी/सार्वजनिक/निमसार्वजनिक संस्थांसाठी शासनाने अंतर्भूत केलेल्या अटी व शर्ती व्यतिरिक्त प्रकरणनिहाय आवश्यकतेनुसार जादा अटी व शर्ती अंतर्भूत करण्याचे अधिकार व शासन निर्णयानुसार जमीन मालक व इतरांना आरक्षणांचा विकास करण्याची परवानगी देण्याचे अधिकार उपाध्यक्ष/म्हाडा यांना प्रदान करण्यात येत आहेत.
३) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची धारावीसाठी 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणून जी शासनाने नियुक्ती केली आहे ती रद्द करण्याबाबत शासनास प्रस्ताव पाठविण्यात यावा व त्यास (डिनोटीफाफ) शासनाची मंजूरी घेण्यात यावी.
या ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी होण्याची वाट न पाहता करण्यात यावी.

**Item No.** 12 **Resolution No.** 5383

विषय : मे. बी. जी. शिर्के टेक्नॉलॉजी (लि.) यांना टप्पा-१ मध्ये दिलेल्या ५००० सदनिकांचे कामातील लवादाचा निर्णय.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
लवादाने पाठविलेल्या निर्णयाचे अवलोकन केल्यानंतर प्राधिकरणास काही मुद्यांच्या बाबतील अधिक खुलासा आणि समर्थन प्राप्त करून घेणे आवश्यक वाटते. म्हणून यासंबंधी प्रशासनाने उपस्थित केलेल्या मुद्यांप्रमाणे अधिक खुलासा व समर्थन आरबिट्रेशन कायद्यातील नियम ३३ (१) (ब) अन्वये प्राप्त करण्यात यावे व त्यानंतर ही बाब प्राधिकरणासमोर अंतिम निर्णयासाठी सादर करण्यात यावी. दरम्यानच्या काळात व्याजाचा भुर्दंड टाळण्याकरिता आवश्यक असल्यास लवादाच्या निर्णयाप्रमाणे मे. बी. जी. शिर्के टेक्नॉलॉजी यांना हरकतीची नोंद देऊन (अंडर प्रोटेस्ट) रक्कम अदा करण्यात यावी.

**Item No.** 13 **Resolution No.** 5384

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण, नवीन चंद्रपूर शहर विकास योजना.

विकास आराखड्यातील विकास कामाची अंमलबजावणी करण्यासाठी म्हाडाने आतापर्यंत केलेल्या रु. ३२९ लक्ष खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नवीन चंद्रपूर शहर विकास योजना ही एक दीर्घ मुदतीची योजना असून या योजनेसाठी फार मोठ्या प्रमाणात शासनाकडून आर्थिक मदतीची जरूरी आहे. म्हाडास ही योजना संपूर्णपणे स्वतःच्या आर्थिक निधीमधून राबविणे शक्य नाही. या योजनेस शासनाकडून आर्थिक मदत मिळण्यासाठी म्हाडाने वारंवार प्रयत्न केलेले असून शासनाने आता वर्ष १९८८-८९ या सालासाठी या योजनेसाठी रु. ६७०.२८ लक्ष नियतव्यय म्हणून मंजूर केलेला असून तो येत्या दिवाळी अधिवेशनात अर्थसंकल्पित होणार आहे. या खर्चास शासनाने दिनांक २७.१०.१९९८ च्या निर्णयानुसार प्रशासकीय मंजूरी सुद्धा दिलेली आहे.
ही बाब गृहित धरून तसेच भविष्यात शासन या योजनेस आर्थिक स्वरुपात मदत देईल हे गृहित धरून म्हाडाने आतापर्यंत या योजनेसाठी विकास आराखडा तयार करण्यास लागणारा खर्च, आस्थापना खर्च, भूसंपादन खर्च वगैरे बाबींवर आजपर्यंत म्हाडाच्या निधीतून केलेल्या रु. ३२९ लक्ष खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 14 **Resolution No.** 5385

विषय : मंडळाच्या बहुमजली इमारतींच्या वसाहतीमध्ये उर्वरित चटईक्षेत्राच्या वाटपाबाबत प्राधिकरणाचा ठराव क्र. ४०६८, दि. ८/४/९३ च्या धोरणामध्ये बदल करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाने बहुमजली इमारतींच्या वसाहतीमधील उर्वरित चटईक्षेत्राच्या वितरणासाठी पूर्वी केलेल्या ठराव क्र. ४०६८, दि. ८.४.१९९३ मध्ये सुधारणा करण्यासाठी सादर केलेल्या बाब टिप्पणीचा विचार करून सुचविलेल्या सुधारणांना एकमताने खालीलप्रमाणे मंजूरी दिली.

१) प्राधिकरणाच्या निश्चित केलेल्या उर्वरित चटईक्षेत्राच्या वितरणाबाबतच्या धोरणाबाबत ठराव क्र. ४०६८, दि. ८.४.९३ प्रमाणे मूळ गाळ्याच्या क्षेत्रफळाच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिकचे उर्वरित चटईक्षेत्र वाटप करताना निवासी वापरासाठी व अनिवासी वापरासाठी खालील तक्त्याप्रमाणे अधिमूल्य दर आकारणी करावी.

निवासी वापरासाठी

| अ.क्र. | उ. च. क्षे. चे. मूळ गाळ्याच्या चटईक्षेत्राशी प्रमाण | दर आकारणी ठराव क्र. ४०६८ च्या विभागीय दराच्या प्रमाणात उपाध्यक्ष/प्रा. यांच्या मंजूरीने |
|---|---|---|
| १) | ५० ते ७५ टक्क्यांपर्यंत | विभागीय दराच्या ११५ टक्के |
| २) | ७५ ते १०० टक्क्यांपर्यंत | विभागीय दराच्या १५० टक्के |
| ३) | १०० टक्क्यांचा दर | विभागीय दराच्या दुप्पट |

अनिवासी वापरासाठी

| अ.क्र. | उर्वरित चटईक्षेत्राच्या मूळ गाळ्यांच्या क्षेत्राशी प्रमाण | दर आकारणी ठराव क्र. ४०६८ च्या विभागीय दराच्या प्रमाणात |
|---|---|---|
| १) | मूळ गाळ्याच्या क्षेत्रफळांच्या ५० टक्क्यांपैकी १५ टक्के पर्यंत सिमित | विभागीय अनिवासी दराने मुख्य अधिकाऱ्यांनी करावी. |
| २) | मूळ गाळ्याच्या क्षेत्रफळाच्या १५ टक्केच्या वर | विभागीय अनिवासी दराच्या दुप्पट उपाध्यक्ष/प्रा. यांच्या मंजूरीने |

टीप : औद्योगिक वापरासाठी दरवाढीचे टप्पे अनिवासी वापराप्रमाणे व शैक्षणिक व सामाजिक वापरासाठी दरवाढीचे टप्पे निवासी वापराप्रमाणे राहतील.

२) मूळ गाळ्यांच्या ५० टक्क्यांहून जास्त चटईक्षेत्राचे वाटप व १५ टक्केपेक्षा जास्त अनिवासी वापराबाबतचे वाटप उपाध्यक्ष/प्रा. यांनी उपरोक्त दरानुसार अधिमूल्य आकारून निर्णय घ्यावा. यापूर्वी दिलेल्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त चटईक्षेत्राच्या

वितरणाच्या प्रकरणात उपरोक्त दरसूची लागू करावी. निवासी वापराकरिता मूळ गाळ्याच्या क्षेत्रफळाच्या ५० टक्क्यांपर्यंत व त्यापैकी १५ टक्केपर्यंत क्षेत्रफळ अनिवासी वापराकरिता ठरविलेल्या विभागीय दराने मुख्य अधिकाऱ्यांनी निर्णय घ्यावा.

३) वरील सर्व अधिमूल्याच्या रकमेस २.५ टक्के इतके वार्षिक भुईभाडे देय राहील.

४) उपरोक्त प्रस्तावाशिवाय प्राधिकरणाच्या यापूर्वीच्या ठराव क्रमांक ४०६८, दिनांक ८.४.१९९३ मधील इतर निर्णय कायम ठेवण्यात येत आहेत.

५) संबंधित स्थानिक महानगरपालिका/नगर परिषदेकडून वसाहतीचा अभिन्यास मंजूर झाल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या उर्वरित चटईक्षेत्र ज्याचा वापर म्हाडाला स्वतःसाठी करता येणार नाही, अशा उर्वरित चटईक्षेत्राची माहिती वसाहतीतील सहकारी संस्था/इतर लाभधारक यांना लेखी कळविण्यात यावी. उर्वरित चटईक्षेत्राचे वाटप सर्वांना समप्रमाणात परंतु प्रथमतः मूळ गाळ्यांच्या क्षेत्रफळाच्या ५० टक्क्यांपर्यंतचे वितरण मुख्याधिकारी, विभागीय मंडळे यांनी करावे. याहून जास्तीचे चटईक्षेत्र उपलब्ध असल्यास अशी प्रकरणे मागणीनुसार मान्यतेसाठी उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचेकडे सादर करावीत.

६) उर्वरित चटईक्षेत्र एखाद्या संस्थेला दिल्यावर इमारतीतील बांधकामात जे फेरबदल करावयाचे आहेत, ते करण्यासाठी संस्थांनी मान्यवर संरचनात्मक अभियंत्यांची नेमणूक करावी व त्यांच्या सल्ल्याने तसेच मार्गदर्शनाखाली अशी कामे करावीत. उर्वरित चटईक्षेत्राचा वापर करताना इमारतीचे काही नुकसान व जीवितहानी झाल्यास त्यासाठी म्हाडा जबाबदार राहणार नाही. यासाठी संबंधित संस्थांनी वा लाभधारकांनी म्हाडाला क्षतीपूरण (इंडेम्निफाय) करणे आवश्यक आहे. अशा प्रकारचा इंडेम्निटी बाँड सहकारी संस्थेकडून घ्यावा.

७) उपरोक्त दरसूचीमध्ये वेळोवेळी व गरजेनुसार फेरबदल करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

यानंतर मा. उपाध्यक्ष/प्रा. यांच्या अनुमतीने खालील आयत्या वेळचे विषय चर्चेत घेण्यात आले.

**Item No.** 15 **Resolution No.** 5386

विषय : मूलपूर्व राजीव गांधी निवारा प्रकल्पातर्फे नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत पुनर्रचित इमारतीमधील अनधिकृत हस्तांतरणाबाबतचे धोरण.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाचा ठराव क्रमांक ५३५१, दिनांक २९.९.१९९८ मध्ये सुधारणा करण्यासाठी सादर केलेल्या बाब टिप्पणीचा विचार करून मूलपूर्व राजीव गांधी निवारा प्रकल्पामार्फत नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत पुनर्रचित केलेल्या इमारतींसाठी आकारावयाची दंडात्मक रक्कम खाली दर्शविलेल्या तक्त्याप्रमाणे आकारण्यात तत्वतः मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रथमवेळच्या निवासी गाळ्याचे हस्तांतरण.

| अ.क. | मूळ निवासी गाळा | सबसिडी रुपये | दंडात्मक रक्कम रुपये | एकूण वसूल करावयाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | १८० चौ. फूटापर्यंत | १२,९००/- | १०,०००/- | २२,९००/- |
| २. | १८१ ते २५० चौ.फू.पर्यंत | जुन्या इमारतीमधील गाळ्यांचे क्षेत्रफळाइतके रु. ७२ प्रति चौ.फू. प्रमाणे वसूल करावयाचे आहेत. | १५,०००/- | स्तंभ ३ अधिक ४ |
| ३. | २५१ चौ.फू.पुढे | जुन्या इमारतीमधील गाळ्यांचे क्षेत्रफळाइतके रु. ७२ प्रति चौ.फू. प्रमाणे वसूल करावयाचे आहेत. | २०,०००/- | स्तंभ ३ अधिक ४ |

२) दुसऱ्या व त्यापुढील वेळी हस्तांतरण

| अ.क. | मूळ निवासी गाळा | सबसिडी रुपये | दंडात्मक रक्कम रुपये | एकूण वसूल करावयाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | २०० चौ.फू.पर्यंत | नाही | २०,०००/- | २०,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | २०१ ते २५० चौ.फू.पर्यंत | नाही | २५,०००/- | २५,०००/- |
| ३. | २५१ चौ.फू. पुढे | नाही | ३०,०००/- | ३०,०००/- |

३) प्रथम वेळच्या अनिवासी गाळ्यांचे हस्तांतरण

| अ.क्र. | मूळ अनिवासी गाळा | सबसिडी रुपये | दंडात्मक रक्कम रुपये | एकुण वसूल करावयाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | १८० चौ. फूटापर्यंत | जुन्या इमारतीमधील अनिवासी गाळ्यांच्या क्षेत्रफळाइतके रु. ७२ प्रति चौ.फू. प्रमाणे वसूल करावयाचे आहेत. | २०,०००/- | ३२,९००/- |
| २. | १८१ ते २५० चौ.फू.पर्यंत | जुन्या इमारतीमधील अनिवासी गाळ्यांच्या क्षेत्रफळाइतके रु. ७२ प्रति चौ.फू. प्रमाणे वसूल करावयाचे आहेत. | ३०,०००/- | स्तंभ ३ अधिक ४ |
| ३. | २५१ चौ.फू.पुढे | जुन्या इमारतीमधील अनिवासी गाळ्यांच्या क्षेत्रफळाइतके रु. ७२ प्रति चौ.फू. प्रमाणे वसूल करावयाचे आहेत. | ४०,०००/- | स्तंभ ३ अधिक ४ |

४) दुसऱ्या व त्यापुढील गाळे अनिवासी गाळ्यांचे हस्तांतरण

| अ.क्र. | मूळ अनिवासी गाळा | सबसिडी रुपये | दंडात्मक रक्कम रुपये | एकुण वसूल करावयाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | १८० चौ.फू.पर्यंत | नाही | २०,०००/- | २०,०००/- |
| २. | १८१ ते २५० चौ.फू.पर्यंत | नाही | ३०,०००/- | ३०,०००/- |
| ३. | २५१ चौ.फू. पुढे | नाही | ४०,०००/- | ४०,०००/- |

५) प्रथम वेळच्या अतिरिक्त गाळा/अतिरिक्त क्षेत्रफळाचा गाळा हस्तांतरण

| अ.क्र. | अतिरिक्त गाळा | सुटीची रक्कम रुपये | दंडात्मक रक्कम रुपये | एकूण वसूल करावयाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | १८० चौ. फूटापर्यंत | पहिल्या ९० चौ.फू. पर्यंत दिलेली २५ टक्के सूट वसूल करणे | १०,०००/- | स्तंभ ३ अधिक ४ |
| २. | १८१ ते २५० चौ.फू.पर्यंत | पहिल्या ९० चौ.फू. पर्यंत दिलेली २५ टक्के सूट वसूल करणे | १५,०००/- | स्तंभ ३ अधिक ४ |
| ३. | २५१ चौ. फू. पुढे | पहिल्या ९० चौ.फू. पर्यंत दिलेली २५ टक्के सूट वसूल करणे | २०,०००/- | स्तंभ ३ अधिक ४ |

६) दुसऱ्या व त्यापुढील वेळी अतिरिक्त गाळा/अतिरिक्त क्षेत्रफळाचा गाळा हस्तांतरण

| अ.क्र. | अतिरिक्त गाळा | सुटीची रक्कम रुपये | दंडात्मक रक्कम रुपये | एकूण वसूल करावयाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | १८० चौ.फू.पर्यंत | नाही | १०,०००/- | १०,०००/- |
| २. | १८१ ते २५० चौ.फू.पर्यंत | नाही | १५,०००/- | १५,०००/- |
| ३. | २५१ चौ.फू. पुढे | नाही | २०,०००/- | २०,०००/- |

हप्त्याची सवलत रद्द करण्यात यावी व सर्व रक्कम एकरकमी वसूल केल्यानंतरच हस्तांतरण नियमानुकूल करण्यात यावे. हा ठराव फक्त भूतपूर्व राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत नागरी नूतनीकरण योजनेखाली पुनर्रचित इमारतीमधील गाळ्यांसाठी ग्राह्य राहील.

**Item No. 16 Resolution No. 5387**

विषय : सोलापूर जिल्ह्यातील बिडी कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या घरकुलांसाठी हुडकोकडून देण्यात आलेल्या कर्जावरील व्याज माफ करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग क्र. १०९५/प्र.क्र.७१०/गृनिधी-१, दिनांक २६.१०.९८ नुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.
१) विडी कामगारांनी पुढील सहा महिन्यांत मूळ कर्जाच्या थकबाकी रकमेचा म्हाडाला संपूर्ण भरणा करावा.
२) संबंधित विडी कामगारांकडून एका महिन्याच्या कालावधीत खर्चाची मूळ रक्कम सहा महिन्यांच्या कालावधीत भरण्यात यावीत, अशा आशयाचे हमीपत्र विहित स्टँप पेपरवर घेण्यात यावे.
३) जे विडी कामगार वरील आशयाचे हमीपत्र विहित मुदतीत देणार नाहीत, अशा कामगारांकडून कर्ज वसुली सक्तीने करण्यासाठी त्यांचेवर निष्कासनाची कारवाई सुरू करावी.
४) कर्जाच्या थकबाकीच्या रकमेचा म्हाडाला पूर्णपणे भरणा केल्यानंतर कर्जावरील व्याज माफ करण्यासाठी प्राधिकरणास प्रस्ताव सादर करण्यात यावा.
५) जे अनधिकृत गाळेधारक असतील त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

**Item No.** 17 **Resolution No.** 5388

विषय : प्राधिकरणातील मृत किंवा सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वितरित केलेली सेवानिवासस्थाने सेवानिवृत्त कर्मचारी किंवा मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना मालकी हक्काने किंवा भाडेतत्वने कायम स्वरुपी वितरित करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरणातील मृत किंवा सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वितरित केलेली सेवानिवासस्थाने सेवानिवृत्त कर्मचारी किंवा मृत कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसांची पर्यायी व्यवस्था करण्याच्या दृष्टीने जोपर्यंत प्राधिकरणाचा अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत निष्कासनाची कारवाई करण्यात येऊ नये.

यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीत मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांनी उपाध्यक्ष/प्रा. यांना अशी विनंती केली की, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत बांधण्यात आलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असलेल्या घरकुल योजनेच्या वसूलीबाबत जो प्रश्न मागील बैठकीत उपस्थित करण्यात आला होता त्यावेळी अमरावती मंडळाच्या दौऱ्यानंतर या प्रकरणाची तपासणी करुन अहवाल सादर करण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे अमरावती मंडळाच्या दौऱ्याच्या वेळी कार्यवाही करण्यात आली. त्याबाबतची माहिती समागृहास देण्यात आली.

यावर उपाध्यक्ष/प्रा. यांनी मा. अध्यक्ष/प्रा. यांच्या सूचनेप्रमाणे अमरावती मंडळाच्या दौऱ्याच्यावेळी केलेल्या कार्यवाहीची माहिती समागृहास देताना असे सांगितले की, अमरावती मंडळांतर्गत चिदंबवली नावाची वसाहत हुडकोच्या अर्थसहाय्यामधून बांधण्यात आलेली आहे. तेथील रहिवाशांकडून वसूल करावयाच्या रकमेबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता गाळेधारकांना जो व्याजाचा दर लावण्यात आलेला आहे तो चुकीचा लावण्यात आला असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर दिसून आले आहे.

याबाबत पुढे माहिती देताना उपाध्यक्ष/प्रा. यांनी असे निदर्शनास आणून दिले की, प्राधिकरणाच्या १९९३ च्या ठरावान्वये असा निर्णय घेण्यात आला आहे की, हुडकोच्या अर्थसहाय्यामधून बांधण्यात येणाऱ्या व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असलेल्या योजनांसाठी हुडकोकडून घेण्यात येणाऱ्या कर्जावर हुडकोतर्फे व्याज आकारण्यात येत असल्यामुळे पुन्हा त्याच रकमेवर व्याज आकारण्यात येऊ नये. या प्रकरणाबाबतचा अहवाल मागविला असता त्यात असे आढळून आले आहे की, हुडकोकडून दंडात्मक व्याज आकारण्यात आले असून म्हाडानेही दंडात्मक व्याज आकारल्याचे दिसून आले. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी असलेल्या या योजनेत ज्या लाभार्थींना गाळे देण्यात आले आहेत अशा गाळेधारकांवर १० ते १२ लाख रुपये दंडात्मक व्याजाची रक्कम चुकीने लावण्यात आल्याचे दिसून आले आहे.

या संबंधीचा सविस्तर अहवाल मुख्याधिकारी/अमरावती मंडळ यांचेकडून मागविण्यात आला असून अहवाल आल्यावर त्या अनुषंगाने याबाबतची सविस्तर माहिती प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करण्यात येईल.

यानंतर श्री. कारखानीस/सदस्य, प्रा. यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, सुवर्ण महोत्सवानिमित्त म्हाडा कर्मचाऱ्यांना प्राधिकरणाकडून कोणत्या प्रकारची भेट देण्यात येणार आहे, याबाबत चर्चा व्हावी.

यावर अध्यक्ष/प्रा. यांनी अशी सूचना केली की, विद्युत महामंडळामध्ये सुवर्ण महोत्सवानिमित्त कोणत्या प्रकारच्या भेटवस्तू देण्यात आल्या त्याबाबतची चौकशी

करण्याच्या सूचना श्री. हुले, सचिव, सुवर्ण महोत्सव समिती यांना देण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे त्यांनी चौकशी करून सुवर्ण महोत्सव समितीपुढे माहिती सादर करावी.

त्यानंतर कर्मचाऱ्यांना कोणत्याप्रकारची भेटवस्तू देण्यात यावी, याबाबत समितीमध्ये निर्णय घेण्यात येईल.

उपाध्यक्ष/प्रा. यांनी अशी माहिती दिली की, प्राधिकरणाचा सुवर्ण महोत्सव हा मर्यादित प्रमाणात न ठेवता प्रत्येक सर्वसाधारण कर्मचाऱ्यांपर्यंत प्राधिकरणाकडून देण्यात येणारी भेटवस्तू पोहोचेल, या दृष्टीने विचार व्हावा.

श्री. मधू चव्हाण, सभापती/मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी अशी सूचना केली की, सुवर्ण महोत्सवी वर्षात प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना कायम स्वरुपी आर्थिक फायदा होईल यासाठी सरसकट एक वेतनवाढ देण्याबाबत विचार करण्यात यावा. म्हणजे सुवर्णमहोत्सवी वर्षात आपल्या कर्मचाऱ्यांना काहीतरी आर्थिक मोबदला दिल्यासारखे होईल. पुढे सभापती/दु. व पु. मंडळ यांनी अशी माहिती दिली की, मुंबई महानगरपालिकेला १०० वर्षे झाल्यानंतर मुंबई महानगरपालिकेच्या प्रत्येक कर्मचाऱ्याला आर्थिक मोबदला म्हणून एक पगार आणि सरसकट एक वेतनवाढ देण्यात आली होती. त्याप्रमाणे प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांनाही सुवर्णमहोत्सवी वर्षात एक पगार व वेतनवाढ देण्यात यावी.

उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी अशी सूचना केली की, प्राधिकरणाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये काही ठराविक कर्मचाऱ्यांना आर्थिक मोबदला न देता तो सर्व कर्मचाऱ्यांना समान आर्थिक मोबदला देण्यात यावा.

यानंतर मुख्याधिकारी, मुंबई मंडळ यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, भूतपूर्व जागतिक बँक प्रकल्पांतर्गत विकसित केलेल्या व वाटप करावयाच्या भूखंडासंदर्भात लक्षवेधी सूचना विधान परिषदेमध्ये आमदार कृपाशंकर सिंग यांनी सादर केलेली आहे. सदर भूखंड सी. आर. झेड.ने बाधित असल्यामुळे केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे वाटप करता आले नाहीत. या प्रकरणी शासनाला विधान परिषदेतील लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने उत्तर पाठविणेसाठी मुंबई मंडळाकडून तयार करण्यात आलेली टिप्पणी शासनास पाठविण्यात आली असून शासनास असे कळविण्यात आले आहे की, सदर बाब प्राधिकरणाकडे प्रलंबित आहे.

यावर उपाध्यक्ष/प्रा. यांनी अध्यक्ष/प्रा. यांच्या अनुमतीने अशी सूचना केली की, मुंबई मंडळाने सूचित केल्याप्रमाणे सदर बाब प्राधिकरणाकडे प्रलंबित आहे असे न म्हणता सदर प्रकरण प्राधिकरणाकडे विचाराधीन आहे अशा प्रकारे लक्षवेधी सूचनेला उत्तर देण्यासाठी शासनास कळविण्यात यावे, यास अध्यक्ष/प्रा. यांनी अनुमती दर्शविली.

यानंतर मा. अध्यक्ष/प्रा. यांनी सभागृहात असे सांगितले की, विद्यमान प्राधिकरणाची ही शेवटची बैठक असल्याने या बैठकीत उपस्थित प्राधिकरणाच्या सदस्यांचा सत्कार करण्यात येत आहे. त्याप्रमाणे अध्यक्ष/प्रा. यांच्या हस्ते श्री. गजानन भोवर, सदस्य/प्रा. आणि श्री. रविंद्र कारखानीस, सदस्य/प्रा. यांना मा. अध्यक्ष/प्रा. यांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन तसेच मा. उपाध्यक्ष/प्रा. यांच्या हस्ते प्राधिकरणाचे स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला व सचिव यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांनी सांगितले की, श्री. भोवर, सदस्य/प्रा. यांनी सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात नेहमीच्या कामकाजात सहकार्य केले. त्याचप्रमाणे कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी म्हणून श्री. रविंद्र कारखानीस, सदस्य यांनी अतिशय चांगले काम केले आहे. त्यांच्या तांत्रिक ज्ञानाचा प्राधिकरणाला उपयोग करून दिला

आहे.

या सत्काराच्या वेळी प्राधिकरणाच्या सदस्यांमधून निवृत्त होणाऱ्या सदस्यांबाबत श्री. मधू चव्हाण, सभापती, दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी श्री. मोवर यांच्या कार्याचा गौरव केला. तसेच कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी श्री. रविंद्र कारखानीस, सदस्य/प्रा. यांनी केलेल्या कार्याचाही त्यांनी गौरव केला.

सत्काराला उत्तर देताना श्री. मोवर, सदस्य/प्रा. यांनी असे सांगितले की, त्यांच्या सदस्य पदाच्या कालावधीत त्यांना मा. अध्यक्ष आणि मा. उपाध्यक्ष यांनी बहुमोल सहकार्य केले. तसेच त्यांचा आज सभागृहात सत्कार केल्याबद्दल त्यांनी मनःपूर्वक आभार मानले. त्याचप्रमाणे म्हाडाच्या सर्व अधिकाऱ्यांनी त्यांना सहकार्य केल्याबद्दल त्यांनी आभार मानले.

श्री. कारखानीस, सदस्य/प्रा. यांनी सत्काराला उत्तर देताना असे सांगितले की, कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी म्हणून प्राधिकरणाच्या सदस्य या पदावर काम करताना मा. अध्यक्ष आणि मा. उपाध्यक्ष यांनी त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच सर्व मंडळांचे सभापती यांनी त्यांना सहकार्य केले. तसेच आज त्यांचा सन्मान करण्यात आल्याबद्दल मा. अध्यक्ष/प्राधिकरण आणि उपाध्यक्ष/प्रा. यांचे आभार व्यक्त केले.

यानंतर मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांनी सर्वांचे आभार मानून बैठक समाप्त झाल्याचे जाहीर केले.